04-02-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGJ/ 10:00

04-02-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SGJ/ D/ ST/ 10:00

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

पृ.शी. :जायकवाडी धरणाच्या संकल्पित साठयापेक्षा कमी पाणी धरणात आल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी. :जायकवाडी धरणाच्या संकल्पित साठयापेक्षा कमी पाणी धरणात आल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री. हेमंत टकले, सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. एम.एम.शेख, अब्दुल्ला खान दुर्राणी, विक्रम काळे, कपिल पाटील, विनायकराव मेटे, राणा जगजितसिंह पाटील, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"सन १९७६ मध्ये पूर्ण झालेल्या औरंगाबाद जायकवाडी धरणाची क्षमता १०२ टीएमसी असणे, परंतु धरणाच्या वरील बाजूस ११५ टीएमसी पाणी अडविण्याची परवानगी आयोगाने दिलेली असतांनाही जागोजागी बंधारे व धरणे बांधून नियमबाह्य पध्दतीने १८५ टीएमसी पाणी अडविल्याने जायकवाडी संकल्पित साठ्याच्या केवळ २ टक्के पाणी आले असणे, औरंगाबाद, बीड, जालना, परभणी या जिल्ह्यातील पेयजल सिंचन व उद्योग धंदे, शिवाय परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र जायकवाडीच्या पाण्यावरच अवलंबून असून मराठवाड्यातील जनता पाण्यासाठी हवालदिल झालेली असणे, जायकवाडी प्रकल्प धरण या खोऱ्यातील पाणी साठ्याची टक्केवारी ३५ टक्के असून संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार जायकवाडीच्या वरील भागातील धरणांतून २७ अब्ज घनफूट पाणी सोडणे बंधनकारक असणे, कृष्णेचे २१ टीएमसी हक्काचे पाणी देण्यातही मराठवाड्यावर अन्याय झालेला असणे, तसेच मराठवाड्याच्या वाट्याला आलेल्या २५ टीएमसी पाण्यासाठी रु.४,८४५ कोटींची प्रशासकीय मान्यता दिलेली असून मागील ५ वर्षात यापैंकी रु.५३५ कोटींची तरतूद झालेली असणे, उर्वरित कामासाठी निधीची तरतूद त्वरित करणे आवश्यक असणे, प्रत्यक्षात ७ टीएमसीचीच कामे सूरु असून, त्यात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा टप्पा नं.१ व कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचा काही भाग असणे, हा प्रकल्प पूर्ण करणेसाठी ३३०० कोटी रुपयाची आवश्यकता असणे, गोदावरी खोऱ्यात नवीन १८ टीएमसी पाणी साठवण्यास परवानगी असणे, परंतु नवीन लघू प्रकल्पाला मान्यता मिळत नसल्याने अडचणी येत असणे, याबाबतीत शासनाने त्वरित निर्णय घेणे आवश्यक असणे, याकरिता शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, आपण ज्या ज्यावेळेला सभागृहात येता त्या त्या वेळेला आम्ही "जय मराठवाडा" म्हणून आपले स्वागत करीत असतो. या मागची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले होते की, या सभागृहात आपण संपूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्रातील जनतेचे प्रतिनिधी आहोत त्यामुळे एखाद्या विशिष्ट भागाचे नाव घेऊन स्वागत करणे चुकीचे होईल. ...२...

०२-०४-२०१३ (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-२

SGJ/ D/ ST/ १०:००

श्री. अमरसिंह पंडित.....

परंतु त्या मागची आमची भूमिका वेगळी आहे. आमच्या मराठवाडयाची आजची जी काही परिस्थिती आहे ती आपल्या समोर मांडणार आहे.

मराठवाडयाची जीवन रेखा समजल्या जाणाऱ्या जायकवाडी प्रकल्पास १९६५ मध्ये मान्यता मिळाली होती. १९७६ मध्ये हा प्रकल्प बांधून कार्यान्वित झाला. या प्रकल्पाखाली मराठवाडयातील औरंगाबाद, बीड, जालना, नांदेड आणि अहमदनगर जिल्हयातील २ लक्ष ७८ हजार हेक्टर जमिनीला सिंचनाचा लाभ मिळाला. या धरणातून १२ मे.वॅ.वीज निर्मिती होते आहे. जायकवाडी धरणाची एकूण क्षमता १०२ टीमसी असून वरच्या भागात ११५ टीएमसीच्या प्रकल्पांना आयोगाने परवानगी दिली होती व त्या प्रमाणे पाणीही उपलब्ध करुन दिले होते. परंतु ११५ च्या अगेन्स्ट १८५ टीएमसी चे प्रकल्प उत्तर महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी उभे केले. वरच्या भागात मोठे ७ प्रकल्प असून १५ मध्यम प्रकल्प, ४६१ लघु प्रकल्प असून स्थानिकस्तरचे ७१२७ प्रकल्प असे १८५ टीएसी पाणी १०२ टीएमसीच्या अगेन्स्ट उभे राहिलेले आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

संकलित साठा 102 टीएमसी आहे. त्यामुळेच आज आपल्याला खाली पाणी साठा उपलब्ध होत नाही.

भारताचे महानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी आपल्या सन 2001-2002 च्या अहवालात तीव्र आक्षेप घेतला. तेव्हा राज्य सरकारने सांगितले आहे की, खालच्या भागात ही जी तूट आहे ती धरणे बांधून भरून काढू. गोदावरी खोऱ्यामध्ये पाणी उपलब्ध नाही. जायकवाडी धरणामध्ये पाणीसाठा होत नाही. त्यामुळे खालच्या भागात पाणी कुठून येणार आहे ? महालेखापालांनी यावर देखील आक्षेप घेतल्यानंतर त्यास थातूरमातूर उत्तरे देऊन हे प्रकरण दडपण्यात आले. दुर्दैवाने आजही गोदावरीला पाणी मिळत नसताना सरकारचे म्हणणे एकच आहे की, खालची तूट आम्ही भरून काढू. ज्यावेळी अप स्ट्रीममधून पाणी येणार नाही, तो पर्यंत ते डाऊन स्ट्रीमला मिळणार नाही. कदाचित कागदी घोडे दाखवून आपण प्रकल्प करणार असाल. उद्या आपल्याला प्रकल्प करायचे असतील. पण डाऊन स्ट्रीमला पाणीच उपलब्ध होणार नसेल तर हे प्रकल्प आपण कार्यान्वित कसे काय करणार आहात ?

आपण भंडारदरा धरण बांधले. त्याच्या खाली नीळवंडे धरण बांधले. त्याखाली संगमनेर येथे इंग्रजांनी बांधलेले अश्वी धरण आहे. त्याखाली आपण ओझर बंधारा बांधला. या बंधाऱ्यातून गोदावरीला पाणी यायला पाहिजे होते. परंतु ते ही पाणी आपण उचलत असून नगरच्या भागातील लोकांना पुरवत आहात. अश्वीतील पाणी गोदावरीमध्ये पडले तर त्याचा फायदा होणार आहे. दुर्दैवाने ते ही आमच्या नशिबात आले नाही.

त्यावेळी इंग्रजांचा चांगला हेतू होता. परंतु, आज ते पाणी आपण आम्हाला प्यायला सुद्धा देत नाही. गणपती विसजर्नासाठी याच राज्यकर्त्यांनी आंदोलने करायला लावली. आम्ही देखील या राज्यातील आहोत. तेथे जर असे प्रकार घडत असतील तर या सारखे दुसरे वाईट काहीच नाही. गणपती विसर्जनासाठी या राज्यकर्तांनी थातूरमातूर आंदोलन केले आणि 500 एमटीएफसी पाणी गणपती विसर्जनासाठी सोडले.

पावसाळयामध्ये ही धरणे भरलेली असतात. आपल्याकडे जलसंपत्ती नियमन लवाद आहे. या लवादाच्या सूचनेनुसार, शिफारशीनुसार 15 ऑक्टोबरच्या दरम्यान जायकवाडी आणि त्याच्यावर असलेल्या अप स्ट्रीमवरील सर्व प्रकल्पाचे पाणी हे समप्रमाणात ठेवणे अतिशय गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित...

15 ऑक्टोबरच्या अगोदरच म्हणजे सप्टेंबर महिन्यापासूनच या लोकांनी पावसाळ्यात कॅनॉल रन केले आणि सिंचनाचे काम पावसाळ्यात देखील केले, यासारखे दुर्दैव काय असणार आहे. पावसाळ्यात कॅनॉल रन करतात आणि त्या त्या भागात वरचे पाणी ड्रेन आऊट करून टाकतात. खाली पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे धोरण राज्य शासनाचे नाही. तेव्हा आम्ही या राज्यकर्त्यांकडून कुठली अपेक्षा करायची ?

खाली देखील तीच परिस्थिती आहे. नांदूर मधमेश्वर मधील पाणी अतिरिक्त झाले की, ते वैजापूरला व कोपरगावला देण्यात येते. आज या मंडळींनी कहर केला आहे. दिनांक 26 सप्टेंबर 2012 रोजी शासनाने जी.आर.काढला आहे. त्यातील प्रस्तावनेत नमूद करण्यात आले आहे की, सिन्नर तालुक्यातील पूर्व भागात पावसाचे प्रमाण अत्यल्प असून या भागात शेती व पिण्यासाठी कायम पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांची कायम स्वरूपी उपाययोजना करण्याबाबत मागणी आहे. पाण्याच्या दुर्भिक्षावर मात करण्यासाठी सिन्नरपासून 5 कि.मी.अंतरावर असलेल्या देव नदीवरील कुंदेवाडी गावाजवळ व खोपडी गावाजवळ देव नदीवर दगडी साठवण बंधाऱ्याची उंची वाढवून किंवा त्याठिकाणी नवीन जास्त उंचीचा बंधारा बांधणे याचा यात अंतर्भाव आहे. या ठिकाणाहून पूर कालवा काढून ते पाणी पूर्व दुष्काळी भागातील भागात नेऊन देव नदीचे पाणी वळवून सायाळे व मिरगाव येथे सोडावे अशी आग्रहाची मागणी आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

त्यासाठी देव नदीचे पाणी वळवून साळे व मिरगाव येथे सोडावे अशी मागणी केली व त्यासाठी अभ्यासगट नेमला. त्या अभ्यासगटामध्ये मुख्य अभियंता, पुणे, अधीक्षक अभियंता,नाशिक, व अधीक्षक अभियंता नाशिक यांचा समावेश करण्यात आला. या अभ्यासगटामुळे आमच्याकडे काहीही पाणी येण्याचे चिन्ह राहिलेले नाही. अशाप्रकारच्या अभ्यासगटाची नेमणूक करणे हे पूर्णत: नियमबाह्य आहे.

सभापती महोदय, महालेखाकारांचे म्हणणे आहे की, खाली पाणी शिल्लक नाही. 102 टीएमसीच्या अगेन्स्ट 185 टीएमसी पाणी अडविण्यात आले आहे. पाणी शिल्लक नसताना अशाप्रकारचे अभ्यासगट कशाला नेमता ? मला येथे दुर्दैवाने सांगितले पाहिजे की, त्या अभ्यास गटाला हॅड्रोलॉजीचे प्रमाणपत्र नाही. परंतु त्या अभ्यासगटाची ऑफिशिअल मिटींग झाली. माझी मागणी आहे की, अशाप्रकारचा अभ्यासगट नेमणे हे नियमात बसत नसताना सुध्दा तो नेमण्यात आलेला आहे. इतर कोणत्याही ठिकाणी असे अभ्यासगट करण्याचे प्रस्तावित करण्यात येत असतील तर ते तातडीने रद्द करण्यात यावेत. अशाप्रकारचे अभ्यासगट तयार करण्यासाठी दोन समित्या नेमाव्यात. एक मंत्री समिती असावी. त्यामध्ये मराठवाड्यातील मंत्री असावेत आणि दुसरी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आय.ए.एस. अधिकाऱ्यांची समिती असावी. या दोन्ही समित्यांच्या शिफारशी शिवाय अशाप्रकारचे अभ्यासगट नेमण्यात येऊ नये.

सभापती महोदय, आज जायकवाडी धरणामध्ये फक्त दोन टक्के पाणीसाठा आहे. मग शासन अभ्यासगट तयार करते. त्या अभ्यासगटात शासनाचे अधिकारी असतात. आज शासनाचे धोरण काय तर, यदाकदाचित खाली पाणी द्यायचे असेल तर मग वैतरणाचे पाणी नाशिकला आणून ते पाणी गोदावरीतून द्यायचे. आज आम्ही येथे मते मांडत असताना वैतरणेच्या पाण्या संदर्भात चर्चा करायला लावायची, तुमची पोटे भरुन घ्यायची आणि आम्हाला जे काही मिळेल ते शून्यच आहे.

सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात हे अभ्यासगट रद्द केल्याचे सांगावे. असे अभ्यासगट नेमायचे असतील तर मी अगादेर सांगितल्याप्रमाणे मंत्री गटाच्या व मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी शिवाय अशाप्रकारचे अभ्यासगट तयार करु नयेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

सभापती महोदय, आम्हाला सांगण्यात येते की, तुम्हाला 18 टीएमसी पाणी मिळाले. हे 18 टीएमसी पाणी देण्यासाठी माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांची आग्रही भूमिका होती आणि त्याप्रमाणे त्यांनी निर्णय घेतला याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. आम्हाला 18 टीएमसी पाणी देण्यात आले, परंतु त्यावर माननीय राज्यपालांनी काही बंधने घातलेली आहेत त्यामुळे आम्हाला या पाण्याचा काही उपयोग नाही. आम्ही तेथे कोणत्याही प्रकारचे प्रकल्प उभे करु शकत नाही. आम्हाला सांगण्यात आले की, 250 हेक्टर सिंचना पर्यंतचे प्रकल्प उभे करता येतील. परंतु दुर्दैवाने अलिखित सूचना आहेत की, आम्हाला 0 ते 100 हेक्टर सिंचनापर्यंतचे प्रस्ताव पाठविण्याची परवानगी नाही. 250 हेक्टर वरील सिंचन प्रकल्पांना माननीय राज्यपालांनी कडक बंधने घातली आहेत. तेव्हा आम्हाला 250 हेक्टर वरील सिंचन क्षमतेचे कोणतेही प्रकल्प करता येणार नाहीत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

महोदय, मराठवाड्यातील दुष्काळ पाहता जालना, बीड, उस्मानाबाद या ठिकाणी मोठी वाईट अवस्था निर्माण झालेली आहे. या भागातून स्थलांतरित होणाऱ्या कामगारांचे प्रमाण प्रत्येक वर्षी साधारणपणे तीन ते साडेतीन टक्क्यांनी वाढत चालले आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत आमच्या भागातील 18 टीएमसी पाण्याच्या बाबतीत चर्चा होऊ द्यावयाची नसेल आणि माननीय राज्यपालांनी बंधन घातल्याचे सांगितले जात असेल तर 18 टीएमसी पाणी देण्याला अर्थ नाही. या विषयी मी आणि सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी माननीय राज्यपालांची भेट घेतली होती. माननीय राज्यपालांनी आम्हाला सांगितले की, 18 टीएमसी पाणी अडविण्यास माझी काहीच हरकत नाही. कदाचित सरकारचे नकारात्मक धोरण आहे. सरकारची तरतूद अपुरी असेल तर मला या कामी हरकत घेण्याचे काहीच कारण नसल्याचे माननीय राज्यपालांनी सांगितले. महोदय, एकीकडे माननीय राज्यपालांनी असे म्हणायचे आणि दुसरीकडे सरकारने 18 टीएमसी पाण्याला परवानगी द्यायची नाही असा हा प्रकार आहे. आमच्या भागात 250 हेक्टरच्या आतील प्रकल्पांना परवानगी मिळत नाही. त्या प्रकल्पांसाठी तरतूद होत नाही. दुर्दैवाने 18 टीएमसी पाण्याचा उपयोग मराठवाड्याला होणार की नाही या बाबत शंका वाटते. वास्तविक पाहता त्या ठिकाणी साईट उपलब्ध आहे, हायड्रॉलॉजी विभागाने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिले आहे. सर्व काही नियमात असताना 18 टीएमसीच्या आतील प्रकल्प मराठवाड्यातील जालना, बीड, उस्मानाबाद येथे होणे अशक्यप्राय कोटीतील गोष्ट झाली आहे.

महोदय, उत्तर महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचे स्टेटमेंट मी वर्तमानपत्रात वाचले. त्यांनी सांगितले की, शिरपूर पॅटर्नचा अवलंब उत्तर महाराष्ट्रात केला जाणार आहे. वास्तविक पाहता 5 टीएमसी पाणी अडविण्यासाठी हायड्रॉलॉजी विभागाचे प्रमाणपत्र लागत नाही. शिरपूर पॅटर्नच्या नावाखाली डिपनींग आणि व्हाईटनिंग करावयाचे आहे. मग अर्जून बंधारा असेल, नांदूर-मध्यमेश्वर बंधारा असेल त्या ठिकाणी डिपनींग व व्हाईटनिंग केले जाईल. याचाच अर्थ नदी, नाले, ओढे डिपनींग आणि व्हाईटनिंग केल्यानंतर तेथील पाणी साठा वाढल्यानंतर खाली पाणी येण्याचा प्रश्नच नाही.

महोदय, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या मी ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. तसेच औरंगाबाद येथे माननीय श्री.शरद पवार साहेबांसमोर सुध्दा हा मुद्दा मांडला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

होता. एमआरईजीएसमधून लाभक्षेत्रात 1/3 कामे करण्यास परवानगी दिली आहे. माझी ऐकीव माहिती आहे की, मंत्रिमंडळात या विषयावर चर्चा झाल्यानंतर खाली कदाचित 1/3 पेक्षा अधिक कामे झाली तर वॉटर लेव्हर जास्त होईल आणि खाली पाणी जाणार नाही. यांना आंध्र प्रदेशला पाणी जाण्याची जास्त काळजी आहे. उत्तर महाराष्ट्रातील लोक शिरपूर पॅटर्नचा अवलंब करीत असताना त्यांना हा नियम लागू होत नाही. 5 टीएमसीसाठी हायड्रॉलॉजी विभागाचे कोणतेही प्रमाणपत्र लागत नाही. असे झाल्यास त्यांचा हा प्रकार सातत्याने सुरु राहील. शिरपूर पॅटर्नच्या नावाखाली पुन्हा अतिरिक्त पाणी अडविणार, परिणामी गोदावरीच्या पात्रात आम्हाला पाणी शिल्लक राहणार नाही.

महोदय, गोदावरीचा विषय सर्वात महत्त्वाचा आहे. या बाबतीत माननीय मंत्र्यांनी उत्तरात खुलासा करावा. गोदावरी पात्रात जे बॅरेजेस झालेले ओहत त्यामध्ये येणाऱ्या वॉटर अकौंटीबिलिटी अपस्ट्रीम कॅल्क्युलेट करुन आम्हाला समजून सांगावे. त्या बॅरेजेसमधून पाणी कुठे येणार आहे, हे त्यांनी विशद करावे. अशा पध्दतीने बॅरेजेसला पाणी उपलब्ध होणार नसेल, तसेच पाणी जास्त येणार, महापूर येणार आणि ते पाणी उचलून नेण्यासाठी अभ्यास गट होणार असेल तर आज आमच्याकडे या बॅरेजेसमध्ये पाणी उपलब्ध नाही. परवा माननीय श्री.पवार साहेबांनी जाहीर केल्यानुसार फळबागांसाठी पैसा दिला जात आहे. फळबागा जगविण्यासाठी आमच्याकडे पाणी नाही. काल जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही पत्र दिले आहे की, फळबागा जगविण्यासाठी सिंचनाच्या रेटनुसार जे देणे निघते ते देणे आम्ही भरु पण फळबागा जगविण्यासाठी पाणी द्या..

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .....

दुर्दैवाने ते सुध्दा देण्याचे उत्तर महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचे धोरण नाही. मराठवाड्यातील शेतीच होऊ द्यावयाची नसेल तर ते बरोबर नाही. ऊसाचा विषय तर आता बदलत चाललेला आहे पण आम्हाला फळबागा जगवू द्यावयाच्या नसतील, त्यासाठी पाणी उपलब्ध होणार नसेल तर त्यामुळे आज मायग्रेशनचे प्रमाण 3 टक्के वाढत चालले आहे. गेल्या वेळेस 52 हजाराच्या जवळपास...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित हे सर्व विषय व्यवस्थित मांडत आहेत परंतु ते भीतभीत का मांडत आहेत हे मला अजून कळलेले नाही. त्या ठिकाणी जे पाणी येत नाही किंवा जो अन्याय होतो तो सरकार करीत असते. या महाराष्ट्रामध्ये उत्तर महाराष्ट्राचे वेगळे सरकार वगैरे नाही. त्यामुळे आपण सरकारला दोष दिला पाहिजे. म्हणजे दादांना सोडायचे, यांना सोडायचे, उत्तर महाराष्ट्राचे जे कोणी दोन चार टगे असतील त्यांचा नावानिशी उल्लेख करा. उत्तर महाराष्ट्राचे वेगळे राज्य वगैरे नाही. आपण सरकारला दोष द्यावा.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझे अतिशय स्पष्ट मत आहे की, खालचे जे काही प्रकल्प व्हावयाचे असतील तर आज तिकडे जे काही बॅरेजेस झालेले आहेत त्यांना कोठून पाणी उपलब्ध होणार आहे या संदर्भात खऱ्या अर्थाने विचार करणे ही काळाची गरज आहे. जायकवाडीच्या संकल्पित साठ्यामधील 102 टीएमसी पाण्याबाबाबत जे बोलत आहोत त्या 102 टीएमसी पाण्याच्या बाबतीत सुध्दा मला अशी माहिती ऐकावयास मिळाली की, त्या पाण्यापैकी 35 टक्के पाणी पिण्यासाठी, उद्योगधंद्यासाठी आरक्षित करणार आहेत. जर अशा पध्दतीने हे आरक्षण होणार असेल तर आमचे या जायकवाडीवरचे अवलंबत्व अधिकचे असताना सुध्दा जर आम्हाला जायकवाडीच्या डाऊनस्ट्रीममध्ये नांदेड, बीड, औरंगाबाद आणि जालना येथील लोकांना पाणी मिळणार नसेल तर आम्हाला त्या ठिकाणी जगणे अतिशय कठीण होऊन जाईल.

सभापती महोदय, 25 टीएमसीच्या संदर्भात अशी परिस्थिती आहे की, केवळ 7 टीएमसीचे टेंडर मंजूर झालेले आहेत. 7 टीएमसीची कामे चालू झालेली आहेत. 7 टीएमसीची जी काही कामे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .....

चालू झालेली आहेत त्यासाठी 5 हजार कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये केवळ 100 ते 125 कोटी रुपयांपर्यंत तरतूद केली जाते. अशा पध्दतीतने आणि या गतीने जर काम चालू राहणार असेल तर 50 वर्षे सुध्दा 25 टीएमसी पाणी मराठवाड्याच्या नशिबात येणार नाही असे माझे स्पष्ट मत मी या ठिकाणी मांडत आहे.

सभापती महोदय, आपण या वर्षीच्या तरतुदी पाहिल्या तर 2013-2014 चा जो अर्थसंकल्प 20 मार्चला मांडण्यात आला त्यामध्ये राज्याच्या एकूण 1 लाख 55 हजार 800 कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात सिंचन क्षेत्रासाठी 8216 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी विदर्भाला 37 टक्के निधी मिळाला. म्हणजे विदर्भाला 3037 कोटी रुपये मिळाले. उर्वरित महाराष्ट्राला 37 टक्के मिळाले आणि मराठवाड्याला मात्र 16 टक्के मिळाले. म्हणजे विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्राला प्रत्येकी 3037 कोटी रुपये मिळाले आणि मराठवाड्याला केवळ 1315 कोटी रुपये मिळाले. आम्ही कोठे कमी पडतो हे आम्हाला माहीत नाही. कदाचित मराठवाड्याच्या जनतेचा दबाव या राज्यकर्त्यांवर कमी पडतो की काय अशा प्रकारची शंका वाटू लागलेली आहे. दुर्लक्षित राहिलेल्या या मराठवाड्याच्या संदर्भात जर विद्यमान राज्यकर्त्यांनी काही विचार केला नाही, सरकारने जर काही विचार केला नाही तर भविष्यात हा 3 टक्केचा आकडा निश्चितच 10 टक्केपेक्षा अधिक झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, मागील 3 वर्षापासून मराठवाड्याच्या सिंचन क्षेत्रासाठी 13 ते 16 टक्के आणि विदर्भाला मात्र 37-38 टक्के प्रमाणे रक्कम मिळत आलेली आहे. अलीकडच्या काळात विदर्भाला मिळणाऱ्या निधीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचे कारण काय आहे ? आज मराठवाड्याच्या संदर्भात चर्चा असताना सुध्दा या सभागृहात यदाकदाचित मराठवाड्यातील सदस्यांनी आपला या संदर्भातील वाटा मागितला नाही तर सर्व काही व्यवस्थित चालले आहे, सर्व आलबेल आहे असे सरकारचे मत झाले तर त्यात नवल वाटण्याचे काही कारण नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

मराठवाड्याला मिळणारे पाणी शेतीसाठी तर सोडूनच द्या, पण लोकांना पिण्यासाठी तरी मिळेल की नाही अशी शंका वाटू लागलेली आहे.

केळकर समितीने नागपूर कराराच्या संदर्भात घटनेच्या कलम 371(2) मधील तरतुदी लक्षात घेऊन योग्य प्रकारे विभागनिहाय अनुशेष निश्चित करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. परंतु दुर्दैवाने या समितीने विभागनिहाय अनुशेष निश्चित केला नाही तर मराठवाड्यातील जनतेला त्याचे गंभीर परिणाम नजिकच्या काळात भोगावे लागतील. हे अगदी स्पष्ट आहे. सिंचनाची निर्मिती व क्षमता हा मराठवाड्यातील कृषी प्रधान भागाचा गाभा आहे. मराठवाड्यातील ग्रामीण भागामध्ये खूप उद्योग उभे राहिलेत अशी परिस्थिती नाही. बीड जिल्ह्यामध्ये काही उद्योग उभे राहिले आहेत त्याचे प्रमाण 0.23 टक्के इतके आहे. एक युनिट उभे राहिले होते ते देखील बंद पडलेले आहे. उद्योगाबरोबर पॅरलल शेती केली तरी त्याला आमची काही हरकत आहे अशातील भाग नाही. बीड जिल्ह्यात एखादा प्रकल्प उभा होतो. बीड जिल्ह्यात चालू असलेल्या कुंडलिका झोन किंवा आष्टीच्या 25 टीएमसीच्या प्रकल्पाच्या संदर्भात वर्तमानपत्रात वाचावयास मिळते. त्या प्रकल्पांचे कामही अर्धवट पडलेले आहे. भीमा-कृष्णा स्थिरीकरणाचे पाणी कोल्हापूरहून येणार आहे. पण त्या संदर्भातील कामे चालू नाहीत. परंतु खालच्या भागातील कामे चालू आहेत. आष्टीच्या पुढच्या भागातील कुंटेफळ येथील काम चालू आहे. पण जो उद्‌भव आहे त्याची कामे कोठेही सुरु नाहीत. उस्मानाबादमध्ये तीच परिस्थिती आहे. त्यामुळे मला शंका वाटू लागली आहे की, 25 टीएमसी मराठवाड्याच्या पदरात मिळणार नाही.

राज्यपालांच्या निर्देशाबाबत मला सांगितले पाहिजे की, मराठवाड्यातील एकूण 57 लाख हेक्टरपैकी केवळ 8 टक्के जमीन सिंचनाखाली येत आहे. मग उर्वरित 92 टक्के क्षेत्राबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? हा अतिशय महत्वाचा व गंभीर विषय आहे. यदाकदाचित या राज्यकर्त्यांना या विषयाचे गांभीर्य कळले नाही तर मराठवाड्यातील दुष्काळामुळे त्या भागाचे वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.अमरसिंह पंडित.....

मराठवाड्यामध्ये चांगले उद्योग उभे करणारे व सहकार क्षेत्रात अतिशय चांगले काम करणारे कार्यकर्ते आहेत. मी लातूरच्या विकास व मांजरा सहकारी साखर कारखान्याचा आवर्जून उल्लेख करतो. समर्थ साखर कारखान्याचा आवर्जून उल्लेख करतो. माजलगावच्या साखर कारखान्याचा आर्वजून उल्लेख करतो. मराठवाड्यातील सहकारी साखर कारखाने अतिशय यशस्वीपणे वाटचाल करीत असल्यामुळे मी त्याचा निश्चितपणे स्पष्टपणे उल्लेख करीत आहे. कै.विलासराव देशमुख यांच्यानंतर या सहकार क्षेत्रात आपला कामाचा ठसा उमटविण्याचे काम श्री.दिलीपराव देशमुख यांनी केलेले आहे, श्री.अंकुशराव टोपे यांनी केलेले आहे, श्री.जयप्रकाश दांडेगांवकर यांनी केलेले आहे. म्हणजे मराठवाड्यामध्ये सहकार क्षेत्रासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नेत्यांची वानवा नाही. त्यासाठी दुसरे उदाहरण देण्याची आम्हाला आवश्यकता नाही. सहकार क्षेत्रातील बँकांमध्येही अतिशय चांगले काम करणारे लोक या मराठवाड्यात आहेत. मराठवाड्यातील जनतेने एकदा, दोनदा नव्हे तर अनेकदा हे सिध्द करुन दाखविले आहे. परंतु कष्टकरी जनतेच्या पदरात काही पडलेले नाही. तरीही आम्ही थांबलेलो नाही. आमच्या मनगटाच्या जोरावर तुमच्या भागातील ऊस तोडण्यासाठी आलो आहोत. ती परिस्थितीची अपरिहार्यता होती म्हणून आलो आहे. आम्हाला हौस होती म्हणून आम्ही तेवढ्या लांब आलो नाही. परंतु ही परिस्थिती बदलण्याचे काम माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली व्हावे अशी अपेक्षा बीड जिल्ह्यातील एक कार्यकर्ता म्हणून व्यक्त केली तर ती अतिशयोक्तीचा भाग होऊ नये.

माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी आमच्या भागासाठी महत्प्रयासाने 18 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. तेवढे पाणी देण्यामागचे आपले धोरण स्पष्ट होते. मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांना न्याय देण्याची आपली भूमिका होती. सरकारने माननीय राज्यपालांच्या सूचनेनुसार बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. मग राज्यपालांनी दिलेल्या सूचनेनुसार तरतूद केली जात असेल तर त्याबाबत माननीय राज्यपालांबरोबर चर्चा का घडवून आणली जात नाही हा एक प्रश्न माझ्यासमोर आहे. यदाकदाचित 18 टीएमसी व 25 टीएमसीच्या प्रकल्पाबाबत अलीकडच्या काळात जर निर्णय झाला नाही तर आमच्या समोरच्या बाकावर बसणाऱ्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी प्राप्त होईल. 5 हजार कोटी रुपयांचा 25 टीएमसी प्रकल्प, 8 हजार कोटी रुपयांचा 18 टीएमसीचा प्रकल्प 16 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल.

यानंतर श्री.शिगम...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

जस जसे दिवसमान जातील तस तशी कंन्स्ट्रक्शन कॉस्ट वाढत जाईल. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

बीड जिल्हयातील गेवराई तालुक्याच्या दुष्काळी भागातील 52 हजार लोक स्थलांतरित झालेले आहेत. घरामध्ये माणूस शिल्लक राहिलेला नाही. या परिस्थितीला पूर्णविराम द्यावयाचा असेल तर 18 टीएमसीच्या संदर्भात गेवराई तालुक्यातील धरणासाठी 47कोटी रुपये देण्याची आवश्यकता आहे. या 47कोटी रुपयांमध्ये 12 प्रकल्प मार्गी लागतील आणि ते मार्गी लागले तर आज जे 29 हजार लोकांचे स्थलांतर होत आहे ते स्थलांतर थांबेल. शेतकरी शेतात गेलाच नाही अशी गेवराई तालुक्यामध्ये 22 हजार एकर जमीन आहे. याचे कारण तेथे साधनसुविधा नाहीत. पाणी नाही. 5-10 वर्षापासून साधनसुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये शेतक-याला स्थलांतरित होण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही. आजा ऊस तोडीसाठी गेला, त्यानंतर बाप ऊस तोडीसाठी केला, आता मुलगा आणि मुलाचा मुलगा देखील ऊस तोडीसाठी गेला. हे पाच-सहा पिढया असे चालू राहिले. यापुढे हे असेच चालू राहिले तर आताची पिढी आम्हा लोकप्रतिनिधींना माफ करणार नाही.

18 टीएमसी आणि 25 टीएमसी पाणी उपलब्ध होण्याच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आणि माननीय जलसंपदा मंत्री श्री. सुनील तटकरे हे ठोस अशी उपाययोजना करतील असा मला विश्वास आहे. या उपाययोजनेच्या संदर्भात त्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये स्पष्ट उल्लेख करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. 85 टीएमसी पाणी नियमबाह्य पध्दतीने अडविलेले आहे. ही तूट भरुन काढण्यासाठी खाली अधिक धरणे बांधण्यात येणार आहेत असे सांगितले गेले. पण खालच्या धरणामध्ये पाणी कोठून येणार हा महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून या संदर्भात देखील मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये स्पष्ट उल्लेख करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, आपण अभ्यासगट निर्माण करतो. परंतु माझी अशी विनंती आहे की, प्रथम मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात यावी आणि त्या समितीच्या परवानगी शिवाय उत्तर महाराष्ट्रामध्ये अपस्ट्रीममध्ये अभ्यास करण्यासाठी कोणतीही समिती गठीत करण्यात येऊ नये.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. 18 टीएमसी पाणी असो अथवा 25 टीएमसी पाणी असो. हा विषय घेऊन मी माझे मत या ठिकाणी मांडले आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आणि माननीय जलसंपदा मंत्री श्री. सुनील तटकरे या दोघांवरही माझा पूर्ण विश्वास आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, आमच्याकडे इम्प्लिमेण्टेशनसाठी कोणतीही यंत्रणा नाही, इन्फ्रास्ट्रक्चर नाही. आमच्याकडील सर्व कार्यालये स्थलांतरित झालेली आहेत. नावाला कोठे तरी कार्यालय दिसते, पण तेथे एखादाच अधिकारी असतो. एस्टिमेट करण्यासाठी यंत्रणा नाही. यंत्रणा स्थलांतरित झालेली आहे. तेव्हा उस्मानाबाद मधील काही भागावर फोकस ठेवून, मायग्रेशन आणि ह्यूमन इण्डेक्स याची तपासणी करावी. त्या भागातील मायग्रेशन रोखायचे असेल तर एक फोकस प्रोग्रॅम आपल्याला करावा लागेल. या कार्यक्रमाच्या बाबतीत मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात अंतर्भाव करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्रक नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : परम आदरणीय सभापती महोदय, हा मराठवाडयाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रस्ताव आहे. मराठवाडा हा निजामाच्या अधिपत्त्याखाली होता, तो आजही उपेक्षित आहे. देशाला स्वातंत्र्य अगोदर मिळाले, नंतर मराठवाडयाच्या वाटयाला स्वातंत्र्य आले. स्वातंत्र्याच्या बाबतीत देखील मराठवाडा उपेक्षित राहिला हे मराठवाडयाचे दुर्देव आहे. हे दुर्देव दूर करणारी यंत्रणा कोणती आहे, तर ती यंत्रणा माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे साहेबांकडे आहे. माननीय श्री.सुनील तटकरे साहेब, नगर आणि नाशिक जिल्हयात कितीही मोठे नेते असतील, त्यांचा विचार न करता मराठवाडयाचे जे हक्काचे पाणी आहे ते कर्तव्य कठोरतेने आपण उपलब्ध करुन दिले पाहिजे असा आग्रह करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, निसर्गाचे दृष्टचक्र आहे. ते मराठवाडया भोवती गरगरते आहे. गेल्या अनेक वर्षापासून ही घरघर सुरु आहे. ही घरघर दूर करणारा एखादा चक्रपाणी, एखादा चक्रधर या दृष्टीने आम्ही माननीय श्री.सुनील तटकरे साहेबांकडे बघतो आहोत. हा चक्रधर मराठवाडयाच्या वाटेला आलेली उपेक्षा आहे, ती दूर करण्यासाठी कर्तव्य कठोरतेने प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही.

" पान नाही, फुल नाही, आला ऋतू कुठे गेला,
भीर भीर पाखरांचा जीव झुरु लागला"

अशी स्थिती मराठवाडयाची आहे. पान नाही, फुल नाही, अतिशय भयावह चित्र आहे. "उपाशी पोटी,पाण्याच्या घोटी" आम्ही सर्व डोळे लावून पहातो आहे,आभाळ झळते आहे. या दुर्देवाच्या फेऱ्यातून आम्हाला कोण बाहेर काढणार आहे.

सभापती महोदय, आमचा बोलण्याचा धर्म आहे, बोलण्याचा आमचा स्वभाव आहे. मराठवाडा जे काही करावयाचे असते ते उघडपणे करतो. आम्ही राजरोस प्रेम करणारी माणसे आहोत. " प्यार किया तो डरना क्या " अशी भावना बाळगणारे आम्ही कार्यकर्ते आहोत. त्यामुळे आमची भावना आहे की, " यह दौलत भी ले लो, यह शोहरत भी ले लो. मगर लौटा दो हमें बचपन की यादें. " सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित ज्यावेळी हाफ पॅन्ट घालत होते. त्यावेळी गोदावरी नदी दुथडी भरुन वाहत असे. आज गोदावरी नदी कोरडी पडलेली आहे. ना अश्रू आहेत, ना टाहो आहेत, मूकपणे हा आक्रोश सुरु आहे. हा आक्रोश दूर करण्याची जबाबदारी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य शासनाची आहे आणि ती राज्य शासनाने पार पाडावी असा या प्रस्तावाच्या निमित्ताने आग्रह करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सगळयात जास्त भूभाग हा गोदावरी खोऱ्यामध्ये आहे. मराठवाडयातील जास्तीत जास्त भाग म्हणजे निम्यापेक्षा अधिक हा गोदावरीच्या खोऱ्यामध्ये येतो. यादवांचे साम्राज्य गोदावरीच्या खोऱ्यामध्ये फुलले, बहरले. तिच्या विस्तीर्ण भूप्रदेशामुळे गोदावरीस दक्षिण गंगा असे संबोधले जाते. या गोदावरी नदीच्या काठावर कुंभमेळा लागतो. अपाद मस्तक, भगवी वस्त्रे परिधान करणारे साधु संत, दिगंबर अवस्थेत राजरोसपणे कुंभमेळयात फिरणारे नागासंत इथपर्यंत दर्शन या कुंभमेळयात मिळते.

महोदय, गोदावरी ही महाराष्ट्राला आणि मराठवाडयाला समृध्द करणारी नदी आहे...

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

आमच्या संस्कृतीचे अनेक उगम या गोदावरीमध्ये पहावयास मिळतात. शिवरायांचे आठवावे रुप म्हणणारे समर्थ रामदास हे आमच्या मराठवाड्याचे आहेत. तरी आम्ही पाण्याच्या संदर्भात उपाशी राहणार असू तर मराठवाड्याला अतिशय गांभीर्याने विचार करावा लागेल. मराठवाडा जे प्रयत्न करतो त्यानुसार संघर्ष करण्यासाठी रस्त्यावर देखील येऊ शकतो. परंतु राज्यकर्त्यांनी आमच्यावर रस्त्यावर उतरण्याची वेळ येऊ देऊ नये.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे या ठिकाणी उपस्थित आहेत. पूर्वी लवादाने जो निर्णय दिला त्यानुसार गोदावरी खोऱ्यातील किती पाणी अडवायचे आहे, त्यापैकी किती पाणी अडविले आहे याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. गोदावरी खोऱ्यामध्ये उपनद्या आहेत. मध्य गोदावरी, दुधना, पूर्णा उपखोरे, लेणी उपखोरे मिळून 18.33 अब्ज घनफूट पाणी अडविले जाऊ शकेल असे शासन पत्र दिनांक 4.11.2011 मध्ये नमूद केलेले आहे. या पत्राच्या निमित्ताने मी शासनाला विचारु इच्छितो की, यापैकी किती पाणी अडविले गेले आहे आणि गेल्या 10 वर्षात याकरिता किती आर्थिक तरतूद करण्यात आली? आर्थिक तरतूद केली गेली नसेल तर पुढील 10 ते 15 वर्षाकरिता पाणी अडवावे लागणार आहे का? या प्रश्नाचे समर्पक उत्तर मंत्री महोदय देतील अशी मी या क्षणी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, भारताची संस्कृती आहे, विशेषत: शेजार धर्म पाळणे ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. भूक लाडू, तहान लाडू प्रवासी आपल्या पाठीवर घेऊन निघत असे. दुर्दैवाने नगर आणि नाशिक जिल्हयातील नेतृत्वाने भूक लाडू, तहान लाडू पाठीवर, पोटावर, कडेवर, खांद्यावर बांधून प्रवास सुरु केला. विठू माझा लेकुरवाळा. लेकुरवाळे नेतृत्व आम्हाला पाणी द्यायला तयार नाही. महाराष्ट्राचे नेतृत्व कसे करणार आहात?

सभापती महोदय, आमच्यासमोर अतिशय गंभीर मुद्दे उपस्थित झालेले आहेत. जायकवाडी भागामध्ये किती पाणी अडविले? गावतलाव भरुन घेतले. पाझर तलाव भरुन घेतले, मध्यम प्रकल्प भरुन घेतले, मोठे तलाव भरुन घेतले, गावामध्ये घागरी, लुटपुटे, पुटकुळे भरुन घेतले. किती हव्यासी असावे? सभापती महोदय, हा हव्यास अपूर्व असा आहे, अभूतपूर्व असा आहे. या हव्यासाचे उत्तर राज्य शासन निश्चितपणे देऊ शकते. घराबाहेर भिकारी आला तर त्याला सुध्दा पोटभर भाकरी आणि तांब्याभर पाणी देण्याची आपली संस्कृती आहे. हा महाराष्ट्र धर्म आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

वरच्या नेतृत्वाची महाराष्ट्र धर्माची शिकवण आहे. त्या शिकवणुकीच्या आधारे अंमलबजावणी करता का? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक द्यावे लागेल. निश्चितपणे गोदावरी नदी वरच्या भागातून खाली वाहते. आम्ही मान्य करतो की, दहीहंडी फोडण्याचा मान वरच्या थराला असतो. दहीहंडी फोडली म्हणजे सर्व प्रसाद फोडणारा घेतो असे नाही. तो प्रसाद खालच्या दिशेने वहात असतो. गोदावरीचा उगम वरच्या दिशेला आहे, परंतु गोदावरी खालच्या दिशेने वाहते. खालच्या भागामध्ये आम्ही आहोत.

नंतर जे.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

नगर आणि नाशिक जिल्हयाने हे विसरु नये की, सूर्य आमच्या पूर्व दिशेला उगवतो म्हणून आमचे सूर्य किरण तुम्ही घेऊ नका असे आम्ही म्हणावयाचे का ? असे आम्हाला म्हणता येणार नाही. नैसर्गिक न्यायाचे सूत्र सर्वांना समान आहे, समन्यायी वाटपाचे सूत्र जर राज्य शासनाने स्वीकारले असेल, माननीय राज्यपाल महोदय त्या सूत्राचा पुरस्कार करीत असतील, समन्यायी वाटपाचे आदेश देत असतील तर राज्यशासनाची जबाबदारी आहे की, मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मराठवाडयाला निश्चितपणे मिळालेच पाहिजे. आम्हाला मान्य आहे की, नाशिक आणि नगर जिल्हयात आमचे श्रीमंत भाऊ राहतात. ऐश्वर्य तुमच्याकडे आहे परंतु विचाराचे ऐश्वर्य आमच्याकडे आहे. लक्ष्मी तुमच्या घरात पाणी भरत असेल परंतु सरस्वती आमच्याकडे आहे.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात पुणे येथे एक विशेष अधिवेशन भरवण्यात आले होते. त्या अधिवेशनात माननीय श्री. शरद पवार साहेबांनी महाराष्ट्र धर्माची शिकवण पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांना दिली होती. माननीय पवार साहेब असे म्हणाले होते की, मराठवाडा हा तहानलेला आहे, मराठवाडयात दुष्काळ आहे, मराठवाडयातील जनता आज टाहो फोडत आहे त्यामुळे अशा परिस्थितीत नगर जिल्हयातील नेत्यांनी मराठवाडयाला पाणी देणार नाही अशी भूमिका घेणे योग्य नाही. अशी भूमिका तुम्हाला घेता येणार नाही. राज्यकर्ते म्हणून समन्यायी वाटप महाराष्ट्रात झाले पाहिजे. ज्यावेळेस माननीय श्री.शरद पवार हे सांगत होते त्यावेळेस माननीय श्री. शंकरराव कोल्हे माझ्या जवळ बसले होते. त्यावर माननीय श्री. कोल्हेसाहेबांची प्रतिक्रिया होती की, "चला पवार साहेबांनी आमची दखल घेतली." दखल घेण्यासाठी तुम्ही जर अशा प्रकारचा आकांत मांडत असाल तर तो महाराष्ट्राच्या दृष्टीने योग्य राहणार नाही.

सभापती महोदय,माझ्याकडे माजी मंत्री श्री. शंकरराव कोल्हे साहेबांचा लेख आहे. त्या लेखात त्यांनी म्हटले आहे की, "या प्रश्नावर आम्ही संघर्ष करुन ठेवलेला आहे. संजीवनी, कोपरगाव, गणेश नगर ही तिन्ही साखर कारखान्यांनी आपापल्या जिल्हयात पाणी अडवा, पाणी जिरवा मोहीम मोठया प्रमाणात राबवली आहे. नाले,नद्या,वळणे, जेथे जमीन मिळेल तेथे साठवण बंधारे बांधून मोठया प्रमाणात पाण्याला आम्ही आळा घातलेला आहे. गोदावरीच्या पात्रात आम्ही वसंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

बंधाऱ्यांची मालिका उभी केलेली आहे. यातील बरेचसे बंधारे साखर कारखान्यांनी पर्यायाने येथील शेतकऱ्यांनी पदरमोड करुन बांधलेले आहेत. आमच्या आर्थिक क्षमतेला शेवटी काही मर्यादा असल्यामुळे राज्य शासनाने पाणी अडविण्यास आम्हाला मदत करावी." या लेखावरुन एकच गोष्ट स्पष्ट होते की, शक्य तेवढे पाणी अडवायचे, मराठवाडयाच्या वाटयाला थेंबही पाणी जाऊ द्यावयाचे नाही. स्व. शंकरराव चव्हाण साहेबांनी त्या काळात जायकवाडी प्रकल्प उभा केला नसता तर आज औरंगाबाद, जालना, बीड, परभणी हे जिल्हे उपेक्षित राहिले असते. औरंगाबादची औद्योगिक नगरी उभी राहिली नसती. या भागांना पाणी पुरवठा झाला नसता तर जालन्याचे स्थलांतर करण्याची वेळ राज्य शासनावर आली असती. परंतु सुदैवाने शंकरराव चव्हाणांनी जायकवाडी प्रकल्प उभा केल्यामुळे ती वेळ आपल्यावर आलेली नाही. त्यामुळे एक प्रकारचे सूत्र ठरविण्याची आता वेळ आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

जो पर्यंत नाथसागर 10 टक्के भरत नाही तो पर्यंत वरच्या भागातील बंधारे 10 टक्के भरणार नाहीत. जेव्हा नाथसागर 20 टक्के भरेल तेव्हा आपले वरचे बंधारे 20 टक्के भरले पाहिजेत. ज्यावेळी नाथसागर 50 टक्के भरले त्यावेळी आपले वरचे बंधारे 50 टक्के भरले पाहिजेत. ज्यावेळी नाथसागर 100 टक्के भरले त्यावेळी आपले वरचे बंधारे 100 टक्के भरले पाहिजेत. हे सूत्र राज्य सरकारने स्वीकारले तर मला वाटते की, मराठवाड्याच्या वाट्याला आवश्यक ते पाणी येऊ शकेल.

या निमित्ताने मला स्व.श्री.विलासराव देशमुख यांची आठवण येते. मराठवाड्यासाठी 25 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय श्री.विलासराव देशमुख यांनी अतिशय धाडसाने घेतला. पण त्यानंतर काय झाले ? गेल्या अनेक वर्षामध्ये किती तरतूद करण्यात आली. किती पाणी उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्याला मिळाले आहे. आंध्र सरकारने नवीन लवादा समोर आपले म्हणणे मांडले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, बच्छावत आयोगा समोर महाराष्ट्र शासनाने स्पष्ट केले आहे अधिक पाणी व अधिक प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाला आता नवीन पद्धतीने पाणी अडविता येणार नाही. अशा प्रकारची हरकत आंध्र सरकारने घेतली आहे. एकीकडे आपले शासन म्हणते की, मराठवाड्यासाठी 25 टीएमसी पाणी देणार आहोत. नवीन लावादा समोर हे प्रकरण सुरू आहे. मग आपण भीमा नदीवर स्थिरीकरण कसे करणार आहात ? स्थिरीकरण केल्याशिवाय पाणी उचलता येणार नाही. वाहते पाणी मोजून घेण्याचे तंत्रज्ञान अजून विकसित झालेले नाही. जो पर्यंत पाणी स्थिर करता येत नाही तो पर्यंत ते उचलता येणार नाही. तेव्हा 25 टीएमसी पाणी आपण मराठवाड्याला कधी देणार आहात, हा ही एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

या निमित्ताने माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे साहेबांना माझी विनंती आहे की, आपण तटावर उभे राहून समेष्टीचे दर्शन घेऊन नका. आपल्याकडे मराठवाडा अपेक्षेने पहात आहे. रामशास्त्री प्रभुणेंची भूमिका आपण वठवावी. मराठवाड्याचा वाटा मराठवाड्याला मिळाला पाहिजे. हे पाणी आमच्या हक्काचे आहे. नगर आणि नाशिक जिल्हा आमच्यावर उपकार करीत नाही. आमच्या हक्काचे पाणी मिळणार नसेल तर श्री.तटकरे साहेब संपूर्ण मराठवाडा आपल्या दारात येऊन बसेल. मग मराठवाड्याला पाणी देणे शक्य होऊन जाईल. त्यामुळे या निमित्ताने माझी विनंती आहे की, आमच्या हक्काचे पाणी आमच्या मराठवाड्याला द्यावे. मराठवाड्यामध्ये आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

प्रचंड दुष्काळ आहे. लोक वणवण फिरत आहेत. पाण्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई आहे. अशा परिस्थितीत आपण निर्णय घोषित केला पाहिजे. यात काल मर्यादा अत्यंत महत्त्वाची आहे. एवढ्या कालावधीमध्ये आम्ही सर्व पाणी अडविणार अशा प्रकारची कालमर्यादा आपण निश्चित करून पुढील तीन ते पाच वर्षामध्ये मराठवाड्याच्या हक्काचे पाणी आम्ही अडवून मराठवाड्याला देणार अशी घोषणा केली तर मराठवाड्यातील जनता निश्चितपणे आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देईल. मराठवाड्यातील जनतेचे धन्यवाद घेण्यासाठी आपण नि:पक्षपणे तो निर्णय जाहीर करावा एवढया अपेक्षेसह थांबतो. धन्यवाद.

.....

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाचा मराठवाड्यातील मी एकमेव सदस्य असल्यामुळे मला या प्रस्तावावर बोलण्यासाठी लवकर संधी मिळाली.

सभापती महोदय, माझे शिक्षण पुणे येथील सिम्बॉयसिस कॉलेज येथे झाले. मी शिकण्यासाठी सिम्बॉयसिस कॉलेजमध्ये होतो, रहायला मराठवाडा हॉस्टेलला होतो आणि जेवायला बारामती हॉस्टेलला जायचो. कारण मराठवाडा हॉस्टेलमध्ये मेस नव्हती आणि बारामती हॉस्टेलची मेस चांगली होती. आम्ही जेवण्यासाठी बारामती हॉस्टेलमध्ये जायचो त्यावेळी तेथे राहणारे विद्यार्थी आमच्याकडे एका मागासलेला भागातून आलेला विद्यार्थी या नजरेने पहायचे. त्या वेळच्या आणि आताच्या वेळच्या परिस्थितीमध्ये काहीही फरक झालेला नाही. आज आम्ही मराठवाड्यातील आमदार म्हणून महाराष्ट्रातील इतर भागांमध्ये फिरतो, महाराष्ट्राच्या बाहेर फिरतो त्यावेळी आम्ही आमचा गाव, जिल्हा व विभाग सांगितल्यानंतर तेथील लोक आम्हाला आपण मराठवाड्यातील मागासलेल्या भागातील आहात काय असे प्रश्न विचारतात. तेव्हा माझा आपल्यामार्फत सरकारला प्रश्न आहे की, मराठवाड्याचे सिंचनाच्या बाबतीतील मागासलेपण दूर करणार आहात की नाही ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मराठवाड्यातील पाण्याच्या संदर्भात चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आज या चर्चेच्या निमित्ताने संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांच्या उत्तराकडे लागले आहे.

सभापती महोदय, मराठवाडा मागासलेला आहे त्यास अनेक कारणे आहेत. या कारणांमध्ये बरीचशी जबाबदारी आमची आणि आमच्या अगोदरच्या नेते मंडळींची सुध्दा आहे. मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळविण्यासाठी पूर्वीचे लोकप्रतिनिधी कमी पडले की काय असा प्रश्न आमच्या मनात आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी येथे स्व.शंकरराव चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे जायवाडी प्रकल्प झाला असा उल्लेख केला. माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांनी 25 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय घेतला त्याचा येथे उल्लेख झाला. मराठवाड्यातील मांजरा नदीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ....

बॅरेजेस बांधण्याचे काम स्व.विलासराव देशमुख यांनी केले. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार आणि माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी गोदावरी नदीवर बॅरजेस केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, आजचा प्रस्ताव हा निव्वळ उत्तरेकडून आणि पश्चिमेकडून येणाऱ्या पाण्याच्या संदर्भात आहे. आम्हाला आमच्या हक्काचे 25 टीएमसी पाणी केव्हा मिळणार आहे ? जायकवाडीच्या 18 टीएमसी पाण्याच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा. या दुष्काळाच्या काळात मराठवाड्याला पाण्याची भीक दिली अशा प्रकारे मराठवाड्याला पाणी सोडण्यात आले. आमच्या हक्काचे पाणी आम्हाला भीक म्हणून घ्यावे लागते हे आमचे दुर्देव आहे. तेव्हा मराठवाड्यातील जनतेच्या मनास कोणत्या प्रकारच्या वेदना होत असतील याचा विचार व्हावा. आमच्या वेदनांचा विचार सरकार करणार की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलताना सरकारला दोष देण्यात मला रस नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

आज अनेक गोष्टी या ठिकाणी करता येऊ शकतात. कृष्णा मराठवाडा प्रकल्पाचे काम एक वर्षापासून बंद आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे जवळजवळ 47 कोटी रुपये थकले आहेत. कंत्राटदारांची 221 कोटी रुपयांची देणी बाकी आहे. कृष्णा मराठवाडा प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता 3300 कोटी रुपयांची होती. परंतु आज हा प्रकल्प 4 हजार कोटी रुपयांवर गेला आहे. परंतु 2013-14 च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी केवळ 75 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यावरुन सरकारची मानसिकता मराठवाड्यातील जनतेसमोर येत आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, यामध्ये काही बदल होणार आहे की नाही ?

महोदय, कृष्णा मराठवाडा प्रकल्प खरोखरच पूर्ण करावयाचा असेल आणि शासनाची तशी मानसिकता असेल तर 2013-14 च्या अर्थसंकल्पात केवळ 75 कोटी रुपयांची तरतूद करुन कसे भागणार ? हा प्रकल्प 75 कोटी रुपयांत पूर्ण होऊ शकत नाही. हा प्रकल्प पूर्ण करावयाचा असेल तर 3 वर्षांचा कालबध्द कार्यक्रम हाती घ्यावा लागेल. त्यानंतर दर वर्षी होणाऱ्या नैसर्गिक वाढीप्रमाणे प्रकल्प किंमतीत प्रती वर्षी किमान 15 टक्के वाढ करावी लागेल. या प्रकल्पाची आजची किंमत 4 हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. दर वर्षी 15 टक्के वाढीप्रमाणे तीन वर्षात प्रकल्पाच्या किंमतीत 45 टक्के वाढ होईल. अशा परिस्थितीत हा प्रकल्प कसा पूर्ण होणार ?

महोदय, मराठवाड्यातील गोदावरी खोऱ्यात नवीन 18 टीएमसी पाणी साठविण्याची परवानगी आहे. मात्र माननीय राज्यपालांनी नियम 28 (क) अंतर्गत सिंचनाच्या बाबतीत ज्या अटी घातल्या आहेत त्यामुळे हे शक्य होईल की नाही हा प्रश्न सर्वांच्या मनात आहे. नियम 28 (क) च्या अटीमुळे मराठवाड्यातील अनेक प्रकल्प प्रलंबित आहेत. एकट्या बीड जिल्ह्यातील 74 प्रकल्प आज प्रलंबित आहेत. बीड जिल्ह्यातील परळी-16, अंबेजोगाई-11, धारुर-15, वडवणी-6, माजलगांव-5, बीड-7, केज-5, शिरुर-5 आणि पाटोदा-4 असे प्रकल्प प्रलंबित आहेत. आज पाटोदा आणि आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला आहे. पाटोदा तालुक्यातीत 4 प्रकल्प या अटीमुळे प्रलंबित आहेत. परळी आणि अंबेजोगाई वगळता उर्वरित तालुके अवर्षणप्रवण यादीमध्ये समाविष्ट आहेत. या परिस्थितीचा विचार करुन माननीय मंत्री महोदयांची या बाबत उत्तर द्यावे.

महोदय, बीड जिल्ह्यातील सर्वात मोठ्या असलेल्या कुंडलिका प्रकल्पाचे काम सुरु आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

शासनाच्या प्रयत्नातून या प्रकल्पाचे 80 टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पामुळे सबंध वडवणी तालुका दुष्काळातून कायमस्वरुपी बाहेर पडणार आहे. तसेच 25 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या प्रकल्पाचे केवळ 20 टक्के काम शिल्लक आहे. 20 टक्के काम पूर्ण करण्यासाठी 75 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. परंतु या वर्षी या कामासाठी तरतूदच झाली नाही. केवळ 25 कोटी रुपयांचीच तरतूद केली आहे. शेतकऱ्यांचे 22 कोटी रुपये आणि पुनर्वसनाचे 9 कोटी रुपये अजूनही द्यावयाचे आहेत. कुंडलिका प्रकल्प पूर्ण होण्यासारखा असताना केवळ पुरेशा निधी अभावी तो पूर्ण होऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे.

महोदय, परळी आणि अंबेजोगाई हे तालुके सधन मानले जातात. गेल्या वर्षी या दोन तालुक्यांत परतीचा पाऊस चांगला झाल्यामुळे दोन्ही तालुक्यातील सर्वा धरणे 100 टक्के भरली. परळी आणि अंबेजोगाई तालुक्यात सर्वात मोठी वाण नदी वाहे. या नदीवर नागापूरचे सर्वात मोठे धरण आहे. आजही ते धरण 80-90 टक्के भरलेले आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ...

या वाण नदीवर साखळी बंधाऱ्यांची मागणी तेथील सामान्य जनतेकडून होत आहे. त्याचे प्रस्ताव दीड वर्षापासून शासनाकडे पडलेले आहेत. हे साखळी बंधारे जर झाले आणि जर शासनाने मराठवाड्यातील सिंचनाचा प्रश्न खऱ्या अर्थाने मार्गी लावला तर पुढची पिढी मराठवाड्यातील कोणत्याही माणसाला मागासलेल्या भागातून आलेला असे संबोधणार नाही. एवढे उपकार शासनाने आमच्यावर करावे अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आमच्या जिल्ह्यातील मोठे, मध्यम प्रकल्प आणि साठवण तलावांना एकूण 1552 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. याकरिता गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी केंद्र शासनाकडे सहा महिन्यांपूर्वी प्रस्ताव पाठविलेला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी येथील कृष्णा खोरे अंतर्गत मराठवाडा उपसिंचन क्रमांक 3 या मोठ्या प्रकल्पासाठी 700 कोटी रुपयांची, आताच सांगितल्याप्रमाणे वडवली तालुक्यातील कुंडलिका प्रकल्पासाठी 90 कोटी रुपयांची आवश्यकता आहे व शिरुर तालुक्यातील सिंदफणा धरणाची उंची वाढविण्यासाठी आणि जिल्ह्यातील 74 ठिकाणच्या साठवण तलावांच्या कामांसाठी 648 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. या निधीची तरतूद कधीपर्यंत करणार आणि हे प्रलंबित प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण होणार याचे उत्तर आम्हाला अपेक्षित आहे.

सभापती महोदय, आमच्या जिल्ह्यामध्ये प्रत्येक वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो. संपूर्ण महाराष्ट्रात तीच परिस्थिती आहे. सिंचनाच्या बाबतीत शासनाने मराठवाड्याला जर थोडासा आधार देण्याचा प्रयत्न केला तर नक्कीच मराठवाड्याचे मागासलेपण दूर झाल्याशिवाय राहणार नाही. आपण विधिमंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले तसेच स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे केले. या वर्षी आपण स्व. वसंतरावजी नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. महाराष्ट्रातील जनता पुन्हा या नेतृत्वांना उभे करु शकत नाही परंतु आज दुष्काळी परिस्थितीमध्ये महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील जनता या ठिकाणी उपस्थित असलेल्या राज्यकर्त्यांमधील कोणाकडे यशवंतरावजी चव्हाण म्हणून, कोणाकडे वसंतराव नाईक म्हणून तर

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

कोणाकडे शंकररावजी चव्हाण म्हणून पाहात आहे. त्यांच्या नेतृत्वातून या महाराष्ट्राचा जो विकास झाला तसाच आपल्या नेतृत्वातून सुध्दा आमच्या मराठवाड्याच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लावावा एवढीच कळकळीची विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सन्माननीय श्री. चव्हाण साहेबांपासून आजपर्यंत राज्यामधील शेती बागायती झाली पाहिजे असे प्रयत्न सातत्याने सर्व नेत्यांनी केलेले आहेत. ज्यावेळी श्री. वसंतदादा पाटील या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी अनुशेषाचा प्रश्न निर्माण झाला आणि त्यातून वैधानिक विकास मंडळे निर्माण झाली. त्यानंतर माननीय श्री. पवार साहेब राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी पाटबंधारे प्रकल्पांना अधिक प्रमाणात पैसे द्यावेत अशा प्रकारचा प्रयत्न झाला. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून या महाराष्ट्रामध्ये शेतीला जास्तीचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे काम महाराष्ट्रामध्ये झाल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे ग्रामीण भागातील जी अर्थव्यवस्था आहे ती निश्चितपणे बदललेली पहावयास मिळते. परंतु हे पाहात असताना काही भागामध्ये दुष्काळ आहे. दुष्काळ असल्यामुळे त्या ठिकाणी पाणी नाही. लोकांना काम नाही, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, लोकांचे स्थलांतर होत आहे, असे चित्र आपल्यासमोर आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे मराठवाड्याला पाणी मिळाले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील....

राज्यातील 1972 सालातील दुष्काळ पाहिला तर त्यावेळी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नव्हता, अन्नधान्याचा व लोकांना काम देण्याचा प्रश्न होता. परंतु आज महाराष्ट्रामध्ये पिण्याच्या पाण्याचा भयानक प्रश्न निर्माण झालेला आहे. 250 फूट खाली गेले तरी बोअरला पाणी लागत नाही. यावेळी लोकांना काम देण्याचा किंवा अन्नधान्याचा प्रश्न नाही. पुढील काळाबाबत चर्चा करीत असताना गेल्या 10 वर्षांपासून पिण्याचे पाणी मागणारे व मिळविणारे लोकप्रतिनिधी आपल्याला पहावयास मिळतात. त्यांना न्याय देण्याचे काम सरकारने केलेले आहे हे पहावयास मिळते.

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी 25 टीएमसीच्या प्रकल्पाचा उल्लेख केला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, 2004 साली कृष्णा स्थिरीकरणाच्या प्रकल्पाला मंजुरी देण्याचे काम त्यावेळच्या सरकारने केलेले आहे. आदरणीय श्री.शरदराव पवार यांनी या प्रकल्पाला मंजुरी देण्याचा आग्रह धरला होता. त्यावेळी माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री व मी उप मुख्यमंत्री होतो. दुष्काळी भागातील पाणी द्यावयाचे असेल तर ज्या भागात जास्त पाऊस पडतो त्या भागातील पाणी दुष्काळी भागात आणले पाहिजे अशा प्रकारची योजना राबविण्याची सूचना आदरणीय श्री.पवार साहेबांनी सरकारला केली होती. त्यामुळे कृष्णा स्थिरीकरणाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याचे काम सरकारने केलेले आहे. मराठवाड्याला 25 टीएमसी पाणी देण्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्यासाठी नियोजन कसे करावयाचे हे सुध्दा सरकारने ठरविले पाहिजे. त्यानंतर कृष्णा स्थिरीकरणातून मराठवाड्याला 25 टीएमसी पाणी देण्याचे नियोजन झालेले आहे. त्यानुसार एका बाजूचे कामही सुरु झालेले आहे.

54 टीएमसी पाणी उजनी धरणामध्ये साचते. साचलेले पाणी पूर्णपणे वापरले जाते, त्यातून काहीच शिल्लक राहत नाही. मागील वर्षी 114 टक्के धरण भरुन सुध्दा 35 टीएमसी पाणी वर गेले. परंतु त्या धरणाच्या पुढील कामासाठी तरतूद केली जाणार किंवा नाही ? हा महत्वाचा विषय आहे. मला आपल्यामार्फत माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगावयाचे आहे की, या प्रकल्पाचे नियोजन केले तरी 115 टीएमसी पाणी कोल्हापूर जिल्ह्यातून वाया जाते, ते पाणी समुद्रात जाते, आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यांमध्ये जाते. ते वाया जाणारे पाणी उजनीमध्ये आणावे. अशा प्रकारच्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील.....

योजनेला मंजुरी दिलेली आहे, परंतु त्या कामाला निधी देण्याची आवश्यकता आहे. उजनी प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे आणि वाढत जाणार आहे. 10 वर्षांनी आणखी वाढणार आहे. त्या धरण्याच्या कामाला सुरुवात करणार की नाही, निधी देणार की नाही ? सभागृहात माननीय उप मुख्यमंत्री, माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. त्यांनी मागील कामाला गती द्यावी, निधी द्यावा व सोलापूर जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न सोडवावा अशी विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देतो आणि येथेच थांबतो.

3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मराठवाड्यातील सर्व सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये हा प्रस्ताव मांडला आहे. त्याबद्दल सर्वांचे स्वागत करण्यासाठी व या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आमच्या भागातील सन्माननीय सदस्यांची उपस्थिती कमी आहे. आमच्या भागातील मंत्री महोदयही उपस्थित नाहीत. त्यांना या प्रश्नाचे काही घेणे देणे नाही हे आमचे दुर्दैव आहे असे मी मानतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी हा प्रश्न चर्चेला आणला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यामुळे निदान मराठवाड्यातील काय परिस्थिती आहे ती जनतेसमोर येणार आहे. त्यामुळे सर्वांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, उत्तर महाराष्ट्राची परिस्थिती मराठवाड्यापेक्षा वेगळी नाही. मराठवाड्यासाठी पाणी सोडावे किंवा मराठवाड्याला पाणी द्यावे या मागण्या रास्त आहेत. परंतु त्यासाठी आमच्या भागात पाणी पाहिजे. आमच्या भागातच पाणी नाही तर आम्ही सोडणार कोठून ? हा प्रश्न उपस्थित होतो. मनमाड सारख्या शहराला 40 दिवसातून एकदा पाणी सोडले जाते एवढे पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झालेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे....

रविवारच्या "सकाळ" वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीचा मी येथे उल्लेख करु इच्छितो. त्या बातमीमध्ये असे म्हटलेले आहे की, यवतमाळ तालुक्याची परिस्थिती अशी आहे की, त्या ठिकाणी लोकांना खाण्यासाठी काही नाही आणि पिण्यासाठी पाणी नाही. त्या भागातील जनता एकत्र येऊन कोरड्या भाकरी जमा करते, त्या सुकविते आणि खाते. कोरड्या भाक-या सुकवून खाण्याची पाळी लोकांवर आलेली आहे. एवढे मोठे दुर्भिक्ष आमच्या भागामध्ये आहे. उत्तर महाराष्ट्रामध्ये खूप पाणी आहे आणि आम्ही ते सोडत नाही अशी परिस्थती नाही. नाशिक जिल्ह्याचे 50 टक्के पेक्षा अधिक पाणी मुंबई शहराला पिण्यासाठी दिले जाते. आमच्याकडे पाणीच नाही. आज मॉरिशस आणि चेन्नई सारखा ठिकाणी समुद्राचे पाणी शुद्ध करुन त्याचा पिण्यासाठी वापर केला जातो. त्याप्रमाणे मुंबईच्या समुद्राचे पाणी शुद्ध करुन ते मुंबईच्या जनतेला दिले तर आमचे पाणी आमच्या वाट्याला परत येईल आणि ते आम्हाला खाली देखील सोडता येईल, ते सोडण्यामध्ये कोणतीही अडचण राहाणार नाही.

सभापती महोदय, आज तापी खो-यामध्ये तापी नदीची मोठी उपनदी गिरणा नदी आहे. या गिरणा नदीतून वर्षाकाठी एक थेंब देखील पाणी वाहत नाही. ही गिरणा नदी शंभर टक्के कोरडीझ ालेली आहे. वाळू माफियांनी या नदीच्या पात्रामध्ये वाळूचा एक कण देखील शिल्लक ठेवलेला नसल्यामुळे या परिसरामध्ये देखील पाण्याचा खूप मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे आमचा अर्धा नाशिक जिल्हा हा शंभर टक्के दुष्काळी आहे. ही आज आमची परिस्थिती आहे. तापी नदीमध्ये पाणी आहे. जळगाव आणि नंदूरबार जिल्ह्यामध्ये आपण काही बॅरेजेस केले. पण त्याच्या चा-या न झ ाल्यामुळे तेथील लोकांना पाणी दिसतेय पण ते मिळत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.येणा-या काळात या चा-या लवकरात लवकर करुन या भागातील शेतक-याला पाणी मिळेल या दृष्टीने उपाययोजना होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, पुनत सारखा नवीन प्रकल्प करण्यात आला. परंतु या प्रकल्पामुळे खालचे सर्व पाणी बंद झाले. पुनतचे पाणी फक्त कळवण तालुक्याला मिळत आहे. बागलाण आणि मालेगाव तालुक्यामधून हे पाणी वाहून येऊन ते गिरणा डॅममध्ये जाऊन खाली जात होते. हे पाणी बंद झ ालेले आहे. परिणामी गिरणातून आणखीनच पाणी कमी झाले आहे ही परिस्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अपूर्व हिरे...

सभापती महोदय, मी काल देखील माझ्या भाषणामध्ये नारपार सारख्या योजनेचा उल्लेख केला. नारपार योजनेची मागणी आम्ही अनेक वर्षे करीत होतो. नार,पार,तार, दमणगंगा या पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी पूर्वकडे वळविले तर हे पाणी आमच्या नद्यामध्ये सोडता येईल आणि ते पाणी खालपर्यंत जाईल आणि हा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. आमच्या नद्यामध्ये पाणीच नाही. जोपर्यन्त पाणी येत नाही तोपर्यन्त ते सोडायचे कुठे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून सर्वप्रथम या नद्यांमध्ये पाणी येणे गरजेचे आहे. त्यासाठी हा प्रकल्प करणे गरजेचे आहे. गुजराथ सारख्या राज्याने करार केला, महाराष्ट्राने देखील करारावर स्वाक्षरी केली. या नद्यांचे केवळ 10 टक्के पाणी आपल्या राज्याला मिळेल, उर्वरित पाणी गुजराथ राज्यात जाईल. हा संपूर्ण करार रद्द व्हावा यासाठी सुप्रीम कोर्टामध्ये पीआयएल दाखल करण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे. आम्हाला देखील पाण्याचा वाटा वाढवून मिळावा अशी आमची मागणी आहे. हे घडू शकले तर आम्हाला देखील पाणी सोडायला कोणतीही अडचण येणार नाही आणि ते घडले. यामधील दुसरा टप्पा हा आहे की, आमचे 27 वळण बंधारे उभे राहिले तर आमच्याकडेही मोठ्या प्रमाणावर पाणी अडू शकेल आणि उन्हाळयामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष कमी होण्यास मदत होईल.

सभापती महोदय, या ठिकाणी प्रत्येक जण आम्हाला पाणी द्या, आम्हाला पॅकेज द्या, अशी मागणी करतात. मागणी मान्य होत नसेल तर "आम्ही चाललो" अशी भूमिका घेतात. निदान आम्ही अशा प्रकारची मागणी करीत नाही ही आमची चूक आहे की असा प्रश्न मला अनेकदा पडतो. माननीय राज्यपाल महोदयांची मी आज भेट मागितली आहे. मी सर्व प्रस्ताव तयार केलेला आहे. मराठवाडा आणि विदर्भाच्या संदर्भात ज्या प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत तशा पद्धतीचे निर्देश उत्तर महाराष्ट्राच्या बाबतीत देखील द्यावेत, आमच्या वाट्याला येणारे पाणी थोडया फार प्रमाणात का होईना आम्हाला द्यावे अशी विनंती माननीय राज्यपाल महोदयांकडे करणार आहे. आमच्याकडे पाणी नसताना देखील पाणी द्या, पाणी द्या असा टाहो फोडला जात आहे. हे पाणी दिले तर आम्हालाच पिण्यासाठी पाणी राहाणार नाही अशी आजची परिस्थिती आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे...

अशीच परिस्थिती राहिली तर मराठवाडयातील पिण्याच्या पाण्याचे टँकर्स आमच्या विभागात वळवावे लागतील.

सभापती महोदय, नाशिक जिल्हयांमध्ये गोदावरी नदीवर गंगापूर हे मोठे धरण आहे. त्या ठिकाणी अजून दोन लहान धरणे आहेत. ही तिन्ही धरणे नाशिक शहरालाच पिण्याचे पाणी पुरविण्याचे काम करतात. या धरणातील थोडेही पाणी शेतीसाठी मिळू शकत नाही. या धरणातील 100 टक्के पाणी हे पिण्यासाठी दिले जाते. नाशिक महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी 5 हजार कुटुंबे रहावयास होतात. या कुटुंबांची निर्वाहाची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे ही संपूर्ण जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर येते. शहरीकरण वाढत असल्यामुळे प्रथम पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन दिले जाते. त्यामुळे आमच्या ग्रामीण भागातील शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नाही अशी दुर्देवी परिस्थिती आहे. या गोष्टीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे आणि उत्तर महाराष्ट्राला देखील सर्व दृष्टीने न्याय देण्याचा प्रयत्न करावा अशी मी मागणी करतो आणि या प्रस्तावाच्या सूचनेवरील माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख (नामनियुक्त) : सभापती महोदय, माझ्यासह माझे सहकाऱ्यांनी नियम 260 अन्वयेच्या प्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जायकवाडी धरणातील 21 टी.एम.सी.पाणी मिळावे म्हणून सभागृहात सखोल चर्चा होत आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांचे स्वप्न होते की, महाराष्ट्र सुजलाम-सुफलाम झाला पाहिजे आणि महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात समान विकास झाला पाहिजे. जायकवाडी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्या प्रकल्पातून सिंचनाच्या योजना सुरु करण्यात आल्या. त्यामुळे या सिंचन योजनेसाठी बरेचसे पाणी अडविले गेले. पर्यायाने जायकवाडी धरणात येणारे पाणी कमी झाले. जायकवाडी धरणाचे जनक म्हणून स्व.शंकरराव चव्हाण यांची आठवण आल्याशिवाय रहात नाही. स्व.शंकरराव चव्हाण यांची जन्मभूमी पैठण आणि कर्मभूमी नांदेड होती. त्यावेळेस त्यांनी निर्णय घेतला की, मराठवाडयातील जनतेच्या व्यथा आणि अडचणी लक्षात घेऊन जायकवाडी धरण पैठण येथे झाले पाहिजे आणि त्या धरणाचे पाणी नांदेड जिल्हयापर्यंत गेले पाहिजे.

महोदय,भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एका वर्षाने मराठवाडयास स्वातंत्र्य मिळाले. भारताला दिनांक 15 ऑगस्ट, 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर मराठवाडयास दिनांक 17 सप्टेंबर, 1948 रोजी स्वातंत्र्य मिळाले. मराठवाडा कोणतीही अपेक्षा न करता, कोणत्याही अटी न टाकता महाराष्ट्रात सामील झाला. मराठवाडयावर अन्याय होऊ नये एवढी एकच अपेक्षा मराठवाडयातील लोकांची होती. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आपण सगळे एकच आहोत, परंतु जायकवाडी धरणाची क्षमता 102 टी.एम.सी.एवढी आहे. जायकवाडी धरणाच्या वरच्या बाजूस नगर आणि नाशिक या जिल्हयांमध्ये धरणे झाल्यामुळे तेवढे टी.एम.सी.पाणी जमा होत नाही. त्यामुळे बऱ्याच अडचणी आता येऊ लागलेल्या आहेत.

सभापती महोदय, आज मराठवाडा दुष्काळात होरपळतो आहे. या ठिकाणी आमचे मित्र सन्माननीय सदस्य डॉ.प्रशांत हिरे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागात पिण्यासाठी पाणी नाही. मी या चर्चेच्या अनुषंगाने एवढेच सांगू इच्छितो की, ज्यावेळी जायकवाडी धरण झाले, त्यानंतर 185 टी.एम.सी.ची धरणे झाली. जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ही धरणे झाली नसती तर जायकवाडी धरण पाण्याने भरले असते आणि मराठवाडयाच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख...

वाट्याला येणारे पाणी मराठवाडयास मिळाले असते. स्व.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री यांचा मी आवर्जून उल्लेख करतो की, त्यांच्या प्रयत्नांमुळे 25 टी.एम.सी.पाणी मराठवाडयाच्या वाटेला आलेले आहे. परंतु निधी अभावी ते पाणी सुध्दा मराठवाडयास मिळालेले नाही. त्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र यांच्यामध्ये नातेसंबंध आहेत. हे सर्व विभाग एकमेकाचे सोयरे आहेत. एका सोयऱ्याने दुसऱ्या सोयऱ्याची व्यवस्था करावयाची असते कारण सोय करील तो सोयरा. पश्चिम महाराष्ट्राने मराठवाडयातील माणसे उदार आहेत म्हणून मराठवाडयासमवेत सोयरीक जमविली. पश्चिम महाराष्ट्र मराठवाडयास निश्चितपणे पाणी उपलब्ध करुन देतील आणि आमची त्यांच्या बरोबर असलेली सोयरीक कायम राहील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे साहेब उपस्थित आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, सोयरीक टीकविण्याचे काम त्यांनी जरुर करावे आणि मराठवाडयातील सिंचन प्रकल्पाला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा. मराठवाडयातील जनतेचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि या प्रस्तावावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, प्रथमत: आपल्याला विनंती करतो की, या सदनामध्ये अनुशेष आणि मागास भागाच्या संदर्भात अनेकवेळा चर्चा झालेली आहे. मी त्या चर्चेमध्ये सहभाग घेतलेला आहे. परंतु प्रत्येक वेळेला अनुशेष आणि विदर्भ हाच विषय असायचा. बऱ्याच कालावधीनंतर मराठवाड्यातील अनुशेष आणि पाण्याच्या संदर्भात चर्चा उपस्थित झालेली आहे. मराठवाड्याच्या भावना व्यक्त करण्यासाठी आपण या चर्चेला पुरेसा वेळ द्यावा अशी विनंती करतो. मी आदरणीय सभापतींनी भेटून तशी विनंती केली आहे.

सभापती महोदय, मराठवाड्याचे भगीरथ पुत्र स्व.शंकरराव चव्हाण यांना अभिवादन करुन मी माझ्या भाषणाला सुरुवात करीत आहे. निजामाच्या तावडीतून मुक्त झाल्यानंतर मराठवाडा हा भूप्रदेश स्वतंत्र भारताबरोबर महाराष्ट्रामध्ये बिनशर्त सामील झाला. आम्ही समृध्दीचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नामधून मी आज या ठिकाणी बोलण्यासाठी उभा असताना मराठवाडयात काय परिस्थिती निर्माण झाली आहे याबाबत मला सूचलेल्या भावना मी प्रथम व्यक्त करतो.

आकाशाला हास म्हणालो, चुकले का काही?
काळ्या माऊलीला बाज म्हणालो, चुकले का काही?
घुंगरांना बाज म्हणालो, चुकले का काही?
वासराला हंबर म्हणालो, चुकले का काही?
गोफणीला चाळ म्हणालो, चुकले का काही?
बांधावर भाकरी खाईन म्हणालो, चुकले का काही?
खळ्याला वारा घालीन म्हणालो, चुकले का काही?
जागायला जाईन म्हणालो, चुकले का काही?
होय चुकलेच.
पाऊस पडत नाही,
नदी नाले वहात नाही,
विहीर गाडगे भरत नाही,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मातीची तहान भागत नाही,
मायबाप सरकार बघत नाही,
लूट करणारे थांबत नाही,
चुकलंच माझं, साद चुकली,
अडण चुकली, घर घरोट्याची चालही थांबली.

सभापती महोदय, मी रात्रंदिवस त्या भागात असतो, फिरताना जे जाणवले ते या निमित्ताने व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. आमची मुस्कटदाबी करण्याबद्दलचा निर्धार न्यायालयाच्या माध्यमातून करण्याचा घोर अपराध सरकार करीत असताना आम्ही काही करु शकत नाही. पावसाने झोडले, वाऱ्याने फटकारले, सरकारने झोपडले तरी कोणाकडे बघायचे अशी मराठवाडा आणि विदर्भाची परिस्थिती आहे. सन्माननीय महाअधिवक्ता यांनी न्यायालयात शपथपत्र दाखल केले आणि न्यायाधीश आपल्या निकालपत्रात असे नमूद करतात की, "On the other hand, Learned Advocate General submits that merely because the Governor has to refer to data concerning physical backlog, efficiency of implementation of the previous years spending, needs of region in physical terms, it does not mean that the Governor is to decide as to which project in a particular region is to be taken up or is to be given priority or to set deadline for completion of a particular project. It is submitted that any reference to such target, deadlines or objectives of the physical work or elimination of physical backlog or comments on any aspect of governance are always given highest respect by the State Government and they will be taken into consideration, but they cannot be treated as binding directives under Article 371(2) of the Constitution."

नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीत प्रत / मुद्रितेसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

अशा प्रकारे आत्मघातकी विदर्भ, मराठवाडा, कोकण व उत्तर खानदेशमधील जे मागासलेले भाग आहेत त्यांच्या संदर्भात जेव्हा ॲडव्होकेट जनरल न्यायालयात सांगतात तेव्हा सरकारची मानसिकता स्पष्ट होते. सरकारची मानसिकता स्पष्ट होत असतांना त्यासंदर्भात माननीय राज्यपाल महोदयांना भेटलो असता त्यांनी निधी वाटपाच्या संदर्भातील 15 डिसेंबर, 2001 चे आदेश दिले होते व ते आदेश सदनापुढे आले होते. त्या आदेशामध्ये असे म्हटले होते की, "At the time of fresh Assessment of Backlog after 4 years, if necessary region rather than district or taluka should be the basis which will also address the problem of irremovability of backlog in certain districts."

या आदेशाला अनुसरुन माननीय राज्यपाल महोदयांनी 19 मार्च, 2010 रोजी या सदनाला असे सांगितले की, "As pointed out in the directives of 27 May 2009, after liquidation of the backlog as estimated in 1994 there may be an option of assessing the backlog created after 1st April 1994 till date by using the same indicators suggested by the Indicators and Backlog Committee. The drawback of this arrangement is that the issue of backlog remains open ended and dynamic. The reason is that after liquidation of the existing financial backlog the State average is bound to increase and some districts are bound to remain below the State average. Thus the process of removal of backlog based on the concept of the State average becomes a never ending process, nor necessarily need based." या संपूर्ण भागाचा बॅकलॉग बघावा असे सांगितले होते. पैशाचा बॅकलॉग संपला असला तरी किंमती वाढतच असतात. त्यामुळे फिजिकल बॅकलॉग किती राहिला यावरुन त्या त्या भागाचा अनुशेष काढला जावा असे माननीय राज्यपाल महोदयांनी निदेश दिलेले असतांना सुध्दा आमच्या ॲडव्होकेट जनरल साहेबांनी माननीय राज्यपाल महोदयांच्या आदेशाची तसेच घटनेची पायमल्ली कशी केली याबाबत यासभागृहत चर्चा झालेली आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

उप मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यपाल महोदयांबरोबर बैठक घेतली होती. त्यावेळेस ॲडव्होकेट जनरल यांनी सांगितले होते की, "सरकार सांगते म्हणून करतो परंतु मी माझ्या मतावर आजही ठाम आहे." त्यामुळे अशा प्रकारचे ॲडव्होकेट जनरल आपल्याला पाहिजे कशाला ? ते राजीनामा देण्यास तयार होते, त्यांनी आपला राजीनामा ताबडतोब द्यावा व ग्रामीण भागामध्ये, मराठवाड्यामध्ये, विदर्भामध्ये आज पाण्याकरिता जो कंठशोष चालू आहे त्याला कारणीभूत झालेल्या यंत्रणेला सुधारण्याचा आम्ही प्रयत्न करीत असून व्यक्तींना सुधारण्याचा प्रयत्न करीत नाही. या विरोधात जर ॲडव्होकेट जनरलचे मत असेल तर त्याचे त्यांना लखलाभ होवो. या राज्याला त्यांची आवश्यकता नाही असे मी माझे मत व्यक्त करतो. त्यांनी लवकर राजीनामा देऊन आपल्या मतावर ठाम राहण्यासाठी ते राज्याला मुक्त करतील तर आनंद होईल अशी भूमिका मांडतो.

सभापती महोदय, ऑगस्टमध्ये पाऊस पडला नाही, जून महिन्यामध्ये थोडा बरा पाऊस इ ाल्यानंतर दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली होती. त्यावेळेला मी पहिला दौरा केला होता व शिवसेनेच्या वतीने दौरा करणारा मी पहिला कार्यकर्ता होतो. त्यावेळेस मी धाराशीव, बीड, जालना, संभाजीनगर येथे सुध्दा गेलो होतो परंतु याअगोदर मी पश्चिम महाराष्ट्रातील जत आणि त्या ठिकाणच्या परिसरात दोन अडीच महिने काम करीत होतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मी चारा छावणीला भेट देत होता, पाणी पुरवठा करत होतो. जेवढे झेपले तेवढे काम आम्ही केलेले आहे. एक कार्यकर्ता म्हणून मी हे सर्व काम करीत होतो. जेवढे झेपेल तेवढे काम करत होतो. कारण एवढे मोठे आव्हान सर्वच पेलू शकतात असे नाही. सरकारची निंदा नालस्ती करण्यापेक्षा सरकारला सहकार्य करण्याच्या हेतूने काम करीत होतो. झेपले तेवढ्या पद्धतीने मी काम करीत होतो. त्यातून निर्माण होणार राग हा सरकारवर व्यक्त होणारा नव्हता. मात्र त्या परिस्थितीला समोरे जाण्यासाठी सरकार अपयशी ठरत असेल तर ते अत्यंत गंभीर आहे.

सभापती महोदय, दिनांक 24 सप्टेंबर 2012 रोजी मी पहिली प्रेस नोट काढली होती. ती मी येथे वाचून दाखवितो. इसाबनीतीतील कावळ्या सारखी मराठवाड्याची परिस्थिती. इसाबनीतील कावळ्याने घागरीच्या तळातील पाणी गारगोटी टाकून घागरीच्या तोंडावर आणून तहान भागविण्यासाठी केलेले प्रयत्न जायकवाडी आणि मराठवाड्यातील पाणीसाठे अनुभवत आहेत. त्यांच्यावर अवलंबून असलेली शहरे आणि गावे, शेती, उद्योगासाठी नाही तर पिण्यासाठी आकांत करीत आहेत. 12 ऑगस्ट रोजी पूर्ण सुकलेले जायकवाडी धरण सप्टेंबरमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टाहो फोडत आहे. जायकवाडीचे हक्काचे पाणी नगर आणि नाशिकच्या पुढाऱ्यांनी दंडेलशाही करून शून्यावर आणले आहे. जायकवाडीच्या वरच्या बाजूला साठे केले आहेत. जायकवाडीच्या वरच्या बाजूला 60 मोठे, 15 मध्यम, 491 लघुप्रकल्प आणि स्थानिकस्तरावर 7810 योजनांवर 196 अब्ज घनफूट पाणी अडविले आहे. ही दंडेलशाही आज मराठवाड्याच्या पिण्याच्या पाण्याच्या, शेतीच्या व उद्योगाच्या पाण्याच्या मुळावर आली आहे, अशा प्रकारची परिस्थिती आपण येथे मांडत आहोत व ती परिस्थिती आज मराठवाड्यावर देखील आली आहे.

जायकवाडीच्या वरच्या बाजूला 30 टक्के पाणलोट क्षेत्र हे पर्जन्याचे प्रदेश आहेत, तर जायकवाडीच्या खालच्या बाजूला म्हणजे मराठवाड्यातील 70 टक्के क्षेत्र हे अनिश्चित पावसाळी प्रदेश आहेत. गेल्या 28 वर्षात 1976 आणि 2003 मध्ये फक्त दोनदाच जायकवाडी प्रकल्प पूर्ण भरलेला होता. हा प्रकल्प भरल्यामुळे त्याचे स्वागत करण्यासाठी मी स्वत: सन 2003 मध्ये तेथे गेलो होतो. या प्रकल्पाची 75 टक्के विश्वासार्हता म्हणजे 104 अब्ज घन फूट आहे. म्हणजे कायम 28 टक्केच पाणी साठा आपल्याला उपलब्ध होत आलेला आहे. पालकमंत्र्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी ही परिस्थिती आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

नगर नाशिकचे अरेरावी करणारे नेतृत्त माननीय पालकमंत्र्यांना दिसत नाही काय ? माझ्या बातमीचे हेडींगच असे आहे की, परतीचा पाऊस आला नाही तर श्री.बाळासाहेब थोरात आपण परत जाणार काय ? त्यांनी आपल्याला सांगितले होते की, परतीचा पाऊस आला तर पाणी देऊ.

अशा प्रकारची परिस्थिती आज आमच्या मराठवाड्यात आहे. आपल्या राज्यात गोदावरी, मांजरा आणि कृष्णा अशा प्रकारची तीन खोरे आहेत. या तीन भागातून आपल्याला पाणी मिळते. गोदावरी खोऱ्याची काय विल्हेवाट लागली ती मी थोडक्यात मांडली आहे. आपण ती पूर्ण मांडली आहे. मांजरा खोरे हे नेहमीच तुटीचे खोरे आहे. मी काल-परवा मांजरा खोऱ्यामध्ये होतो.आम्हाला कृष्णा खोऱ्याचे हक्काचे पाणी मिळणार आहे काय ? यासंबंधी या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. श्री.अजित पवार यांनी मला उत्तर दिले होते की, जोपर्यंत निर्णय होत नाही तो पर्यंत 21 टीएमसी पाणी देऊ शकत नाही.

श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना पाण्याकरिता 2.00 वाजे पर्यंत बैठक झाली. मी येथे अनेक वेळा नमूद केले आहे. ते पुन्हा एकदा नमूद करतो. ती आमची व्यथा आहे. रात्रौ 2.00 वाजता पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांनी त्यांच्या टेबलावरील चादर काढून बैठक उद्ध्वस्त केली. कृष्णा खोऱ्यातील पाणी मिळण्यासाठी मराठवाड्यातील मुख्यमंत्री क्रियाशील असताना पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी ती बैठक उधळून लावली. हे सत्य आहे. ही बैठक श्री.विलासराव देशमुख यांच्या वर्षा बंगल्यावर होती. ही बाब श्री.विलासराव देशमुख असताना देखील मी मांडली होती.

सभापती महोदय, श्री.यशवंतराव चव्हाणांनी सांगितले की, या महाराष्ट्राला समृद्ध करावयाचे असेल, सुजलाम, सुफलाम करावयाचे असेल तर समन्यायी तत्वावर महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

हे सांगितले असताना कृष्णा खोरेचे पाणी मराठवाड्याला का मिळत नाही ? 4 हजार 800 कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चापैकी मराठवाड्याला फक्त 417 कोटी रुपये मिळाले.

सभापती महोदय, मराठवाड्यात सिंचनाची कोणती कामे आहेत ते सांगतो. उजनी धरण ते शिळा-कोरेगाव बोगद्याचे काम अजून पूर्ण व्हावयाचे आहे. सोनाली जोड कालव्याचे काम व्हावयाचे आहे. उतरण नलिका- काणेगाव ते देवेंद्र हे काम व्हावयाचे आहे. वळवण ते चिंचपूर कालवा तयार व्हावयाचा आहे, सोनगिरी साठवण तलाव तयार व्हावयाचा आहे, सिना नदीवरील घाटणे बॅरेज तयार व्हावयाचे आहे, पांढरवाडी साठवण तलावाचे काम व्हावयाचे आहे, रामदरी लघुपाटबंधाऱ्याचे काम व्हावयाचे आहे, डोंगरी साठवण तलावाचे काम व्हावयाचे आहे, नळदुर्ग बॅरेज क्रमांक 1चे काम व्हावयाचे आहे. उपसा क्रमांक-2,पंपगृह आणि उर्ध्वनलिकेचे काम व्हावयाचे आहे. खुंटणे साठवण तलावाचे काम व्हावयाचे आहे. ही सर्व कामे पूर्ण झाली तरी 25 टीएमसीपैकी फक्त 7 टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळणार आहे. उर्वरित पाण्यासाठी आमच्या दुसऱ्या पिढीला वाट पहावी लागेल अशी निधीच्या उपलब्धतेची परिस्थिती आहे.

सभापती महोदय, कृष्णा खोरेचे पाणी बीड जिल्ह्यात कसे येणार ? आष्टी व इतर दुष्काळी भागात ते पाणी जाणार आहे. लातूरमध्ये जाणार आहे. धाराशीव हा सर्वात तहानलेला भाग आहे त्या ठिकाणी पाणी जाणार आहे. यातील काही थेंब आमच्यावर शिंपडले असते तर आम्ही आता त्या ठिकाणी रेल्वेने पाणी आणण्याचा प्रयत्न करीत आहोत, अन्य मार्गाने पाणी आणण्याचा प्रयत्न करीत आहोत, हे करण्याची वेळ आली नसती.

सभापती महोदय, मी सप्टेंबर महिन्यात मराठवाड्यात गेलो होतो. तेथील जिल्हाधिकाऱ्यांना भेटून सांगितले की, 50 कोटी रुपयांची तरतूद केल्याशिवाय पाणी मिळणार नाही. नंतर आयुक्तांना भेटलो. त्यांनी सांगितले की आम्ही पाणी देतो. हा श्रेय घेण्याचा प्रश्न नाही. काम कोणी केले यापेक्षा काम करणे महत्वाचे होते. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी 50 कोटी रुपये मंजूर केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. धाराशीव मध्ये माननीय मंत्री श्री.रामराजे निंबाळकर हे उपोषणास बसले हाते. आपण सर्वांनी पाणी मिळविण्यासाठी प्रयत्न केले. येथे श्रेयाचा प्रश्न नाही. धाराशीवमध्ये आठ दिवसांनी पाणी पोहोचल्यानंतर तेथील जनतेने फटाके फोडून पाण्याचे स्वागत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

केले. तहानलेली जनता पाण्यासाठी किती आसुसलेली असते हे त्याचे एक विदारक चित्र होते. धाराशीवला पाणी दिल्याबद्दल धन्यवाद देतो. आपण देखील तेथे गेला होता.

सभापती महोदय, सन 2009चा मराठवाड्याचा किमान अनुशेष 4.45 हेक्टरचा आहे तर विदर्भाचा 4.16 हेक्टरचा आहे. सन 1982 मध्ये मराठवाडयामध्ये पेरणी योग्य क्षेत्र 59.44 लक्ष हेक्टर इतके होते. आज ते 3.16 लक्ष हेक्टर आहे. तेव्हा आम्हाला पाणी मिळाले की नाही, आमचा फिजिकल बॅकलॉग आहे की नाही ? आमचा आर्थिक बॅकलॉग भरुन काढला की नाही ? मी जास्त खोलात जात नाही. कारण आपण हे विषय मांडत असतो.

सभापती महोदय, मी काल मसलगा येथे गेलो होतो. माननीय मंत्री महोदय हा अतिशय गंभीर विषय आहे. शितावरुन भाताची परीक्षा. आपले तिकडे किती लक्ष आहे ? आपण कृष्णा खोरेकडे लक्ष देता ही आमची तक्रार नाही. तेथील ऊस शेतकऱ्यांची प्रत्येक कांडी 2 इंचाची असेल तर ती 3 इंच कशी होईल आणि 3 इंच असेल तर ती 4 इंच कशी होईल आणि त्यातून जास्त गाळप कसा मिळेल यासाठी प्रयत्न करता, ही आनंदाची गोष्ट आहे. पण या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला चार गोष्टी सुनावल्या होत्या. ऊसाच्या बाबतीत आपण सातत्याने टीका करता, पण त्या ऊस उत्पादकांकडून राज्याला चार हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. कापूस उत्पादक शेतक-यांच्या संदर्भात मनाला चटके देणारे वक्तव्य या सभागृहात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केले होते आणि विदर्भाच्या जखमेवर मीठ चोळले होते. पण आम्ही चिडून सभात्याग केला नाही. एका माजी मुख्यमंत्री महोदयांनी विदर्भातील शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतो असे म्हणून विदर्भातील शेतकऱ्यांचा अपमान केला होता.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्याच वेळी आमच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांची अशाप्रकारे आर्थिकदृष्ट्या क्षमता सांगितली होती.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : माननीय श्री.रावते साहेब, आपले भाषण पाच मिनिटांत संपेल काय ?

श्री.दिवाकर रावते : नाही. आपण मला ऑनलेग ठेवू शकता.

तालिका सभापती : ठीक आहे. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ऑनलेग आहेत.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.45 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

राज्यातील महावितरण कंपनीमार्फत करण्यात आलेल्या मीटर खरेदीत झालेली अनियमितता

(१) * ३६७४० श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , ॲड.आशिष शेलार , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कंपनीमार्फत करण्यात आलेल्या मीटर खरेदीमधील अनियमिततेबाबत मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी त्यांच्या दिनांक ११ जानेवारी, २०१३ रोजीच्या पत्र क्रमांक ५८ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांचेकडे तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनियमिततेच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी नुसारदोषी अधिकाऱ्यांवर व पुरवठादारांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे.

(२) अनियमितता झाली नसल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात गेल्या आठवड्यात चर्चा झाली परंतु त्याबाबत निर्णय मिळाला नाही म्हणून केवळ आज पुन्हा हा प्रश्न लागल्यामुळे मी याबाबत आग्रह धरीत आहे. यामध्ये तोच मुद्दा आहे की, एमएसईबीने जे मीटर्स खरेदी केले त्यामध्ये टेंडरप्रमाणे मे. फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड, फरिदाबाद यांचे दर कमी असताना सुध्दा त्यांना संपूर्ण ऑर्डर न देता 1 लाख मीटर्सचीच ऑर्डर दिली आणि त्यानंतर एल-2, एल-3 यांना सुध्दा ऑर्डर दिली गेली. मे. फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड, फरिदाबाद हे जर एल-1 असतील तर त्यांना संपूर्ण ऑर्डर का दिली गेली नाही. त्यांनी असे म्हटले आहे की, ते नवीन असल्यामुळे त्यांना ऑर्डर दिली नाही. कोणत्याही मोठ्या टेंडरमध्ये एक टेक्निकल बिड आणि दुसरे प्राईस बिड असते. टेक्निकल बिडमध्ये ते पात्र आहेत असे ठरल्यानंतर त्यांना ऑर्डर दिलेली आहे. त्यामुळे हे लॉजिक बरोबर नाही. अशा प्रकारे टेंडरमध्ये नवीन असल्यामुळे सर्व ऑर्डर देऊ नये असा नियम करता येत नाही. मग यामध्ये असे का केले ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : हा जो तारांकित प्रश्न आहे या संदर्भातील लक्षवेधी सूचनेवर सुध्दा चर्चा झालेली आहे. या ठिकाणी या संदर्भात आपण पुष्कळ चर्चा केलेली आहे. त्यामुळे या संदर्भात एखादा प्रश्न विचारण्याची संधी दिल्यानंतर पुढचा प्रश्न घेण्यात येईल.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, य संदर्भात आपण ई-टेंडरींग पध्दतीने ही निविदा प्रक्रिया पूर्ण केली. ई-टेंडरींग पध्दतीमध्ये ज्या अटी आहेत त्यामध्ये आधीपासूनच असे नमूद केले होते की, जर कोणी नवीन पुरवठादार असेल, ज्याने राज्यात किंवा देशात कोठेही पुरवठा केला नसेल त्यांना 10 टक्के निविदा भागाचे काम देण्यात येईल. जो सेमी रेग्युलर पुरवठादार असेल, ज्याने राज्यामध्ये एखाद्या ठिकाणी कोठे तरी पुरवठा केला असेल, देशामध्ये कोठे तरी पुरवठा केला असेल त्याला 20 टक्के आणि उर्वरित लोकांना उरलेल्या टेंडरचा भाग देण्यात येईल अशा प्रकारे निविदा अटीमध्येच नमूद केले होते. हे करीत असताना फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स हे सेमी रेग्युलर पुरवठादार कॅटेगरीमध्ये येत होते. म्हणून त्यांना 20 टक्के निविदा देण्यात आली. त्यानंतरचे जे लोक होते त्यामध्ये एल-2, एल-3, एल-4, एल-5 या सर्व लोकांना बोलविण्यात आले आणि त्यांना सांगण्यात आले की, अशा प्रकारची निविदा टेंडर झालेले आहे. यामध्ये आपण रेट मॅक्स करणार आहात का ? या संदर्भात त्यांना विश्वासात घेण्यात आले आणि त्यानंतर फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स यांना हे टेंडर देण्यात आले आणि त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाच्या विविदाधारकास हे टेंडर देण्यात आले.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यातून हे स्पष्ट होते की, टेंडर कंडीशनमध्ये आम्ही एक अट घातल्यामुळे हे जस्टीफायेबल होते. टेंडरमध्ये आपण ठरविलेली अट ही सीव्हीसीचा भंग करणारी आहे काय, असल्यास त्या बाबतीत काय कारवाई करणार ? इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टप्रमाणे अशा प्रकारची अट कोणत्याही टेंडरमध्ये घालता येत नाही. या बाबतीत ॲडव्होकेट जनरलचे मत घेणार का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सीव्हीसीने स्पेसिफिकली या संदर्भात असे म्हटले आहे की, "If the quantity to be ordered is much more then L-1 alone can supply in such cases. The quantity ordered may be distributed in such a manner that the purchase is done in a fair, transparent and an equitable

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 36740 .....

श्री. राजेंद्र मुळक...

manner." म्हणजे एल-1 निविदाधारक पूर्णपणे निविदेत दिलेली पुरवठा संख्या पूर्ण करु शकत नाही त्यावेळी उर्वरित संख्या पात्र निविदाधारकाकडून सुयोग्य, पारदर्शी व न्याय पध्दतीने देण्याबाबत सीव्हीसीने उल्लेख केलेला आहे. आपण ई-टेंडरींग प्रोसेसमध्येच या सर्व बाबींचा उल्लेख केला होता.

यानंतर श्री. खंदारे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36740..... श्री.राजेंद्र मुळक.....

सीव्हीसीच्या गाईड लाईन्सचे उल्लंघन झालेले आहे असा प्रकार या निविदेमध्ये झालेला नाही. त्यामुळे पुढील कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी केलेल्या तक्रारीचे स्वरुप काय होते आणि संबंधित निविदेतील एकूण रक्कम किती होती ?

श्री.अजित पवार : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने हा प्रश्न उपस्थित केला होता आणि त्याबाबतचे उत्तर रेकॉर्डवर आलेले आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनीही सीव्हीसीच्या गाईड लाईन्सबाबत मघाशी प्रश्न विचारल्यानंतर सन्माननीय राज्यमंत्र्यांनी गाईड लाईन्सची व्यवस्थित माहिती दिलेली आहे. मीही या प्रश्नाच्या खोलात गेलो होतो. मी याबाबतची सर्व माहिती घेतली आहे. यामध्ये खरेदीमध्ये पूर्णपणे पारदर्शकता आहे. मग सीव्हीसीच्या गाईड लाईन्स असतील किंवा संचालक मंडळाने घेतलेला निर्णय असेल, याबाबतचे निर्णय व्यवस्थितपणे व पूर्ण विचारांती घेतलेले आहेत.

एल-1 टेंडर गेलेले आहे. त्यांना 12 कोटी 40 लाख रुपयांच्या किंमतीच्या 2 लाख सिंगल फेजच्या मीटर्सची ऑर्डर दिली होती. एल-2 ला 32 कोटी 80 लाख रुपये किंमतीचे टेंडर दिलेले आहे. एल-2 चे दुसरे 10 कोटी 93 लाख रुपयांचे टेंडर होते. एल-2 व दुसरे एल-2 मिळून ऑर्डर दिलेली आहे. एल-1 व एल-2 मधील फरक काढल्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये जी शंका आली आहे ती माझ्यामध्येही आली होती. एल-1 व एल-2 च्या टेंडरची रक्कम 4 कोटी 3 लाख एवढी होती. एल-2 व एल-3 चा रेट आणल्यानंतर त्यांना काम दिलेले आहे. या देशामध्ये इतर महावितरण कंपन्या आहेत. त्यामध्ये आंध्र प्रदेश वितरण कंपनी आहे. त्या कंपनीने अशा प्रकारच्या मीटर्स घेतलेले आहेत. आपण एल-2 च्या टेंडरनुसार 736 रुपये प्रमाणे मीटर्सची खरेदी केली आहे, आंध्र प्रदेश वितरण कंपनीने 819 रुपये प्रमाणे मीटर्सची खरेदी केलेली आहे. त्याचप्रमाणे आपण एल-2 नुसार 630 रुपये प्रमाणे मीटर्स घेतले आहेत त्यांनी 690 रुपये याप्रमाणे खरेदी केलेली आहे. त्यामुळे मला देखील अशी शंका आली होती की, एल-1 टेंडरला 100 टक्के ऑर्डर का दिली नाही ? परंतु त्याबाबत असे सांगण्यात आले की, लघुत्तम निविदाकार एल-1 हा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नवीन पुरवठादार असल्यास त्यांना एकूण खरेदीच्या 10 टक्क्यापर्यंत पुरवठा आदेश देण्यात यावा. तरी सुध्दा त्यांना 20 टक्के पुरवठा आदेश दिलेला आहे.

या खरेदीसाठी ई-टेंडरिंग केलेले आहे. त्याचेही मी रेकॉर्ड पाहिलेले आहे. कधी कधी ठराविक वर्तमानपत्रातून टेंडरची नोटीस दिली जाते. बाकीच्या वर्तमानपत्रात नोटीस दिली जात नाही. पण असे काही झालेले नाही. ही खरेदी ई-टेंडरिंगच्या माध्यमातून झालेली आहे. लघुत्तम निविदाकार हा जर सेमी नियमित पुरवठादार असेल तर त्याला एकूण खरेदीच्या 20 टक्के पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच लघुत्तम निविदाकार हा नियमित पुरवठादार असेल तर त्यांना एकूण खरेदीच्या 50 टक्के पुरवठा आदेश देण्यात यावा. दिनांक 27.2.2006 च्या संचालक मंडळाच्या सर्वसाधारण सभेमध्ये अशाप्रकारचे निर्णय झालेले आहेत. हे कंत्राट देण्यापूर्वी निविदा सूचना कंपनीच्या संकेत स्थळावर ऑन लाईन सिस्टिमद्वारे प्रसिध्द केली जाते. मीटर्सच्या निविदेप्रमाणे संबंधित कंपनीला 15 नमुना मीटर्स सुध्दा महावितरण कंपनीकडे ऑन लाईन सिस्टिमद्वारे प्रस्ताव सोबत जमा करावयाचे असतात. अशा वेगवेगळ्या बाबी यात आहेत. या खरेदीमुळे एक फायदा असाही झालेला आहे की, हे मीटर्स बसविल्यापासून साधारण 30 टक्के महसुलात वाढ झालेली आहे. अशा पध्दतीने ही संपूर्ण टेंडर प्रक्रिया झालेली आहे.

श्री.भाई गिरकर : लक्षवेधी सूचनेच्या वेळी या खरेदी संपूर्ण चौकशी करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. या खरेदीसाठी मॅचिंग प्राईज घेतली असती तर शासनाचे 4 कोटी रुपये वाचले असते. या खरेदीचे कंत्राट ठरलेले होते तर मग संचालक मंडळाला खरेदीचा अधिकार कसा दिला गेला ? एल-2 व एल-1 टेंडरमधील फरकाची मॅचिंग प्राईज घेतली असती तर 4 कोटी रुपये वाचले असते. ही रक्कम ज्या अधिकाऱ्यांनी वाचविली नाही त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे आणि चौकशीचे पुढे काय झाले आहे ?

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : ई टेंडरिंगमध्ये एखाद्या नवीन कंपनीने अव्वाच्या सव्वा लोएस्ट टेंडर भरुन नंतर माल पुरविला नाही तर पुढे अडचणी निर्माण होतात. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात महावितरण किंवा ऊर्जा विभागाचे हेच उत्तर आहे की, या मध्ये जो निर्णय घेतलेला आहे तो अतिशय पारदर्शक असा आहे. अधिका-यांची कोठेही चूक झालेली नाही असे माझे स्वत:चे मत आहे. मी माझ्या मताशी ठाम आहे. मला जर वाटले असते की, यामध्ये काही काळे-बेरे आहे, तर मी चौकशी लावून संबंधिताना निलंबित केले असते, मला कुणाचे काही देणे घेणे नाही. एमडी सहीत सर्वांनी योग्य निर्णय घेतलेला आहे. सीव्हीसी गाईड लाईन्स आणि बाकीच्या गोष्टी पारदर्शक केलेल्या आहेत. यामध्ये कोणताही गडबड घोटाळा झालेला नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : ता.प्र.क्र. 37452 आणि ता.प्र.क्र.37337 यांचे विषय सारखेच असल्यामुळे हे दोन्ही प्रश्न एकत्रितपणे चर्चला घेण्यात येतील.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ठाणे जिल्ह्यात राबविणेबाबत

(२) * ३७४५२ श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अमरसिंह पंडित , डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९३१ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दारिद्ररेषेखालील व दारिद्ररेषेवरील (रुपये १ लक्ष पर्यंत उत्पन्न असलेल्या) अंत्योदय व अन्नपूर्णा शिधापत्रिका धारक कुटुंबाकरिता सुरु करण्यात आली आहे, सदर योजना पहिल्या टप्प्यात रायगड, धुळे, सोलापूर, नांदेड, अमरावती, गडचिरोली, मुंबई शहर व मुंबई उपनगर या आठ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत असून सदर योजनेची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जव्हार व डहाणू (जि.ठाणे) हे अतिसंवेदनशील आदिवासी प्रकल्प असून या जिल्ह्यातील वाडा, मोखाडा, डहाणू, पालघर, तलासरी, विक्रमगड, जव्हार, शहापूर व मुरबाड या तालुक्यातील बहुसंख्य गरीब, कष्टकरी व आदिवासी कुटुंबांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्याबाबत कोणती अंमलबजावणी करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता: (१) होय.

(२) विमा कंपनीसोबत एम.ओ.यू. करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यात राजीव गांधी आरोग्य विमा योजनेची योग्य अंमलबजावणी होण्याबाबत

(५) * ३७३३७ श्री.दिपकराव साळुंखे , श्री.हेमंत टकले , श्री.जयवंतराव जाधव , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी आरोग्यदायी विमा योजना ग्रामीण भागातील नागरिकांसाठी उपयुक्त असताना योग्य नियंत्रणाअभावी सोलापूर जिल्ह्यात सदर योजनेची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जिल्ह्यात राजीव गांधी योजनेची योग्य अंमलबजावणी होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) नाही.

योजना सुरु झाल्यापासून सोलापूर जिल्ह्यात ५६५० रुग्णांवर सदर योजनेंतर्गत शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : अत्यंत चांगल्या प्रकारची राजीव गांधी जीवनदायी योजना राज्यामध्ये सुरु केल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय आरोग्य मंत्री आणि शासनाचे अभिनंदन करु इच्छितो. या योजनेच्या रुपाने हे लोकशाही आघाडीचे सरकार हे गरिबांसाठी आहे हे पुनश्च सिद्ध झालेले आहे. वाडा, मोखाडा, डहाणू, तलासरी, पालघर, विक्रमगड या भागामध्ये बहुतांश गरीब, कष्टकरी आणि आदिवासी कुटुंबातील लोक राहातात. या भागामध्ये राजीव गांधी जीवनदायी योजनेची अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. सद्या या योजनेची अंमलबजावणी राज्यातील ८ जिल्हयामध्ये होत आहे. दुस-या टप्प्यामध्ये उर्वरित २७ जिल्ह्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ही अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे आणि यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद केलेली आहे ? ही योजना प्रथम ८ जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आली. परंतु दुर्दैव असे आहे की, मुंबई मधील प्रमुख हॉस्पिटल्स मधून या योजनेची अंमलबजावणी होत नाही. त्या बाबतीत संबंधितांशी निगोशिएशन सुरु आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. संजय दत्त : मुंबईतील प्रमुख हॉस्पिटल्स मधून या योजनेची अंमलबजावणी का केली जात नाही ? या बाबतीत राज्य शासन कोणती कारवाई करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे अतिशय लोकोपयोगी आणि गोरगरिबांना दिलासा देणारी अशी ही योजना आहे. राज्यातील ८ जिल्ह्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी यशस्वीपणे सुरु आहे. ४६ हजार रुग्णांवर या योजनेंतर्गत शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आलेले आहेत. दोन अडीच महिन्यामध्ये संपूर्ण राज्यामध्ये ही योजना सुरु होईल अशा प्रकारे नियोजन सुरु आहे. यासाठी अर्थसंकल्पामध्ये ३४० कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. मुंबईतील रुग्णालये या योजनेला प्रतिसाद देत नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आपण

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही योजना सुरु केलेली असून या योजनेमध्ये रुग्णालयांचे व्हॉलण्टरी अफिलिएशन अपेक्षित आहे. ही योजना एकदा चांगल्या प्रकारे सुरु झाली की सर्व रुग्णालये आपोआप ॲफिलिएशन करण्यासाठी येतील.

श्री. दीपकराव साळुंखे : या योजनेंतर्गत ९७२ आजारावर उपचार होतील असे म्हटलेले आहे. यामधील ८०० आजाराचे प्रकार हे कागदावरच आहेत.

...नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37452/37337...

श्री.दिपकराव साळुंखे ....

मी या संदर्भात तीन उप प्रश्न विचारणार आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे कॉन्ट्रॅक्ट कोणत्या कंपनीला दिले आहे काय, त्या कंपनीने सब कॉन्ट्रक्टर नेमलेला आहे काय, महत्वाचे 122 आजार आहेत, ते शासनाने शासकीय रुग्णालयांकडे वर्ग केलेले आहेत काय ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सोलापूर जिल्हयाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे.

श्री. दिपकराव साळुंखे : मी संपूर्ण राज्यासंबंधीचा प्रश्न विचारलेला आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न मला समजला नसल्यामुळे त्यांना पुन्हा प्रश्न विचारावयास परवानगी द्यावी.

श्री.दिपकराव साळुंखे : ही योजना राबविण्याचे काम विमा कंपनीला दिले आहे काय, त्या कंपनीने पोट कॉन्ट्रॅक्ट दुसऱ्या कंपनीला दिले आहे काय? 26 दिवसांच्या आत संबंधित रुग्णालयास पेमेंट करावे असे आपल्या करारामध्ये नमूद केलेले आहे. सोलापूर जिल्हयामध्ये आतापर्यंत कोणत्याही रुग्णालयास नियमाप्रमाणे 26 दिवसात पेमेंट करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्या रुग्णालयात गेलेल्या रुग्णास व्यवस्थितपणे उपचार केले जात नाहीत. संबंधित रुग्णालयांना कराराप्रमाणे पेमेंट करुन भविष्यात रुग्णांना चांगल्या प्रकारचे उपचार मिळतील काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, नॅशनल इन्शुरन्स कंपनीला सदर काम देण्यात आले आहे. त्या कंपनीने कोणत्याही कंपनीला सब कॉन्ट्रॅक्ट दिलेले नाही. सोलापूर जिल्हयात 6974 रुग्णांचे ॲप्रूव्हल झालेले आहे. 17.21 कोटी रुपयांची रक्कम ॲप्रूव्हल केलेली आहे. या आठ जिल्हयात तिसरा क्रमांक सोलापूर जिल्हयाचा लागतो. पेमेंट असो, रुग्णांच्या शस्त्रक्रिया असो, मुंबई व मुंबई उपनगरे नंतर सोलापूर जिल्हयाचाच नंबर आहे. सोलापूरमध्ये ही योजना चांगल्या प्रकारे राबविली जात आहे.

श्री.चरणसिंग सप्रा : राजीव गांधी जीवनदायी योजना राबविणारी रुग्णालये रुग्णांशी योग्य प्रकारे वागत नाहीत. तसेच ते रुग्णालये रुग्णांवर योग्य ते उपचार करीत नाहीत. उपचारासंबंधी तक्रारी आहेत. रुग्णालयातील कर्मचारी रुग्णाची दिशाभूल करतात. आमच्या रुग्णालयात उपचार होत नाही, त्यामुळे दुसऱ्या रुग्णालयात जावे. या रुग्णालयांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी केंद्रे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उभारण्यात येणार आहे काय ? प्रात्प झालेल्या तक्रारीच्या बाबतीत आपण कार्यवाही करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी माझ्याकडे स्पेसिफिक प्रकरणे माझ्याकडे उपलब्ध दिली तर ती प्रकरणे मी तपासून घेतो आणि प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर एका तासात त्यांना माहिती उपलब्ध करुन देतो. प्रत्येक रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी काऊंटर उघडलेले आहेत. त्या ठिकाणी एक आरोग्य मित्र असतो, तसेच एक को-ऑर्डिनेटर असतो. तेथे कायम स्वरुपी हेल्प लाईन सुरु करण्यात आलेली असून तेथे हेल्प लाईन नंबर लिहिलेला आहे. आपण वरळी येथे हेल्प लाईन सेंटर चालू केले आहे. ते कॉल सेंटर 24 तास ऑपरेट होत असते. या हेल्पलाईनवरुन तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आम्ही ताबडतोब चौकशी करतो आणि संबंधित व्यक्तीस कळवितो. सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांच्याकडे काही स्पेसिफिक तक्रारी असतील तर त्यांनी त्या तक्रारी माझ्याकडे द्याव्यात. त्या तक्रारींची चौकशी करण्याची माझी तयारी आहे. तसेच सन्माननीय सदस्यां बरोबर देखील चर्चा करण्याची माझी तयारी आहे.

महोदय,सन्माननीय सदस्यांनी पूर्वी एक प्रश्न विचारला होता, त्या बाबतीत सांगतो की, त्या प्रश्नाचे मी गेल्या आठवडयात उत्तर दिले होते. आपण 972 प्रोसीजर आयडेंटीफाय केल्या आहेत. सर्व रुग्णालये सर्व प्रोसीजर फॉलो करीत नाहीत. काही रुग्णालयांमध्ये 100 शस्त्रक्रिया होतात. काही रुग्णालयांमध्ये फक्त कार्डियाकचे ऑपरेशन्स करतात. युरॉलॉजीचे विशेष रुग्णालय असते, ते फक्त युरॉलॉजीचे ऑपरेशन्स करतात. 135 ते 140 प्रोसीजर या कॉमन प्रोसीजर्स आहेत. ॲपेडीक्स सारखी ऑपरेशन्स आहेत. या योजनेतून तशी ऑपरेशन खाजगी रुग्णालयात करण्यासाठी परवानगी आपण दिलेली नाही. तशी ऑपरेशन्स फक्त शासकीय रुग्णालयतच करावयाची असा आपण पूर्वी पासून निर्णय घेतलेला आहे. केंद्र सरकारची आरएसबीवाय योजना होती, त्या योजनेत ही लहान मोठी ऑपरेशन्स खाजगी रुग्णालयात केली गेली. खाजगी रुग्णालयांनी मोठया प्रमाणात बिले दाखविली गेली आहेत. तसेच काही रुग्णालयात ऑपरेशन्स न करता बिले दाखविली गेलेली आहेत.....

यानंतर श्री. भोगले.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37452 व 37337.... श्री.सुरेश शेट्टी.....

म्हणून ती ऑपरेशन्स आम्ही फक्त सरकारी रुग्णालयात आणि महापालिकांच्या रुग्णालयात करण्यास परवानगी दिलेली आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये ऑपरेशन करण्यास परवानगी दिलेली नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या योजनेची व्याप्ती आणि प्रोसीजर फॉलो केल्यास असे दिसून येईल की, प्रत्येक विभागाला क्लस्टर करुन वेगवेगळ्या कंपन्यांना काम दिले पाहिजे. शासनाने कौन्सिलिंगचे काम मात्र एकाच कंपनीला देऊन त्यांच्याशी एमओयू केला आहे. विभागाकडून वेगवेगळ्या विमा कंपन्यांना यामध्ये सामावून घेतले जाईल काय?

यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये या योजनेकरिता 350 कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित केला आहे. मागील वर्षी 8 जिल्हयांसाठी किती निधी खर्च करावा लागला? 350 कोटी रुपयांचा निधी संपूर्ण महाराष्ट्रासाठी पुरेसा आहे असे मला वाटत नाही. राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना केंद्र सरकारची आहे. त्यामध्ये 75:25 असे प्रमाण आहे. राज्य शासनाचा वाटा 25 टक्के आहे. 1.5 लाख रुपये राज्य शासनाकडून दिले जातात. दोन्ही योजना एकत्र करुन गुजराथ राज्यामध्ये 75 टक्के केंद्र सरकारचा हिस्सा आणि 25 टक्क्याप्रमाणे 1.25 लाख राज्य शासनाचा हिस्सा देता येईल. या दोन्ही योजना क्लब केल्या जातील काय?

राष्ट्रीय सुरक्षा विमा योजना इतर राज्यांमध्ये आरोग्य मंत्रालयाकडून चालविली जात असताना महाराष्ट्र राज्यात ती कामगार मंत्रालयामार्फत चालविण्याचा हेतू काय आहे? या बाबतीत समन्वय साधण्यात येईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हाच प्रश्न मागील आठवड्यात सभागृहात उपस्थित झाला होता त्यावेळी मी सविस्तर उत्तर दिले होते. सन्माननीय सदस्यांनी एक नवीन प्रश्न मांडला आहे. 350 कोटी रुपये यंदाच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या योजनेकरिता उपलब्ध करुन दिले आहेत. एकूण 687 कोटी रुपये संपूर्ण राज्यासाठी लागणार आहेत. माननीय उप मुख्यमंत्री उर्वरित निधी पुरवणी मागण्यांमधून पुढील अधिवेशनात उपलब्ध करुन देतील हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. या योजनेसाठी निधीची कमतरता पडणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37452 व 37337.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई शहर आणि उपनगर भागामध्ये एकूण किती शस्त्रक्रिया झाल्या याची आकडेवारी मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी. वाडा, मोखाडा, डहाणू, तलासरी, पालघर आणि विक्रमगड या तालुक्यांमध्ये कन्जेनायटल ॲनामोलीस अशा प्रकारची दुर्मीळ शस्त्रक्रिया करण्याची सोय कुठे केली आहे? जी विमा कंपनी नेमलेली आहे ती विमा कंपनी आणि शासन यांच्यात डिस्प्यूट आहे. शासनाने निधी मंजूर केला तो शस्त्रक्रियेच्या मानाने किंवा उपचाराच्या मानाने कमी आहे किंवा त्याबाबत विमा कंपनीची काही शंका आहे. त्यामुळे काही शस्त्रक्रिया करण्यास टाळाटाळ केली जाते. विमा कंपनीबरोबर चर्चा करुन हा वाद संपुष्टात आणणार आहात काय? एकाच विमा कंपनीवर निर्भर न राहता इतरही विमा कंपन्यांना या योजनेमध्ये सामावून घेण्यात येईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : या योजनेसाठी संपूर्ण राज्याच्या दृष्टीकोनातून निविदा काढण्यात आली होती. कॉन्ट्रॅक्ट दिलेली नॅशनल इन्शूरन्स कंपनी हा भारत सरकारचा अंगिकृत उपक्रम आहे. या कंपनीला संपूर्ण राज्यासाठी नेमले आहे. 8 जिल्हयांचा रेशो पाहिला तर 48 हजार एवढ्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत. त्या अंदाजापेक्षा जास्त आहेत. विमा कंपनीबरोबर फायनल निगोसिएशन 4 एप्रिल रोजी होणार आहे. विमा कंपनीला रेट वाढवून देणार नाही हे स्पष्ट सांगितलेले आहे. इतर छोटे मोठे किरकोळ खर्च आहेत त्याबाबत एकत्रितपणे बसून चर्चा करु. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, संपूर्ण देशात 3333 रुपये इतक्या कमी प्रिमियममध्ये कोणतीही विमा कंपनी काम करण्यास तयार होणार नाही.

नंतर 2बी.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र. : 37452,37337.....

श्री. सुरेश शेट्टी .....

आता आम्ही रेट स्टेज मेन्टेन करणार आहोत.

आम्ही ऑपरेशनसाठी जे काही पैसे देत आहोत ते कमी असून ते वाढवून द्या असे खाजगी रुणालयांचे म्हणणे आहे. कार्डीयाक ऑपरेशनसाठी 60 हजार रुपये देण्याचे आम्ही नक्की केले होते.परंतु आम्हाला सांगण्यात आले की, केंद्र सरकार कार्डीयाक ऑपरेशनसाठी जास्त पैसे देते. त्यावेळेस मी स्वत: केंद्रीय स्वास्थ्य मंत्री श्री. गुलाम नबी आझाद साहेबांशी बोललो असता त्यांनी रेट कमी केले. या ऑपरेशनचे रेट 80-90 हजार रुपये होते ते आता 65 हजार रुपये करण्यात आले आहे. त्यांनी आपल्यापेक्षा फक्त 5 हजार रुपये जास्त दिलेले आहेत. सेमी लक्झरी रुमध्ये ठेवले जावे असा क्रायटेरिया होता परंतु आम्ही जनरल वार्ड केलेला आहे. केंद्र सरकार स्टेंटसाठी 60 हजार रुपये देत होते परंतु आता स्टेंटचा भाव 25 हजार रुपये करण्यात आलेला आहे. हॉस्पिटलच्या मॅनेजमेंटचे लोक रेट वाढवून देण्याची विनंती करतात परंतु यासंदर्भातील रेट बिलकूल वाढणार नाही हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. त्यांना दोन वर्ष याच रेटवर काम करावे लागणार आहे. दिवसामध्ये डॉक्टर एक ऑपरेशन केल्यावर 2-3 लाख रुपये चार्ज करतात परंतु दिवसात चार ऑपरेशन करा परंतु टर्न ओव्हर जास्त करा असे आपले प्रिन्सीपल राहणार आहे.

सभापती महोदय, सोलापूरमध्ये पेमेंट मिळाले नाही असा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कंडीशन प्रमाणे 10 दिवसात बिल ऑनलाईन सबमिट केल्यानंतर 7 दिवसात ऑनलाईन पेमेंट होत असते. आपण सांगता त्या प्रमाणे घडले असेल तर त्याची चौकशी करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. बिल सबमिट झाले नाही तर पेमेंट होत नाही.

श्री. हेमंत टकले :सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजनेमुळे राज्यातील गरीब जनतेला मदत होत आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना 8 जिल्हयांमध्ये सुरु करण्यात आलेली असून उर्वरित जिल्हयांमध्ये ही योजना लागू केली जाणार आहे. अर्थसंकल्पातील तरतूद व पुरवणी मागण्यांद्वारे येणारा निधी विचारात घेऊन सुध्दा आपल्याला उर्वरित जिल्हयांसाठी प्राधान्य क्रम ठरवावा लागेल. प्राधान्य क्रम ठरवितांना ज्या ठिकाणी मानव विकास निर्देशांक कमी आहे अशा जिल्हयांना प्राधान्याने वर घेतले तर ही योजना अधिक परिणामकारक रितीने राबविता येईल त्यामुळे यासंदर्भात विचार केला जाणार आहे काय ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजना सुरुवातील 8 जिल्हयांमध्ये ट्रायल बेसीसवर राबविण्यात आली आहे. आठ जिल्हयांमध्ये ही योजना राबविल्यानंतर त्यासंदर्भात काय काय अडचणी आहेत त्या आपल्या समोर येतील व नंतर संपूर्ण राज्यात ही योजना राबविण्यास आपल्याला सुकर होईल. परंतु आता सेकंड फेजमध्ये संपूर्ण राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजना राबवली जाणार आहे. या योजनेमध्ये काय काय अडचणी येतात याची आता आम्हाला कल्पना आलेली आहे. त्यामुळे ही योजना संपूर्ण राज्यामध्ये राबवित असतांना आमच्यापुढे अडचणी येणार नाहीत.

श्री. अजित पवार : सभापती महोदय,सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी साहेबांनी राजीव गांधी जीवनदायी योजनेची माहिती दिलेली आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना ही आघाडी सरकारची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेमुळे राज्यातील जनतेला फायदा होणार आहे. या योजनेच्या संदर्भात या वर्षीच्या अर्थसंकल्पात 35 जिल्हयांमध्ये लागू करीत असतांना निधी कमी पडेल की, काय अशी काहींना चिंता आहे. परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, जर सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी सांगितले की, या योजनेसाठी जी तरतूद आहे त्यापेक्षा जास्त पैसे लागतात तर तेथल्या तेथे सीएफ ॲडव्हान्स काढून पैसा उपलब्ध करुन दिला जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई येथील वाडिया रुग्णालयामधील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे बालकाची प्रकृती अतिशय गंभीर झाल्याबाबत

(३) * ३७४८२ श्रीमती अलका देसाई , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.एम.एम.शेख : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वाडिया रुग्णालयामधील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे पाच दिवसाच्या बाळावर पाच शस्त्रक्रिया करण्यात आल्याने सदर बालकाची प्रकृती अतिशय गंभीर झाल्याचा प्रकार माहे नोव्हेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता १) हे खरे नाही. सदरहू पाच दिवसाच्या बाळावर नोव्हेंबर, २०१२ मध्ये दोन शस्त्रक्रिया जरुरीनुसार पोटावर करण्यात आल्या होत्या. शस्त्रक्रियेनंतर रुग्णास जंतुसंसर्ग झाला होता.

२),३) व ४) या प्रकरणी चौकशीसाठी अधिष्ठाता रा.ए.स्मा.रुग्णालय यांच्या सल्ल्यानुसार डॉ. संदेश परळकर,मुख्य बालरोग शस्त्रक्रिया तज्ञ रा.ए.स्मा. रुग्णालय डॉ. पारस कोठारी, मुख्य शस्त्रक्रिया प्रमुख लोकमान्य टिळक म्युन्सिपल रुग्णालय, सायन, डॉ. जयश्री मोंडकर, मुख्यनवजात शिशु विभाग लोकमान्य टिळक म्युन्सिपल हॉस्पिटल सायन, या तज्ञ डॉक्टरांची समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या चौकशीमध्ये वाडिया रुग्णलयामधील डॉक्टरांकडून निष्काळजीपणा झाला नसल्याचे आढळून आल्यामुळे दोषी डॉक्टरांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, डॉक्टरांची कमिटी नेमल्याबद्दल अभिनंदन करीत असतांना जे प्रश्न अनुत्तरीत राहिलेले आहेत तेच प्रश्न मी या ठिकाणी मांडणार आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

वाडिया रूग्णालयाचा भोंगळ कारभार आहे. त्या बाळावर दोन वेळा शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्या बाळावर शस्त्रक्रिया करताना कुठल्याही हायजेनिक बाबीवर लक्ष ठेवण्यात आले नाही. त्यामुळे जंतुसंसर्गाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे त्या बाळाची प्रकृती गंभीर झाली हे खरे आहे काय, यासंबंधी मला उत्तर मिळणे गरजेचे आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, श्री.विनोद निरगुडे यांनी रूग्णालयाच्या प्रशासनाला पत्र दिले असून त्याची पोच घेतलेली आहे. त्यासंबंधी शासनाचे काय भाष्य आहे ते सदनाला कळावे. अशा प्रकारे दोन प्रश्न मी सदना समोर उपस्थित केलेले आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, वाडिया रूग्णालयामध्ये 5 दिवसाच्या बाळावर दोन वेळा शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. या बाळाला वेगवेगळ्या प्रकारचे आजार होते. जन्माला येण्यापूर्वीच या बाळाला आणि त्याच्या आईला थोडासा त्रास होता. त्यावर उपचार सुरू होते. या बाळाची आई दिनांक 13.11.2012 रोजी ॲडमिट झाली आहे. या बाळावर पहिली शस्त्रक्रिया दिनांक 19.11.2012 रोजी करण्यात आली व दुसरी शस्त्रक्रिया दिनांक 28.11.2012 रोजी करण्यात आली आहे. त्यानंतर या बाळाच्या आईने तक्रार केल्यानंतर सायन व के.इ.एम.रूग्णालयातील डॉक्टरांमार्फत परिपत्रक काढून चौकशी करण्यात आली. या चौकशीत वाडिया रूग्णालयातील डॉक्टरांकडून निष्काळजीपणा झाला नसल्याचे आढळून आले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न थोडासा वेगळा आहे. वाडिया रूग्णालय हे गरीब आणि सर्वसामान्य लोकांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. मध्यंतरी वाडिया रूग्णालय बंद होणार आणि रूगांची गैरसोय होणार अशा प्रकारचा अफवा उठल्या होत्या. तशा प्रकारच्या बातम्या प्रेसमध्ये देखील होत्या. हा प्रश्न वेगळा असला तरी जनसामान्यांच्या हिताच्या दृष्टीने वाडिया हॉस्पीटल बंद पडू देणार नाही अशी ग्वाही राज्य शासन देणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे रूग्णालय ट्रस्ट चालविते. या रूग्णालयावर राज्य शासनाचे 4 प्रतिनिधी व मुंबई महानगरपालिकेचे 4 प्रतिनिधी आहेत. आपली जी भावना आहे तीच बांधिलकी महाराष्ट्र सरकारची आहे. सर्वसामान्य माणसाला मदत मिळावी, न्याय मिळावा याचे उत्तम उदाहरण राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना आहे. या योजनेतून आपण वीकर सेक्शनला मदत करणार आहोत. तेव्हा हे रूग्णालय बंद पडणार नाही याबाबत शासन दक्ष राहील.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्हा शासकीय रुग्णालय (जि.बीड) येथील वॉर्मर मशिन्स सुरु करण्याबाबत

(4) * 38254 श्री.विनायकराव मेटे , श्री.धनंजय मुंडे , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख , श्री.सतीश चव्हाण : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जिल्हा शासकीय रुग्णालयात (जि.बीड) येथे मुदत पूर्व जन्मलेल्या व कमी वजनाच्या शिशूसाठी 6 वॉर्मरमशिनपैकी 5 मशिन्स बंद आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर मशिन्स केव्हापासून बंद आहेत,

(3) सदर मशिन्स बंद असल्यामुळे तीन शिशूंचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, या मशिन्स त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) हे खरे नाही. बीड जिल्हा रुग्णालयातील बालरुग्ण कक्षात 6 वॉर्मर उपलब्ध असून ते सर्व चालू स्थितीत आहेत. एप्रिल 2012 ते फेब्रुवारी, 2013 या कालावधीत 1213 रुग्ण बालकांनी वॉर्मरचा लाभ घेतला आहे. या कालावधीत वॉर्मर अभावी एकाही बालरुग्णाचा मृत्यू झालेला नाही.

(4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, बीड जिल्हा हा लोकसंख्येने अतिशय मोठा आहे. जिल्हा रूग्णालयामध्ये फक्त 6 वॉर्मर बसविले आहेत. ही संख्या अत्यंत कमी आहे. ती आपण वाढविणार आहात काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. वॉर्मर अभावी मृत्यू झालेला नाही असे आपण नमूद केलेले आहे. त्यामुळे ही बाब आपण तपासून पाहिली पाहिजे. कारण वॉर्मर बंद असल्यामुळे मृत्यू झालेला आहे. त्यामुळे याची देखील शासन चौकशी करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये नवीन एसएनसी युनिट मान्य करण्यात आलेले आहे. सध्या अडीच कोटी रूपये देण्यात आले असून बांधकाम सुरू आहे. आम्ही कॉन्ट्रॅक्च्युअल पोस्ट सर्व भरलेल्या आहेत. सहा वॉर्मर देण्यात आलेले असून त्यासंबंधीची ऑर्डर देखील देण्यात आलेली आहे. 20 वॉर्मर आणि 6 फोटो थेरेपी युनिट एप्रिल अखेर पर्यंत बीडमध्ये पोहोचतील. बिल्डींगचे काम पूर्ण झाल्यानंतर एसएनसीयु मध्ये अधिक चांगल्या प्रकारे काम सुरू होईल. आज एका वॉर्डमध्ये एसएनसीयु चांगल्या प्रकारे काम सुरू आहे.

यानंतर श्री.अजित....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38254....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये वॉर्मर मशीन नसल्यामुळे बालकांचा मृत्यू झालेला आहे हे खरे आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय,अशी घटना घडलेली नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा उत्तराला आक्षेप आहे. उत्तरामध्ये नमूद केले आहे की, तेथील कोणतेही मशीन बंद नाही. मी येथे जबादारीने सांगतो की, या क्षणाला सहा वॉर्मर मशीन्स पैकी पाच वॉर्मर मशीन्स बंद आहेत. तेव्हा या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल करणारी उत्तरे मिळत आहे. तेव्हा या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी व चौकशी होईपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे त्याप्रमाणे तेथील वॉर्मर मशीन्स सुरु आहेत. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्याची देखील माहिती घेण्यात येईल. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छिते की, आतापर्यंत 1266 बालकांनी या वॉर्मर मशीन्सचा लाभ घेतलेला आहे. आमच्या माहितीप्रमाणे वॉर्मर मशीन्स सुरु आहेत.

सभापती : माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्या संदर्भात आपणास प्रत्यक्ष माहिती कशी उपलब्ध होईल ते पहावे आणि ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सभागृहात येण्यापूर्वी या प्रश्नाच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली होती. त्यांनी मला सांगितले की, वॉर्मर मशीन्स सुरु आहेत. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य समजून प्रश्नोत्तराच्या तासानंतर मी स्वत: सन्माननीय सदस्यांना माझ्या सोबत घेऊन बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवर बोलून त्या संदर्भातील माहिती चेक करुन घेतो. जर आम्हाला संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात कमी किंमतीत औषधे उपलब्ध करुन देणारी

जनऔषधी स्टोअर्स सुरु करणेबाबत

(6) * 38531 **श्री.सुभाष चव्हाण , प्रा.सुरेश नवले , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.संजय दत्त** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गरजूंना कमी किंमतीत औषधे उपलब्ध करुन देण्याकरिता इतर राज्यात जनऔषधी स्टोअर्स यापूर्वीच सुरु झाले असून महाराष्ट्रात असे स्टोअर्स अद्यापही सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच उक्त प्रकरणी केंद्र शासनाने 4 वर्षापूर्वी निर्णय घेऊन आवश्यक असलेला राखीव फंड राज्य शासनाला पाठवूनही अद्याप याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने, सदरहू फंड परत जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) अंशत: खरे आहे.

(2), (3) व (4) केंद्र शासनाच्या अखत्यारितील औषध उत्पादक कंपन्यांची औषधे जनतेला माफक दरात प्राप्त व्हावीत यासाठी जन औषधी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अमंलबजावणीसाठी ब्युरो ऑफ फार्मा पीएसयु ही संस्था स्थापन करण्यात आली असून या संस्थेमार्फत जनऔषधी स्टोअर्सना केंद्र सरकारच्या औषध उत्पादक कंपन्यांची औषधे पुरविण्यात येतात. त्याच धर्तीवर महाराष्ट्रामध्ये सुध्दा प्रायोगिक तत्वावर जनऔषधी केंद्रे सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी रुपये 57.80 लक्ष अनुदानाच्या उपलब्धततेसाठी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सर्वसामान्य जनतेला स्वस्त किंमतीमध्ये औषधे मिळण्यासाठी केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून राज्य शासनाला आतापर्यंत किती निधी प्राप्त झाला, या संदर्भातील किती प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत व

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38531

श्री.सुभाष चव्हाण....

किंती प्रस्तावांवर कार्यवाही झालेली आहे ? तामिळनाडू, राजस्थान व अन्य काही राज्यांमध्ये अशा प्रकारची योजना राबविली जाते. तेव्हा माझा प्रश्न आहे की, अशा प्रकारची योजना महाराष्ट्रात दिनांक 1 मे पासून राबविण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही योजना मिनिस्ट्री ऑफ केमिकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स अंतर्गत डिपार्टमेंट ऑफ फार्मस्टीकल्स यांच्यामार्फत राबविण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी आंध प्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, उत्तरांचल, हरियाणा, पंजाब या राज्यांमध्ये करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सन 2013 पर्यंत एकूण 117 मेडिकल स्टोअर्समध्ये ही योजना सुरु करण्यात आली आहे. आपल्या राज्यात चार ठिकाणी जनेरिक स्टोअर्स करण्याचा विचार आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत 58.9 लक्ष रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून मे 2013 पर्यंत निधी मिळेल अशी अपेक्षा आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, जनेरिक मेडिसीन्स ही इंटरनॅशनल ब्रँडेंड औषधांपेक्षा खूप स्वस्त असतात. कालच सर्वोच्च न्यायालयाने नोव्हार्टिस कॅन्सरच्या औषधांसंदर्भात निर्णय दिलेला आहे. नोव्हार्टिस औषधाची किंमत 1 लाख 20 हजार रुपये आहे ते औषध 10 ते 12 हजार रुपयांना मिळू शकते. अशाप्रकारची जनेरिक मेडिसीन्सची दुकाने आपल्या राज्यात जास्तीत जास्त संख्येने उघडण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38531....

श्री.हेमंत टकले.....

त्यांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. मुंबईतील काही रुग्णालयांमध्ये काही संस्थांनी अशाप्रकारे औषधांची दुकाने सुरु केलेली आहेत. आरोग्य विभागाने केंद्र सरकार आणि एनआरएचएमची या कामी जरुर मदत घ्यावी. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार या कामी पुढाकार घेऊन राज्यात जास्तीत जास्त जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्याबाबत काही धोरण आखणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, राज्याच्या धोरणामध्ये जेनेरिक मेडीसीन पुरविण्याचा अंतर्भाव आहे. या धोरणांतर्गत ज्या ज्या ठिकाणी औषधे खरेदी करतो ती सर्व जेनेरिकच राहणार आहेत. ही योजना सुरु करण्यात आली आहे. जेनेरिक मेडीसीन थेट उत्पादकांकडून खरेदी त्यांचा पुरवठा थेट रुग्णालयांना केला जातो. हे मेडीसीन आपल्याला स्वस्त पडतात. पारदर्शक आणि प्रोक्युअरमेंटचे धोरण चांगले आहे आणि राज्यात ही योजना सर्व रुग्णालयात सुरु करण्यात आली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, मुळात अशा प्रकारची दुकाने सुरु करण्यास विलंब का झाला हा प्रश्न आहे. ही योजना सुरु झाल्याचे माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे. या प्रश्नाच्या पहिल्या प्रश्नाला "अंशत: खरे आहे" असे लेखी उत्तर दिले आहे. यातील नेमके अंशत: खरे काय आहे, या प्रकरणी विलंब का झाला, किती ठिकाणी जनऔषधी दुकाने सुरु आहेत आणि किती ठिकाणी बंद आहेत ?

प्रा.फौजिया खान : महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे भाग आहेत. जेनेरिक मेडीसीन थेट खरेदी करुन, ती सर्व रुग्णालयांना पुरविली जातात. हा प्रोक्युअरमेंट पॉलिसीचा भाग आहे. जनऔषधींची दुकाने सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे. केंद्र सरकारकडून निधी मिळाला तर अशी स्टोअर्स सुरु करण्यात येतील. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देते की, ज्या राज्यांमध्ये ही योजना सुरु करण्यात आली आहे त्यांचे रिझल्ट चांगले नाहीत. ती राज्ये सुध्दा ही योजना बंद करण्याच्या मार्गावर आहेत. अनेक राज्यांनी ही योजना बंद केली आहे. विभागाच्या माध्यमातून सर्व जेनेरिक मेडीसीनचा पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे जनऔषधींच्या दुकानांची खूप आवश्यकता आहे असे आम्हाला वाटत नाही. तरी सुध्दा आम्ही जनऔषधींची दुकाने सुरु करण्यासाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठविला आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : महोदय, माझे एकूण तीन प्रश्न आहेत. काल सर्वोच्च न्यायालयाने कॅन्सरवरील पेटंट ड्रग्जबाबत लँडमार्क निर्णय दिला आहे. आपल्या राज्यात कॅन्सर आजारावर उपचार करणारे रुग्णालय प्रामुख्याने शहरात आहेत. आरोग्य विभागामार्फत रिमोट एरियात कॅन्सरच्या केमोथेरेपी आणि पॅलिटीव्ह केअरसाठी डे केअर सेंटर सुरु करण्याचा शासन विचार करणार काय ? तसेच जेनेरिक मेडीसीन सेंट्रल पीएसयु बरोबर काही प्रायव्हेट पार्टीकडून घेतले जातात. प्रायव्हेट पार्टीकडून ड्रग्ज घेताना त्याची क्वॉलिटी कंट्रोल, स्ट्रेंथ इफेक्ट हा कसा मॉनिटर होतो ? आपल्या राज्याचे नाव 'महाराष्ट्र' आहे. इतर राज्यात या योजनेची अंमलबजावणी नीट झाली नसेल. परंतु आपले राज्य इतर राज्यांना दिशा देणारे ठरावे म्हणून आपल्या राज्यात ही योजना सुरु का करण्यात येत नाही ?

प्रा.फौजिया खान :महोदय, केमोथेरेपीची सुविधा अमरावती येथे सुरु केली आहे. ग्रामीण भागात सुध्दा टप्प्याटप्प्याने ते सुरु करण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला न्याय द्यावा.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त, आपल्याला न्याय देण्यासाठी माननीय मंत्री महोदय आहेत. माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी, या अनुषंगाने आपण काही उत्तर देऊ शकाल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : महोदय, महाराष्ट्र सरकारने दोन वर्षांपूर्वी महत्त्वपूर्ण धोरण तयार केले होते. डिव्हीजनल हेड क्वॉर्टर्समध्ये आपण कॅन्सरचे हॉस्पीटल सुरु करणार आहोत. औरंगाबाद येथे वैद्यकीय शिक्षण विभागाने कॅन्सरचे रुग्णालय सुरु केले आहे. आरोग्य विभागाने केमोथेरेपीसाठी ग्रामीण भागात डे केअर सेंटर सुरु करण्याची मोहीम हाती घेतली आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र. क्र. 38531 ..... श्री. सुरेश शेट्टी .....

विदर्भातील 7 जिल्ह्यात जून पासून सुरु होईल. पायलट प्रोजेक्ट म्हणून अमरावतीमध्ये केमोथेरपीसाठी डे केअर सेंटर चालू केले आहे. तेथील काही नर्सेसना मुंबईतील टाटा हॉस्पिटलमध्ये आणून त्यांना प्रशिक्षण देऊन त्या ठिकाणी पाठविले. अमरावतीमध्ये केमोथेरपीसाठी डे केअर सेंटर चालू आहे. विदर्भातील बाकीच्या सात जिल्ह्यांमध्ये जूनपर्यंत चालू होईल. सन्माननीय सदस्यांनी औषधांच्या बाबतीत विचारले. आमच्या खात्याच्या खरेदीमध्ये हॉस्पिटलमध्ये डिलिव्हरी होण्याच्या अगोदर प्रत्येक औषधाच्या लॉटचे रँडम सॅम्पलींग एफडीआयकडून आणि बाकीच्या लेबॉरटरीजकडून आम्ही करुन घेतो आणि त्यांचा अहवाल आल्यानंतरच ती औषधे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, सिव्हिल हॉस्पिटल्स यांच्याकडे वितरणासाठी जातात. विदाऊट क्वालिटीच्या एकाही औषधाचे वाटप आता आरोग्य खात्यामध्ये होत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, जनरिक औषधी आणि जनऔषधी स्टोअर्सच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, काही राज्यांनी ही योजना सुरु केली आणि बंद केली. लोकांमध्ये जनरीक औषधांविषयी अवेअरनेस नाही. जनरीक औषधी आणि जी ब्रांडेड औषधी आहेत त्याच्या मागची लोकांची जी भावना आहे ती वेगळी आहे. आपल्याला बरे वाटेल की नाही असे लोकांना वाटते. त्यामुळे जनरीक मेडिसिन वापरण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचा उपक्रम हाती घेणार का ? राज्याच्या प्रोक्युरमेंट पॉलिसीप्रमाणे किती टक्के आपण जनरीक मेडिसीन विकत घेतो ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, राज्याच्या आरोग्य खात्यामध्ये 100 टक्के जनरीक ड्रग्स विकत घेतो. मोहीम चालू करण्यासंबंधी चर्चा करण्यात येईल. आमचा जो पब्लीक अवेअरनेसचा जनरल कार्यक्रम असतो त्यामध्ये जनरीक मेडिसीनचा एक भाग पुढच्या वर्षी घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(७) * ३९३०४ श्री.जयवंतराव जाधव , श्री.अनिल भोसले : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयामधील सिव्हिल सर्जन यांना उपसंचालक व सिव्हील सर्जन अशी दुहेरी जबाबदारी पार पाडावी लागत असून सदर जिल्हा रुग्णालयांची मुख्य प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकारी ही महत्वाची दोन पदेही गेल्या आठ महिन्यांपासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील वैद्याकीय अधिक्षकांचे पद सुध्दा गेल्या वर्षभरापासून रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) अशंत: खरे आहे.
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक हे पद ११ मार्च २०१३ च्या आदेशान्वये भरण्यात आलेले आहे.

(२) होय,

(३) सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, जिल्हा रुग्णालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी व प्रशासन अधिकाऱ्याबरोबरच वर्ग एक ची 9 पदे रिक्त आहेत. त्याचबरोबर अधिपरिचारिका संवर्गातील 57 पदे रिक्त आहेत. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकाचे 1 पद वर्षभरापासून रिक्त आहे. त्याचबरोबर संदर्भसेवा रुग्णालयातील हृदयविकार शस्त्रक्रिया तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ अशा एकूण पदांपैकी 92 पदे रिक्त आहेत. ही पदे कधी भरणार ? नुकतेच काही महिन्यांपूर्वी माननीय राज्यमंत्री त्या ठिकाणी आल्या होत्या आणि त्यांनी त्या ठिकाणची वस्तुस्थिती पाहिल्यानंतर सुध्दा अजूनही कार्यवाहीच का चालू आहे ? ही पदे किती दिवसात भरणार ? त्या ठिकाणी आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पी.जी इन्स्टिट्यूटची मागणी केलेली आहे. त्या ठिकाणी पी.जी. इन्स्टिट्यूट सुरु करण्यास मान्यता देणार का, मान्यता देणार असाल तर किती दिवसात देणार आणि देणार नसाल तर का देणार नाही ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. 39304 .....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, नाशिकमध्ये मालेगावचे डॉ. डी.डी.पवार यांच्याकडे उप संचालकांचा कार्यभार दिलेला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक या पदावर डॉ. आर.एम.शिंगे यांना पदस्थापना देण्यात आली आहे. मुख्य प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी ही पदे लवकरात लवकर भरण्याची प्रक्रिया चालू आहे. त्यांची डीपीसी झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी संदर्भ रुग्णालयाच्या बाबतीत प्रश्न विचारला. त्यामध्ये वैद्यकीय अधीक्षकाचे पद लवकर भरता येईल आणि त्याचे आदेश 15 एप्रिलपर्यंत निर्गमित करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी सुपर स्पेशालिस्टबाबत प्रश्न विचारला. त्या ठिकाणी सुपर स्पेशालिस्ट असावेत यासाठी रिक्रुटमेंट रुल्समध्ये बदल करण्याची प्रक्रिया चालू आहे. आता आपण बॉण्डेड उमेदवार घेतले आहेत त्यामध्ये कार्डियोथोरॉसिक सर्जन आहे तसेच न्युरॉलॉजीचे, नेफ्रॉलॉजीचे सर्व स्पेशालिस्ट घेण्यात आलेले आहेत. बाकीची पदे भरण्यासाठी जसजशी रिक्रुटमेंट होईल तसतशी पदे देण्यात येतील.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39304.....

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, वैद्यकीय अधीक्षक हे पद वर्षानुवर्षे रिक्त आहे. त्यामुळे त्या रुग्णालयाचा कारभार कसा काय चालू शकतो ? मी मंत्री महोदयांना स्वत: त्या रुग्णालयात घेऊन गेलो होतो.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 15 एप्रिल, 2013 पर्यंत वैद्यकीय अधीक्षकांचे पद भरण्याबाबत ऑर्डर देण्यात येईल. त्यांची वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर ते कामावर रुजू होतील. त्याचप्रमाणे इतर पदे भरण्याची प्रकिया जसजशी पूर्ण होईल तसतशी रिक्त पदे भरण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नाशिक जिल्हा रुग्णालय व संदर्भ रुग्णालयासंबंधीचा हा प्रश्न आहे. 2015 मध्ये नाशिकला कुंभमेळा भरणार आहे. त्यामुळे तेथे नाशिकच्या काही पटीने फ्लोटिंग पॉप्युलेशन येणार आहे. त्यामुळे आतापासून त्याचे नियोजन केले पाहिजे. त्यामुळे या दोन्ही रुग्णालयांचे अपग्रेडेशन करण्याची आवश्यकता आहे. नाशिकला आरोग्य विज्ञान विद्यापीठ असल्यामुळे त्या विद्यापीठामार्फत या दोन्ही रुग्णालयांचा दर्जा वाढविण्याचा विचार शासन करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.जयवंतराव जाधव : पी.जी.इन्स्टिटयूटबाबत मी प्रश्न विचारला होता ते कधी सुरु होणार आहे ?

प्रा.फौजिया खान : ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलचा कारभार दिरंगाईने सुरु आहे. दोन वर्षापूर्वी त्या हॉस्पिटलमध्ये 105 कर्मचाऱ्यांची भरती झाली होती. त्या भरतीचे प्रकरण हायकोर्टात गेले होते. त्या भरतीमध्ये भ्रष्टाचार व अनागोंदी प्रकार झाल्याचे सिध्द झाले होते. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकण्याचे आदेश हायकोर्टाने दिले होते. मी हा प्रश्न सभागृहात विचारला असता मंत्री महोदयांनी या प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्याचे जाहीर केले होते. परंतु त्या विभागाने अद्याप कोणतीही चौकशी सुरु केलेली नाही. त्यामुळे ही ठराविक कालावधीत चौकशी सुरु करण्याबाबत शासनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला कळविले आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

ता.प्र.क्र.39304.....

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. परंतु या सभागृहामध्ये या प्रश्नासंबंधी बरीच चर्चा झाली होती. आरोग्य खात्याने हे प्रकरण ए.सी.बी.कडे रेफर केलेले आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राणहिता नदीवरील चवेल्ला धरणामुळे गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील शेती व अभयारण्य बाधित होणार असल्याबाबत

(8) * 39378 श्रीमती शोभा फडणवीस : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र आंध्रप्रदेश सीमेवर वर्धा व पैनगंगा संगमाजवळील प्राणहिता नदीवर चवेल्ला धरणामुळे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघांचे गडचिरोलीतील चपराळ व आंध्रप्रदेशातील कावल अभयारण्याकडे जाणारे भ्रमणमार्ग प्रभावित होण्याची भीती वन्यजीव संरक्षण संघटनांकडून व्यक्त केली जात असल्याचे माहे डिसेंबर, 2012 च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच प्राणहिता चव्वेला सुजला श्रवंती प्रकल्पांसाठी 2009 ते 2012 या तीन वर्षाच्या काळात 15 कि.मी. चा कालवा आंध्र सरकारने खोदला, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत दिनांक 15 मे, 2012 रोजी दोन्ही राज्यांचे मुख्यमंत्री व जलसंपदा विभागाच्या मुख्य सचिवांनी नागपूर येथे झालेल्या बैठकीत या करारनाम्यावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, त्यावेळी दोन्ही राज्यांचे सर्वेक्षण करुन किती गावे पाण्याखाली येणार, किती क्षेत्र बाधित होणार, तसेच पुनर्वसन आदि विषयांवर सर्वेक्षण करण्याचे अधिकार दोन्ही राज्यांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(5) तसेच सदर धरणामुळे गडचिरोली जिल्ह्यातील चार तर चंद्रपूर जिल्ह्याच्या गोंडपिंपरी तालुक्यातील पाच गावांना फटका बसणार असून दोन्ही जिल्ह्यातील सुमारे 5 हजार 250 एकर शेती प्रकल्पामुळे बाधित होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(6) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(7) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री. सुनील तटकरे यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. वन्यजीव संरक्षण संघटनाचे माहे डिसेंबर 2012 च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.

(2) अंशत: खरे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राणहिता चेव्वेला सुजला श्रवंती प्रकल्पाच्या कालव्याचे काम आंध्रप्रदेश शासनाने आंध्रप्रदेश हद्दीत "रनवेली" गावाजवळ साधारण: राज्याचे सीमेपासून 8-10 कि.मी. वर सुरु केले आहे ही वस्तुस्थिती आहे. मात्र सदर कालव्याचे काम आंध्र हद्दीत आंध्रप्रदेश शासन करीत असल्याचे नक्की. किती कि.मी. कालव्याचे काम आंध्र सरकारने केले याचे मोजमाप उपलब्ध नाही.

(3) अंशत: खरे आहे. दि. 15 मे 2012 रोजी दोन्ही राज्या दरम्यान नागपूरात कोणतीच बैठक झाली नाही. तथापि, डॉ.बी.आर. आंबेडकर, प्राणहिता चेवेल्ला सुजला श्रवंती या प्रकल्पासाठी आंतरराज्य मंडळ स्थापन करावयाच्या करारावर दि. 5.5.2012 रोजी नवी दिल्ली येथे दोन्ही राज्याचे मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. सदर कराराचे परिशिष्टावर दोन्ही राज्याच्या जलसंपदा विभागाच्या प्रधान सचिवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(4) अंशत: खरे आहे. सर्वेक्षणाचे काम संयुक्तपणे केले जाणार आहे. बंधारा स्थळाचे सखोल सर्वेक्षण, नियंत्रण पातळ्या, भू-संपादन, पुनर्वसन या सर्व बाबींवर आंतरराज्य मंडळाचे नियंत्रण असणार आहे. सर्व निर्णय परस्पर सहमतीनेच घेतले जाणार आहेत.
(5) अंशत: खरे आहे. आंध्रप्रदेश शासनाने मानचिन्हाचे आधारे तयार केलेल्या प्रकल्प अहवालानुसार पूर्ण संचय पातळी 152 मी. गृहीत धरुन काढलेले एकूण बुडीत क्षेत्र 2456 हे. (6140 एकर) आहे. त्यापैकी महाराष्ट्राचे बुडीत क्षेत्र 2099 हे. (84 टक्के) आहे. यापैकी नदीपात्रातील क्षेत्र 1358 हे.व नदीपात्राबाहेरील क्षेत्र 741 हे राहील. चंद्रपूर जिल्ह्यातील 22 व गडचिरोली जिल्ह्यातील 8 गावामधील नदी काठची जमीन बाधित होणार आहे. मात्र एकही गावठाण बाधित होणार नाही. तथापि, आंध्रप्रदेश शासनाने तयार केलेला सदर प्रकल्प अहवाल सखोल सर्वेक्षणावर आधारित नाही. तसेच अहवालास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नाही. सर्वेक्षणानंतर दोन्ही राज्याच्या सहमतीनेच आंतरराज्य मंडळाचे माध्यमातून बंधाऱ्याचे स्थळ व नियंत्रण पातळ्या निश्चितीनंतर या बाबी स्पष्ट होतील.
(6) दि. 5 मे 2012 रोजी आंध्रप्रदेश शासनासोबत आंतरराज्य मंडळ स्थापनेबाबतचा करार करण्यात आला आहे. या आंतरराज्य करारातील तरतुदी नुसार स्थापन झालेल्या मुख्य अभियंता स्तरावरील सनियंत्रण समितीची बैठक दिनांक 21 जानेवारी 2013 रोजी हैद्राबाद येथे झाली. या समन्वय समितीचे बैठकीत 152 मी. बंधारा पातळीस महाराष्ट्राकडून प्रखर विरोध दर्शविण्यात आला. तसेच बंधारा पातळी कमी करण्यास वाव आहे हे आंध्रप्रदेशच्या प्रतिनिधींना पटवून दिले. महाराष्ट्राची भूमिका विचारात घेऊन बंधाऱ्याची पूर्ण संचय पातळी शक्य तेवढी कमी करण्यासाठी सर्व अभियांत्रिकी पर्याय तपासण्याचे सदर बैठकीत ठरले आहे.
(7) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आंध्र प्रदेशमध्ये झालेल्या कामाचे मोजमाप आपल्याकडे नाही असे नकारार्थी उत्तर नमूद केलेले आहे. परंतु गोदावरी लवादाच्या निर्णयाप्रमाणे दोन्ही राज्याच्या संमतीनेच काम केले पाहिजे. असे असताना आंध्र प्रदेश सरकारने 15 कि.मी.पर्यंत काम केलेले आहे. ती जागा मी स्वत: पाहिलेली आहे. मी मुख्य अभियंत्यांना त्याची कल्पना दिलेली आहे. तरीही त्यांनी त्या कामाची माहिती दिली नाही. हे खरे आहे का, सर्वेक्षणाचे काम संयुक्तपणे केले जाणार आहे असे दुसऱ्या उत्तरात म्हटलेले आहे. आंध्र प्रदेशमध्ये 70 कि.मी.पर्यंतची भूसंपादनाची कामे पूर्ण झालेली आहेत. संपूर्ण आंध्र प्रदेश तेलंगणाचा सिंचनाचा प्लॅन तयार झालेला आहे. तो प्लॅन शासन थांबविणार आहे काय ? चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील एकही गाव या प्रकल्पामुळे बाधित होणार नाही असे नमूद केलेले आहे. ते बरोबर नाही. 2008 च्या प्लॅननुसार चंद्रपूर जिल्ह्यातील 6 व गडचिरोली जिल्ह्यातील 3 गावे

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बाधित होणार आहेत. शासनाने या प्रकल्पासाठी प्लॅनिंग केलेले आहे. या प्रकल्पामुळे गावे बांधित होणार नाहीत हे कोणत्या अहवालावरुन सांगितले जात आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : या प्रकल्पासाठी आंतरराज्य मंडळाची स्थापना झालेली आहे. प्राणहिता बंधाऱ्याचे संरक्षण करणे, संकल्पनेनुसार बांधकाम परस्पर सहमतीने व्हावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या प्रत्येक टप्प्यावर महाराष्ट्राचे नियंत्रण ठेवता यावे यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री यांनी आंतरराज्यीय मंडळ स्थापन करण्याचा करार 5 मे 2012 रोजी केलेला आहे. संकल्पना तयार करणे, पातळया निश्चित करणे, सर्वेक्षण करुन अहवाल तयार करणे अशा प्रकारे या मंडळाच्या कामाची व्याप्ती आहे. या मंडळाचे अध्यक्ष एका वर्षी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री राहातील तर दुस-या वर्षी आंध्रप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री राहातील असे या करारामध्ये नमूद केलेले आहे. या करारा अनुसार कामे व्हावीत अशी संकल्पना आहे.

सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन महत्वाचे प्रश्न विचारलेले आहेत. बंधा-याचा पाणी प्रसार वैनगंगा व वर्धा नदीत राहाणार आहे. मानचिन्ह अभ्यासाद्वारे आंध्रप्रदेश राज्याने केलेल्या प्रकल्प अहवालानुसार चंद्रपूर जिल्हयातील 22 गावे व गडचिरोली जिल्हयातील 8 गावातील नदीकाठची जमीन बाधित होणार आहे. पण एकही गावठाण बाधित होणार नाही असे संकल्प चित्रामध्ये सांगण्यात आले. या बाबतीत अंतिम निर्णय हा चर्चेतून घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आंध्रप्रदेशच्या हद्दीमध्ये काम सुरु आहेत. त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, आंध्रप्रदेश शासनाने आंध्रप्रदेश हद्दीत आपल्या राज्याच्या सीमेपासून 8 ते 10 कि.मी.वर कालव्याची कामे सुरु केलेली आहेत. कालव्याच्या तळाची रुंदी 19.50 मीटर असून वहन उंची 4.75 मीटर आहे, कालव्याची वहन क्षमता 583 घन मीटर प्रति सेकंद इतकी आहे. आंध्रप्रदेश शासनाने किती लांबीचे काम केलेले आहे याची माहिती प्राप्त नाही. त्याची माहिती घेण्यासाठी आमच्या अधिका-यांना सांगण्यात येईल. ती माहिती प्राप्त झाल्यानंतर ती सन्माननीय सदस्यांना सांगण्यात येईल.

हैद्राबाद येथे दिनांक 21.1.2013 रोजी संनियत्रण समितीची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये 5 मे रोजी जे निर्णय झाले त्या निर्णयानुसार अनेक बाबीवर चर्चा झाली. आता या धरणाच्या संदर्भात वन विभाग आणि पर्यावरण विभाग यांच्याकडे या प्रकल्पाच्या संदर्भातील सर्व संकल्पना सादर करण्यात येतील. या विभागांची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर या प्रकल्पाच्या बाबतीत कारवाई करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : एकही गाव बाधित होणार नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले. गावे नदीच्या काठावर आहेत. मी स्वत: गावांना भेटी देऊन आले आहे. पावसाळयामध्ये या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गावामध्ये पुराचे पाणी जाते. असे असताना तेथे बंधारा बांधला तर ती गावे पाण्याखाली येणार नाहीत अशा प्रकारचे वक्तव्य आपण कोणत्या आधारे करीत आहात ?

श्री. राजेंद्र मुळक : या संदर्भात जी प्रस्तावित संकल्पना आहे त्या आधारावर मी सन्माननीय सदस्यांना सांगत आहे. गावठाण बाधित होत नाही. गावठाणच्या परिसरातील शेतजमिनी बाधित होत आहेत. ..(अडथळा)... गावठाण वेगळे आणि शेत जमीन वेगळी असते. त्या भागातील शेत जमीन अंशत: बाधित होते. ही संकल्पना प्रस्तावित आहे. जोपर्यंत वन विभागाची आणि पर्यावरण विभागाची परवनगी मिळत नाही तोपर्यन्त आपण संकल्पचित्र तयार करू शकत नाही. या प्रस्तावित बाबी आहेत. सन्माननीय सदस्य जे सांगतात तीच भावना त्या परिसरातील निवडून आलेल्या अन्य सदस्यांची देखील आहे. त्यांच्या भावना लक्षात घेऊन संकल्पना तयार केली जाईल आणि त्या पध्दतीने कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.399378...

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, शासन अतिशय गंभीर आहे त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. प्रकल्पाचे नाव प्राणहिता चव्वेला सुजला श्रवंती असे आहे. प्राणहिता चव्वेला सुजला श्रवंती याचा अर्थ राज्य शासनाला माहिती आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, यासंबंधी माहिती घेतो आणि सन्माननीय सदस्यांना ती माहिती जरुर अवगत करुन देतो.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: डॉ.(श्रीमती) इंदूमती धनंजयराव नाकाडे यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. (श्रीमती) इंदूताई धनंजयराव नाकाडे, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"डॉ.(श्रीमती) इंदूताई धनंजयराव नाकाडे यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. डॉ.(श्रीमती) इंदूताई धनंजयराव नाकाडे यांचा जन्म ४ मार्च, १९४१ रोजी भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे झाला. त्यांचे शिक्षण डी.एम.पी. पर्यंत झाले होते.

कै. डॉ.(श्रीमती) नाकाडे यांनी विसोरा येथील विनायक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा, राष्ट्रीय शिक्षण संस्था, अंगारा च्या कार्याध्यक्षा, सेकंडरी एज्युकेशन सोसायटी, साकोली च्या सदस्या, तसेच स्व. शामरावबापू कापगते स्मृती प्रतिष्ठान, भंडारा, राजमाता बहुउद्देशीय बिगर शेती महिला सहकारी पतसंस्था, देसाईगंज, व कर्मवीर जंगल कामगार सोसायटी, विसोरा च्या अध्यक्षा म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा भंडारा व गडचिरोली जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थाशी निकटचा संबंध होता.

कै. डॉ.(श्रीमती) नाकाडे यांनी सुरुवातीस जनसंघाचे कार्य केले होते तसेच भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारणीच्या सदस्या म्हणूनही अनेक वर्षे कार्य केले होते. त्या भारतीय जनता पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या होत्या.

कै. डॉ. (श्रीमती) नाकाडे १९९६ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालांद्वारा नामनियुक्त झाल्या होत्या.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे शनिवार दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांनी डॉ.(श्रीमती) इंदूमती धनंजयराव नाकाडे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, डॉ.इंदूताई नाकाडे यांचा साकोली येथे जन्म झाला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे डॉ.शामरावबापू कापगते यांच्या घरात त्यांचा जन्म झाला होता. भंडारा जिल्हयातील कापगते घराणे जनसंघापासून महाराष्ट्राला माहित होते. ज्यावेळी जनसंघाचे कोणी निवडून येत नव्हते त्यावेळेला शामरावबापू कापगते जनसंघ पक्षाचे प्रतिनिधी म्हणून साकोली मतदारसंघातून निवडून आले होते. त्यांच्या सुकन्या डॉ.इंदूमती नाकाडे यांना जन्मत:च राजकारणाचे बाळकडू मिळाले होते. श्री.धनंजयराव नाकाडे यांच्याशी त्यांचा विवाह झाला त्यावेळेला धनंजयराव नाकाडे यांचेही घराणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडित होते आणि ते देखील जनसंघाशी संबंधित होते. त्यामुळे लग्नापूर्वी आणि लग्नानंतर सुध्दा इंदूताईना सामाजिक कार्याची आणि राजकारणाची आवड निर्माण झाली होती. त्यांनी आपले उच्च शिक्षण लग्न झाल्यानंतर पूर्ण केले. सासरी गेल्यानंतर सुध्दा त्यांनी राजकारण आणि समाजकारण सुरु ठेवले. त्याबाबतीत सासरकडून त्यांना कोणतेही बंधन नव्हते.

सभापती महोदय, 1964 मध्ये त्यांनी जनसंघाच्या कार्याला सुरुवात केली. जनसंघातून जनता पार्टी स्थापन झाली, त्यावेळी सुध्दा त्या जनता पार्टीमध्ये कार्यरत होत्या.

नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

1977 मध्ये त्यांनी सक्रिय स्वरुपात जनता पक्षामध्ये काम करण्यास सुरुवात केली. ज्यावेळी 1980 साली भारतीय जनता पक्षाची निर्मिती झाली त्यावेळेपासून त्या भारतीय जनता पक्षाचे काम करु लागल्या. प्रदेश कार्यकारिणीच्या सदस्या म्हणून भारतीय जनता पक्षाचे काम त्या करीत होत्या.

सभापती महोदय, गडचिरोली, भंडारा या जिल्हयामध्ये या तडफदार महिलेने ग्रामीण भागात फिरुन आपल्या वैद्यकीय व्यवसायाबरोबर राजकारणाच्या माध्यमातून गावोगावी पक्षाचे काम पोहोचविण्याचे काम केले. खरोखर गडचिरोली जिल्हा हा नक्षलवादी जिल्हा असताना त्यांना कधी भय वाटले नाही, त्यांनी गडचिरोली जिल्हयातील आपले दौरे कमी केले नाहीत किंवा त्यांना नक्षलवाद्यांचा कोणताही त्रास झाला नाही. सामाजिक कार्य करता करता त्यांनी त्या भागात रचनात्मक कामाला सुरुवात केली. त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या. विसोरा हे त्यांचे सासरचे गाव आहे. विसोरा येथील विनायक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा, राष्ट्रीय शिक्षण संस्था, अंगोराच्या कार्याध्यक्षा, सेकंडरी एज्युकेशन सोसायटी, साकोलीच्या सदस्या, राजमाता बहुउद्देशीय बिगर शेती महिला सहकारी पतसंस्था, देसाईगंज आणि कर्मवीर जंगल कामगार सोसायटी, विसोराच्या अध्यक्षा म्हणूनही त्यांनी काम केले होते. एका बाजूला राजकारण आणि दुसऱ्या बाजूला समाजकारण करीत त्या डॉक्टर असल्यामुळे भंडारा आणि गडचिरोली जिल्हयातील गरीब आणि सर्वसामान्य लोकांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन त्यांनी केले होते. सर्वसामान्य लोकांना आरोग्य सुविधांचा लाभ कसा देता येईल यासाठी त्या सतत प्रयत्नशील असल्यामुळे पक्षाला त्यांच्या कार्याची दखल घ्यावी लागली.

सभापती महोदय, 1994 मध्ये युती सरकार सत्तारुढ झाल्यानंतर त्यांना राज्यपालांकडून या सभागृहामध्ये सदस्य म्हणून नामनियुक्त करण्यात आले. या सभागृहात प्रवेश केल्यानंतर त्यांनी आपल्या अनुभवाच्या माध्यमातून सभागृहाच्या विविध आयुधांचा वापर करीत सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. 1964 मध्ये ज्यावेळी जनसंघाच्या जवळ कोणी जात नव्हते, अशा काळात एक महिला या नात्याने त्यानी गावोगावी फिरुन जनसंघाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचे काम केले होते. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, मागील दोन वर्षाच्या काळात त्यांना कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाला सामोरे जावे लागले. उपचारासाठी त्या सतत मुंबईला येत असत. मागील हिवाळी अधिवेशन काळात त्या नागपूर येथील विधानभवनामध्ये आल्या होत्या. त्यांची प्रकृती खालावलेली दिसली. तरी देखील गडचिरोली आणि भंडारा जिल्हयातील सर्वसामान्यांचे प्रश्न घेऊन त्या माझ्याकडे आल्या होत्या. माननीय विरोधी पक्षनेत्यांची त्यांनी भेट घेतली होती. कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाने ग्रासलेले असताना त्यांची जनसेवा सुरुच होती. मी त्यांना म्हटले होते की, तुम्ही नागपूरपर्यंत कशाला आलात? निवेदने आमच्याकडे पाठविली असती तरी आम्ही त्याची दखल घेतली असती. परंतु जीवनाच्या शेवटपर्यंत त्यांनी समाजकारण आणि राजकारणात अंतर पडू दिले नाही. आपली संपूर्ण हयात त्यांनी समाजासाठी समर्पण केली. अशा एका तडफदार महिलेचे निधन झालेले आहे. मी भारतीय जनता पक्षाच्या वतीने, विरोधी पक्षाच्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी डॉ.(श्रीमती) इंदूताई धनंजयराव नाकाडे, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. विरोधी पक्षातर्फे माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या दुखवट्याच्या प्रस्तावाला अनुमोदन दिले आहे.

डॉ.(श्रीमती) इंदूताई नाकाडे या भंडारा आणि गडचिरोली जिल्हयातील अनेक शैक्षणिक, सामाजिक संस्थांशी सतत निगडित असणाऱ्या अत्यंत तडफदार महिला कार्यकर्त्या होत्या. विसोरा येथील विनायक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा, राष्ट्रीय शिक्षण संस्था, अंगोराच्या कार्याध्यक्षा, सेकंडरी एज्युकेशन सोसायटी, साकोलीच्या सदस्या तसेच स्व.शामरावबापू कापगते स्मृती प्रतिष्ठान, भंडारा इत्यादी सार्वजनिक संस्थांच्या कार्यात त्या सातत्याने कार्यमग्न होत्या.

नंतर 2के.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

डॉ.(श्रीमती) इंदूताई नाकाडे या 1996 मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर राज्यपालांद्वारा नियुक्त झाल्या होत्या. त्यांचे शनिवार दिनांक 30 मार्च, 2013 रोजी दु:खद निधन झाले.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

शोक प्रस्ताव संमत झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे तहकूब करण्याची प्रथा असल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(दुपारी 01.11 ते 01.21 स्थगित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, नागो गाणार यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सदर सूचना माननीय सभापती यांनी दालनात नाकारली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण हक्काच्या अनुषंगाने हा खूप महत्त्वाचा विषय आहे. शिक्षण हक्क विधेयक लागू होऊन तीन वर्षे झालेली आहेत. त्याच्या अंमलबजावणी संबंधात गंभीर विषय निर्माण झालेला आहे. त्यावर चर्चा होऊन शासनाची भूमिका समजणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे कोणत्या तरी मार्गाने हा विषय सभागृहापुढे येणे गरजेचे आहे. यासंबंधी शासनाची भूमिका समजणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व शाळांच्या दृष्टीने हा विषय महत्वाचा आहे.

तालिका सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे त्यांनी अन्य संसदीय आयुधांचा वापर करून हा प्रश्न उपस्थित करावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आपण मी दिलेली 289 च्या प्रस्तावाची सूचना नाकारलेली आहे. मी आपल्या निदेशा विरोधात जात नाही. यासंबंधात आम्ही लक्षवेधी सूचना दिली तर ती आपण स्वीकृत करून त्यावर चर्चा घडवून आणावी.

तालिका सभापती : ठीक आहे.

श्री.रामनाथ मोते : धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांनी पत्रव्यवहाराकडे केलेले दुर्लक्ष

मु.शी.: मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांनी पत्रव्यवहाराकडे केलेले दुर्लक्ष या बाबत श्री.विनायक राऊत,वि.प.स.यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी "मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांनी पत्रव्यवहाराकडे केलेले दुर्लक्ष याबाबत अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्या विरूद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधान परिषद नियम 240 अन्वये विशेषाधिकार भंगाची सूचना सादर करीत आहे.

लोकप्रतिनिधींच्या पत्रांना शासकीय व महापालिका अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन उत्तर देणे आवश्यक आहे. परंतु, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांनी आम्ही सातत्याने पत्र व्यवहार करीत असताना त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे आम्हाला अपेक्षित माहिती मिळू शकलेली नाही म्हणून मी हक्कभंग प्रस्ताव सादर करीत असून तो आपण स्वीकृत करून घ्यावा अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : यासंबंधातील माहिती संबंधितांकडून मागवून घेतली जाईल व ती तपासल्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "खामगाव जिल्हा बुलढाणा येथील पिंपळगावराजा विभागात असलेल्या कवळगाव, बेलखेड, टाकळी या वनविभागाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर सागवान व जंगली वृक्षाची होत असलेली तोड" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर यांनी "मौजे पहाडी, लिकींग रोड, गोरेगाव मुंबई येथील पोलीरास टॉवर मधील खोल्यांच्या विक्रीच्या वेळेस विकासक मे.सेठ डेव्हलपर्स प्रा.लि.यांनी नमूद केलेल्या सुविधांपैकी एकही सुविधा न पुरविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी "अमरावती विभागातील कृषी विभागांतर्गत शेतीला लागणारे ब्रश कटर निर्धारित दरापेक्षा जास्त दराने खरेदी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "पुणे मुंबई सारख्या शहरात नक्षलविचारांना पाठिंबा मिळविण्यासाठी नक्षलवादी संघटना कार्यरत असून या संघटनेच्या कार्यकर्त्यांना अटक करुन कारवाई करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "खोपोली (ता. खालापूर, जि.रायगड) नगरपरिषदेचे गाळे भाड्याने देताना नगरपरिषदेने केलेली हाराकिरी, परिणामी नगरपरिषदचे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "राज्यामध्ये आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळेतील मुलामुलींसाठी टॉप व पायजमा खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे यांनी "शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शाळांमधील पाचवीचे सर्व व आठवीचे काही वर्ग जिल्हापरिषदांच्या मराठी शाळांना जोडण्याच्या निर्णयामुळे माध्यमिक शाळांमधील शेकडो शिक्षकांना अतिरिक्त होऊन जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये समायोजित होण्याची आलेली वेळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या निवेदना संदर्भात</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन चर्चेसाठी आले आहे. परंतु सभागृहात पाणी पुरवठा विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत. तेव्हा हे निवेदन नंतर घ्यावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

तालिका सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या इमारतीमधील प्रपोझल डिपार्टमेंटमधील काही हजार फाईल्स ओसी न घेता गहाळ झालेल्या आहेत. त्या संदर्भात मुंबई महानगरपलिका आयुक्तांनी दिनांक 28 फेब्रुवारी, 2013 रोजी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली. ओसी फाईल्स गहाळ झाल्यामुळे जवळपास 25 ते 30 हजार नागरिकांना स्वत:च्या ओसी मिळू शकणार नाही. त्यामुळे अनधिकृत बांधक्रामामध्ये होणारी वाढ आणि ओसी न मिळाल्यामुळे नागरिकांवर पडणारा पाण्याचा आणि प्रॉपर्टी टॅक्सचा जादा बोजा व मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील गहाळ फाईल्सची पोलिसांना करावी लागणारी चौकशी याबद्दलचा विषय मी औचित्याच्या माध्यमातून मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

दिनांक 26 मार्च रोजी रंगपंचमी होती. राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे रंगपंचमीच्या दिवशी पाण्याचा वापर करु नये असे आवाहन सर्वांना करण्यात आले होते आणि या आवाहनाचे सर्वांकडून पालन करण्यात आले होते. परंतु मुंबईतील वर्सोवा, यारी रोड येथील पंचवटी सोसायटीमध्ये काही तरुण- तरुणी रेनडान्स करीत होते. त्यामुळे हजारो लीटर पाणी वाया जात होते. या संदर्भात ज्येष्ठ अभिनेत श्री.सदाशिव अमरापूर यांनी तेथील सोसायटीकडे तक्रार केली असता त्यांना सोसायटीच्या आवारामध्ये धक्काबुक्की करण्यात आली आणि काही अपशब्द वापरण्यात आले. या घटनेबाबत श्री.सदाशिव अमरापूरकर यांनी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. परंतु ज्या तरुणांनी आपल्या संपत्तीचे आणि स्वतःच्या बेजबाबदारपणाचे दर्शन दिले त्या तरुणांविरुध्द तक्रार करुनही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नसेल तर अशाप्रकारच्या प्रवृत्तीमध्ये वाढ होण्याचा संभव आहे. तेव्हा श्री.सदाशिव अमरापूरकर यांच्या तक्रारीची त्वरित दखल घेऊन त्या संदर्भात कारवाई व्हावी याकडे मी सदनाचे लक्ष वेधत आहे.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :श्रीरामपूर तालुक्यातील सोनईजवळ मेहतर समाजातील तीन तरुणांची झालेली निर्घृण हत्या

मु. शी. :श्रीरामपूर तालुक्यातील सोनईजवळ मेहतर समाजातील तीन तरुणांची झालेली निर्घृण हत्या या संबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. जयवंतराव जाधव, विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. राम पंडागळे.,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माहे जानेवारी, 2013 मध्ये श्रीरामपूर (जि.अहमदनगर) या तालुक्यातील सोनईजवळ मेहत्तर समाजातील शौचालय साफ करणाऱ्या तीन तरुणांची अत्यंत निर्घृणपणे झालेली हत्त्या, एका श्रीमंत बागायतदाराने या तरुणांना विठ्ठलवाडी शिवारात शौचालय साफ करण्याचे कारण सांगून बोलविण्यात येणे, चारा कापण्याच्या अडकित्याचा वापर करण्यात येऊन अतिशय निर्घृणपणे एका तरुणाचे हातापायाचे, डोक्याचे व शरीराचे बारीक बारीक तुकडे करण्यात येऊन ते बोअरमध्ये टाकण्यात येणे, याबाबत संबंधित पोलीस स्टेशनने गुन्हा नोंदविण्यास दिरंगाई करुन तसेच या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यास टाळाटाळ व दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रत सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदातील शेवटच्या ओळीतील "गुन्ह्याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविला आहे, गुन्ह्याचा तपास सुरु आहे." या ऐवजी "या गुन्ह्याचा तपास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील...

राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडून करण्यात आला व दिनांक 26.3.2013 रोजी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे" असे वाचावे. तसेच निवेदनाच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मयताच्या तीन नातेवाईकांना प्रत्येकी एक लाख रुपयांप्रमाणे सहाय्य देण्यात आले असून मयत संदीप राजू तनवार यांच्या पत्नीला आदिवासी शासकीय वसतिगृह, मालेगाव येथे शिपाई पदावर नोकरी देण्यात आली" असे वाचावे.

तालिका सभापती : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..7...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मेहतर समाज हा दलित समाजातील अत्यंत खालच्या समाजातील उपेक्षित घटक आहे. या समाजातील तीन तरुणांची निघृण हत्या करण्यात आली. एका श्रीमंत बागायतदाराने शौचालय साफ करण्यासाठी या तिघा तरुणांना बोलावून घेतले आणि त्यांची हत्या केली.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

हत्या केल्यानंतर तो थांबला नाही. चारा कापण्याच्या अडकित्त्याचा वापर करुन त्याने त्या तरुणांच्या शरीराचे तुकडे तुकडे केले. महोदय, बोलताना माझ्या अंगावर शहारे उभे राहत आहेत. ती व्यक्ती त्या तरुणांच्या शरीराचे तुकडे करुनच थांबली नाही तर त्या तुकड्यांना बोअरमध्ये टाकले. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, गुन्ह्याचा तपास सुरु आहे. या निमित्ताने मी विचारतो की, खून करणारा नराधम कोण आहे, त्याचे नावे काय आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, या घटनेतील आरोपी अनुसूचित जातीचा आहे. वास्तविक पाहता अनुसूचित जमातीच्या लोकांवरील अन्याय अत्याचार थांबविण्यासाठी राज्यस्तरीय समिती कार्यरत आहेत. त्या समितीचे अध्यक्ष कोण आहेत, त्या समितीच्या बैठका झाल्या आहेत काय ? सातारा, कराड, भंडारा, अहमदनगर या ठिकाणी दलितांवर अत्याचार होत आहेत. विधानसभा सभागृहात माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी भंडारा प्रकरणाची सी.बी.आय. मार्फत चौकशी करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या भीषण प्रकरणाची सुध्दा सीबीआय मार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात दुरुस्ती करताना मी सांगितले की, या प्रकरणी दोषारोप पत्र सादर केले आहे. तसेच यातील आरोपींना अटक केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास सीबीआय कडून करण्याची गरज नाही. दुसरी घटना अत्यंत दुर्दैवी आहे. परंतु या प्रकरणी तपास करुन, आरोपींना अटक करण्यात आली आहे.

श्री.भाई जगताप : महोदय, तीन तरुणांची निर्घृण हत्या करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी ज्यांनी या मुलांना बागेमध्ये काम करण्यास बोलाविले होते त्यांचे नाव विचारले होते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ज्यांनी या तरुणांना काम करण्यासाठी बोलाविले होते त्यांनाच अटक करण्यात आली की, दुसऱ्याच आरोपींना अटक करण्यात आली ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, ज्यांनी या तरुणांना काम करण्यासाठी बोलाविले होते तेच आरोपी आहेत. रमेश दरदल्ले, प्रकाश दरदल्ले, संदीप कुटे, अशोक नावगिरे, पोपट नावगिरे, गणेश दरदल्ले आणि अशोक अशी अरोपींची नावे आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, अंगावर शहारे आणणारी ही घटना आहे. दलित समाजातील तीन भावांना काम करण्यासाठी बोलावून त्यांचे तुकडे तुकडे करुन त्यांची हत्या करण्यात आली आहे. अतिशय भीषण अशी ही घटना आहे. राज्य सरकार या घटनेकडे किती गांभीर्याने पाहत आहे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. अशा प्रकारची एकच घटना घडली अशातला भाग नाही. अशा प्रकारच्या घटना वारंवार क्रमवारीने घडत आहेत. भंडारा येथे सुध्दा अशीच घटना घडली. भंडाऱ्याच्या प्रकरणी राज्य सरकारने आपल्यावरील जबाबदारी सीबीआयवर टाकली आहे. याचाच अर्थ राज्याचे पोलीस आरोपींना पकडू शकत नाही. गुन्हेगारांना पोलीस विभाग शोधू शकत नाही. त्यामुळेच आपण सीबीआयकडे ही जबाबदारी सोपविली आहे. महोदय, ही गंभीर घटना आहे. अशा घटना वारंवार घडत आहेत. इंदापूर येथे दलित कार्यकर्त्याच्या डोक्यावर पिस्तूल ठेवून त्याला ठार मारले. परंतु या घटनांवर राज्य सरकार गंभीरपणे उपाययोजना करीत नाही असा माझा आरोप आहे. माननीय गृह मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत. आज राज्यात दलितांच्या जीविताचे रक्षण केले जात नाही. त्यांच्या आया-बहिणीच्या अब्रूचे रक्षण केले जात नाही. दिल्लीत सामूहिक बलात्काराची घटना घडल्यानंतर कायद्यात बदल करुन, सबंध देशात नवीन कायदा लागू केला. राज्यात दलितांवर अन्याय/अत्याचाराच्या घटना घडत आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या प्रकरणी गांभीर्याने विचार करुन या घटनेतील आरोपींवर मोक्का लावणार काय ?

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, असणाऱ्या कायद्याच्या अंतर्गत ॲट्रॉसिटीखाली ज्या तरतुदी आहेत त्या या बाबतीत सक्षम आहेत आणि त्याप्रमाणे कारवाई करीत असतो. भंडारा येथील प्रकरणामध्ये देखील सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सीबीआयकडे तपास सोपविण्याची जबाबदारी घेतली.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. त्यांना मोक्का लावला पाहिजे. 5-10 लोकांना दोन दोन वर्षासाठी आत पाठविले तर अत्याचाराच्या घटना कमी होतील. जर शासनाला खऱ्या अर्थाने दलितांच्या जीविताचे आणि अब्रूचे रक्षण करावयाचे असेल तर मोक्का लावण्यात येईल असे जाहीर करावे नाही तर आपण दलितांची फसवणूक करीत आहात. राज्यामध्ये रोज अनेक घटना घडत आहेत. आपला ॲट्रॉसिटी ॲक्ट कमजोर पडत आहे. ज्यांना ॲट्रॉसिटी ॲक्ट लावला त्यांचा दुसऱ्या दिवशी जामीन होतो. त्यांना मोक्का लावणार का ?

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मोक्का लावण्याच्या संदर्भात सातत्याने मागणी होते.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, असणाऱ्या कायद्याच्या तरतुदीनुसार ॲट्रॉसिटी ॲक्टप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येते. ज्यावेळी एखादा संघटित विषय असतो त्यावेळी मोक्का लावण्याची तरतूद आहे. चेन स्नॅचिंगच्या विषयामध्ये जर संघटित गुन्हेगारी पुढे आली तर त्यांना मोक्का लावला जातो. मोक्का लावण्याच्या बाबतीत शासन हात मागे घेत आहे आणि दलितांवरील अत्याचार खपवून घेत आहे असे अजिबात नाही.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी संघटित गुन्हेगारी असेल तर मोक्का लावण्यात येतो असे सांगितले. मागे ट्रेनमध्ये सवर्ण महिलेवर एका अधिकाऱ्याकडून बलात्कार झाला तेव्हा त्याने एकट्याने बलात्कार केला होता पण त्याला दुसऱ्या दिवशी मोक्का लावला. एका घटनेचे गांभीर्य वेगळे आणि दलिताच्या संदर्भातील घटनेचे गांभीर्य वेगळे असेल तर तसे सांगावे. तेथे संघटित गुन्हेगारी झाली नव्हती. त्या ठिकाणी एकानेच बलात्कार केला होता.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, किती लोकांनी आणि कोणत्या जातीच्या, कोणत्या धर्माच्या लोकांनी बलात्कार केला एवढ्यापुरता प्रश्न मर्यादित असता तर गोष्ट वेगळी होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

यामध्ये आंतरजातीय विवाहाची शक्यता असल्यामुळे हे हत्याकांड घडले आहे का ? आम्ही विरोधी पक्षात आहोत. पोलिसांच्या 100 चुका दिसतात. परंतु या घटनेमध्ये आमच्या माहितीप्रमाणे ताबडतोब अहमदनगरच्या पोलिसांनी त्या कुटुंबावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केलेला आहे. जे आरोपी आहेत त्यांना कडक शिक्षा झालीच पाहिजे परंतु खरा मुद्दा असा आहे की, ही जी संबंधित मुलगी आहे तिचे कोठेही वाभाडे न निघता तिचे या विषयाबद्दल काय म्हणणे आहे ते पोलिसांनी नोंदविले आहे का ? नसेल तर तिचे काय म्हणणे आहे ते जर इन-कॅमेरा नोंदविले तर संपूर्ण घटनेचा उलगडा होऊ शकेल. त्या बाबतीत शासनाने काय पावले उचलली आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या सर्व घटनेच्या पार्श्वभूमीवर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती निश्चितपणे समोर आलेली आहे. परंतु त्या मुलीला पुढच्या काळामध्ये काही गोष्टींचा त्रास होऊ नये म्हणून काही गोष्टी इन-कॅमेरा करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे पावले उचलली जातील.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख केलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. दीड महिन्यापूर्वी अशाच प्रकारे एका दलित महिलेचा मुलगा स्टेशनवर फळ विक्रीचा व्यवसाय करीत असताना, वडील घरी जेवायला आले असताना, दोन हप्तेखोर तिच्या घरी जाऊन मोटार बाईकवर तिला घेऊन गेले आणि त्या दलित महिलेवर अत्यंत वाईट प्रकारचे अत्याचार केलेले आहेत. त्यानंतर आता ही घटना घडलेली आहे. फक्त त्या गुन्हेगारांना अटक करण्यापुरतेच काम आपल्याला करता येणार नाही असे मला वाटते. दलित महिलेवर अत्याचार करावयाचे, कामगारांना अशा प्रकारे ठार मारावयाचे अशा प्रकारची मानसिकता झालेली आहे. त्या ठिकाणी श्रीमती सुनिता साळुंखे-ठाकरे नावाच्या अधीक्षिका आहेत त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे तपास करुन त्या गुन्हेगारांना आणि या गुन्हेगारांना सुध्दा पकडले आहे. श्रीरामपूरमध्ये दलित समाजाला लक्ष्य करावयाचे, त्यांना मारावयाचे अशा घटना वारंवार घडत आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

पुरोगामी महाराष्ट्राला या घटना शोभणाऱ्या नाहीत. त्यामुळे गृह विभागाने या घटनांच्या मुळाशी जाऊन, संशोधन करुन असे का होत आहे त्याचा शोध घ्यावा. या घटनांना जबाबदार असणाऱ्यांना अटक केली जाणार आहे का ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : श्रीरामपूरच्या घटनेतील गुन्हेगारांना अटक केलेली आहे. भविष्यामध्ये अशा घटना घडू नयेत म्हणून सामाजिक न्याय विभाग, महिला व बालविकास विभागामार्फत एक संयुक्त मोहिम राबविण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : दिल्लीमध्ये सामूहिक बलात्काराची घटना घडल्यानंतर केंद्र सरकारने न्या.वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने घेतलेला निर्णय केंद्र सरकारने राज्य सरकारला कळविला आहे काय ? तसेच या राज्यामध्ये एक वर्षभरामध्ये बलात्कार किंवा अत्याचार झाले त्यापैकी दलित महिलांवरील अत्याचाराची किती प्रकरणे आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सन्माननीय सदस्यांनी जस्टीस वर्मा यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा उल्लेख केलेला आहे. त्या समितीच्या निर्णयांची राज्यात अंमलबजावणी केली जात आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मेहतर समाजातील दोन युवकांची निर्घृणपणे हत्या करुन त्यांचे शव रस्त्यात टाकण्याचे प्रकरण दोन महिन्यांपूर्वी उघडकीस आले होते. ठाणे शहरामध्ये 3.5 वर्षाच्या मुलीवर पाशवी बलात्कार झाल्याची माहिती मी सभागृहाला दिली होती. त्यामुळे असे गुन्हे करणाऱ्यांवर कडक शिक्षा करण्याची वेळ आलेली आहे, शासन अशा गुन्ह्यांबाबत कडक कायदा करणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : नवीन कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद वाढविण्यात आलेली आहे. त्या तरतुदी अंतर्गतच आता गुन्हे दाखल केले जात आहेत.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, श्रीरामपूर तालुक्यातील सोनईजवळ घडलेली घटना खैरलांजीच्या प्रकरणानंतर घडलेली गंभीर घटना आहे. एकाच कुटुंबातील सभासदांनी पूर्व नियोजित कट करुन 3 तरुणांना घरी बोलावून भीषण स्वरुपाचा खून केलेला आहे. ते निष्पन्न

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

ॲड.जयदेव गायकवाड....

झाल्यावरही या प्रकरणात आरोपींना अटक झाली असली तरी मला एक शंका येते. क्रूर गुन्हा घडलेला असताना एफआयआरमध्ये त्याची व्यवस्थित नोंद केली नाही तर आपण येथे कितीही आक्रोश केला व या गुन्ह्यात अधिकाधिक कलमे लावली पाहिजेत असे म्हटले तरी या केसमध्ये कलम 302 चा गुन्हा नोंदवित असताना त्यासाठी आवश्यक असलेले इन्डिग्रेंडस त्या एफआयआरमध्ये आले नाहीत व तपास झाला नाही तर आरोपी सुटण्याची शक्यता असते. शासनाने या गोष्टीची दखल घेतली आहे की नाही ? हा गुन्हा घडल्याचे निष्पन्न झाल्यामुळे शासन त्या दृष्टीकोनातून विचार करणार आहे काय ? या सभागृहात नेहमी फास्ट ट्रॅक कोर्टबद्दल बोलले जाते. सन्माननीय सदस्य बोलल्यावर शासनाकडून उत्तरही दिले जाते. पण कालांतराने गुन्ह्याची तीव्रता कमी झाल्यामुळे आरोपी सुटतात. त्यामुळे अशा गुन्ह्यांची सुनावणी व कारवाई फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये केली जाईल काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : या घटनेचे गांभीर्य ओळखून शासनाने सीआयडीकडे तपास दिला होता. त्या आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. तसेच या केससाठी स्पेशल प्रॉसिक्युटरची नेमणूक करुन या गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी शासनाकडून पावले उचलले जातील.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, या राज्यात सातत्याने बलात्काराची प्रकरणे घडत आहेत. परंतु गुन्हेगार दोन महिन्यानंतर जामिनावर सुटतात. गुन्हेगार राज्यातील असतील तर राज्यात राहतात व बाहेरच्या राज्यातील असतील तर ते त्यांच्या राज्यात जातात. त्यामुळे अशा गुन्हेगारांचा ट्रॅक रेकॉर्ड डिस्प्लेमध्ये ठेवला जातो काय ? जेणे करुन या पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुन्हा घडलेला आहे. त्यामुळे शासनामार्फत अशा गुन्हेगारांचे फोटो संबंधित पोलीस स्टेशनमध्ये लावले जातील काय ?

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. नरेंद्र पाटील....

अशा प्रकारे सामुदायिक बलात्कार आणि गुन्हेगारी करणा-यावर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : गुन्हेगारांचे फोटो वितरित करण्यात येत असतात. त्यांची माहिती सर्व ठिकाणी देण्यात येत असते.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर करावयाची कारवाई

मु. शी. : मुंबईतील अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर करावयाची कारवाई यासंबंधी श्री. प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री किरण पावसकर, नरेंद्र पाटील व निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईमध्ये तब्बल ५४०० मोबाईल टॉवर असून त्यापैकी ३३७० टॉवरना पालिकेची परवानगी असणे, या टॉवरमधून होणाऱ्या किरणोत्सर्गामुळे मानवी आरोग्यास तसेच पशुपक्षांवर विपरीत परिणाम होणे, यासाठी पालिकेने काही धोरणे आखलेली असणे, तथापि सदर धोरणाची अंमलबजावणी मोबाईल टॉवर कंपन्यांकडून न करता मोठ्या प्रमाणात मानवी आरोग्यावर तसेच पशुपक्ष्यांवर विपरीत परिणाम होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने केलेली व करण्यांत येत असलेली कार्यवाही व उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे :. 2010मध्ये मा. उच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली होती आणि त्याबाबतीत स्थगिती दिलेली आहे असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. अशा किती टॉवर्सवर कारवाई न करण्यासंबंधी स्थगिती दिलेली आहे ? निवेदनामध्ये असेही म्हटलेले आहे की, याचिका क्रमांक 843 सन 2012 मध्ये कायद्यातील तरतुदींचा पाठपुरावा करुन पुढील कारवाई करावी असे आदेश पारित केलेले आहेत. कायद्यातील तरतुदींचा पाठपुरावा करुन अन्य टॉवर्सवर तातडीने कारवाई करण्यात येणार आहे काय ? मोबाईल टॉवरमधून निघणा-या किरणोत्सर्गाची मोजदाद करणारी यंत्रणा राज्य सरकारकडे आहे काय ? याबाबतीत टीईआरएम सेलकडे तक्रार करता येते असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. परंतु या किरणोत्सर्गापासून सामान्य माणसाला किती प्रमाणात त्रास होत आहे हे समजण्यासाठी काही यंत्रणा उभारण्यात येणार आहे काय ? मोबाईल टॉवर्स उभारण्यासंबंधीच्या गाईड लाईन्स केव्हा पर्यंत तयार करण्यात येणार आहेत ? हे मोबाईल टॉवर्स जर अनधिकृत होते तर मग त्यांना कशा प्रकारे वीज जोडणी दिली गेली याची चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : मुंबई महानगरपालिकेमध्ये जे मोबाईल टॉवर्स उभे राहिलेले आहेत त्यासंदर्भात ही लक्षवेधी विचारण्यात आलेली आहे. या संदर्भात 2010मध्ये केलेल्या सर्व्हेच्या आधारे आतापर्यंत 3705 मोबाईल टॉवर्स उभे असून त्यापैकी 1830 मोबाईल टॉवर्स अनधिकृत आहेत. हे मोबाईल टॉवर्स उभारण्यासाठी डिपार्टमेण्ट ऑफ टेलिकॉम आणि एमआरटीपी कायद्याअंतर्गत ज्या स्थानिक प्राधिकारणामध्ये या मोबाईल टॉवरची उभारणी केली जाते त्या प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागते. ज्या कंपन्यांचे टॉवर्स उभे राहिलेले आहेत त्या कंपन्यांनी डिपार्टमेण्ट ऑफ टेलिकॉमची परवानगी घेतलेली आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेची परवानगी घेतली नाही. म्हणून मुंबई महानगरपालिकेने या टॉवर्सवर कारवाई करण्याची मोहीम सुरु केली. ही मोहीम सुरु केल्यानंतर ही मंडळी कोर्टात गेली. कोर्टाने या बाबतीत स्टे दिला. 843 क्रमांकाच्या याचिकेच्या संदर्भात एक व्यक्ती कोर्टामध्ये गेल्यानंतर कायदा तपासून या बाबतीत कारवाई करावी असे उच्च न्यायालयाने सांगितले.

मुंबई महानगरपालिकेने टॉवर्सच्या संदर्भात पॉलिसी केलेली नाही. केन्द्र शासनाने त्या संदर्भात पॉलिसी केलेली आहे. रेडिएशनचा त्रास लोकांना होतो किंवा नाही या

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदर्भात सर्वेक्षण केल्यानंतर केन्द्र सरकारने पुन्हा आपल्या पॉलिसीमध्ये बदल केला. जर दोन टॉवर्स असतील तर त्यामध्ये किती अंतर असावे, चार टॉवर्स असतील तर किती अंतर असावे, याप्रमाणे सहा टावर्स, दहा टॉवर्स असतील तर त्यामध्ये किती अंतर असावे यासंबंधीच्या गाईड लाईन्स ठरवून दिलेल्या आहेत. हा प्रश्न सभागृहामध्ये अनेक वेळा उपस्थित करण्यात आलेला होता म्हणून मी विस्ताराने उत्तर देत आहे. केन्द्र सरकारने ठरवून दिलेल्या गाईड लाईन्सचा आधार मुंबई महानगरपालिकेला घ्यावा लागेल.

...नंतर श्री. गिते

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

तशाच पध्दतीने राज्याची देखील स्वतंत्र पॉलिसी असली पाहिजे. राज्याकरिता स्वतंत्र पॉलिसी तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेने या संदर्भात स्वत:ची पॉलिसी प्रसिध्द केलेली आहे, त्या पॉलिसीच्या अनुषंगाने हरकती व सूचना मागविलेल्या आहेत.

महोदय, केंद्र सरकारने बेसीक पॉलिसी तयार केलेली आहे, तिला कोठेही धक्का न लागता प्रत्येक शहराची वेगवेगळी रिक्वायरमेंट घेऊन राज्य शासन आणि तेथील स्थानिक प्राधिकरणाची पॉलिसी आल्यानंतर यासंदर्भात कार्यवाही करण्याकरिता पुढील निर्णय घेणे सहज शक्य होईल. मी मघाशी सांगितले की, यामध्ये डिपार्टमेंट ऑफ टेलिकॉम आणि मुंबई महानगरपालिका यांची एनओसी घ्यावी लागते. स्वाभाविक आहे की, अनधिकृत म्हटल्यानंतर सगळयांकडून चुका झालेल्या आहेत हे नाकारण्याचे कारण नाही. म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यास महानगरपालिकेने सुरुवात केल्यानंतर अशा प्रकारच्या अडचणी समोर येऊ लागल्या. एका रात्रीत सर्व टॉवर्स उभे राहिले आहेत असा माझा दावा नाही. महानगपालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे ही बाब देखील आमच्या निदर्शनास आली आहे. ठीक आहे. यासंदर्भात कारवाईचा भाग आहेच. परंतु झालेल्या चुका दुरुस्त केल्या पाहिजेत. या गोष्टीस निश्चितपणे कायद्याचे स्वरुप आणले पाहिजे. कायद्याचे स्वरुप आणण्याचे काम शासनाला प्रथम करावे लागणार आहे. मोबाईल टॉवर्सना वीज जोडणी कशी काय दिली गेली, टॉवर्सची उभारणी कशी काय झाली या गोष्टी तपासून पहाव्या लागतील. मुंबई शहरामध्ये 1800 मोबाईल टॉवर्स आहेत, परंतु प्रत्यक्षात 1830 मोबाईल टॉवर्स अनधिकृत आहेत.

महोदय, मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता अनधिकृत टॉवर्स उभे केले गेले आहेत. सदर मोबाईल टॉवर्सची कामे डोळेझाक करुन झालेली नाहीत या गोष्टीची शासनाला पूर्ण कल्पना आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे वीज जोडण्या चुकीच्या पध्दतीने झालेल्या आहेत. या गोष्टीकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. या संदर्भात नवीन पॉलिसी अस्तित्वात आल्यानंतर त्या संबंधित अधिकाऱ्यांना देखील जबाबदार धरण्यात येईल. रेडीएशन मोजण्याच्या संदर्भात देखील मी मघाशी माहिती दिली आहे. जर दोन मोबाईल टॉवर उभे करावयाचे असतील, तसेच ॲन्टीना लावावयाचे असतात, त्या दोघामध्ये 35 मीटरपेक्षा जास्त अंतर असता कामा नये. जर चार टॉवर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

उभे करावयाचे असतील तर 45 मीटरपेक्षा जास्त अंतर असले पाहिजे. सहा टॉवर उभे करावयाचे असतील तर त्यासाठी 55 मीटरपेक्षा जास्त अंतर असले पाहिजे. त्या ठिकाणी 5 मीटर पेक्षा कमी अंतर आहे, त्या ठिकाणी टॉवर उभारणी करण्यासाठी मंजुरी देऊ नये अशा प्रकारची नियमात तरतूद आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, इमारतींवर मोबाईल टॉवर उभारण्याची संख्या अधिकृत पेक्षा अनधिकृत संख्या मोठी आहे असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात स्पष्ट केले. यामध्ये एक महत्वाचा भाग असा आहे की, बरेचसे मोबाईल टॉवर्स सार्वजनिक इमारतींवर उभारले जातात. ज्या इमारती सार्वजनिक कामासाठी वापरल्या जातात त्या इमारतींना आपण सार्वजनिक इमारती असे म्हणतो. आपल्याला यात निश्चितपणे एक गोष्ट जाणवते की, या मोबाईल कंपन्या रितसर या इमारतींच्या मालकांशी करार करतात. तो करार तीन अथवा पाच वर्षाचा असतो. त्या मोबाईल टॉवर्सच्या माध्यमातून इमारतींच्या मालकांना भाडे स्वरुपात उत्पन्न मिळते. सार्वजनिक वापराच्या ज्या इमारती आहेत, त्या इमारतीतील गृहनिर्माण संस्था चालविण्यासाठी कोठले तरी उत्पन्नाचे स्त्रोत शोधत असतात. मुंबई सर्वात मोठा पैशांचा स्त्रोत म्हणून मोबाईल टॉवरकडे बघितले जाते. मला सभागृहात सांगण्यास हरकत नाही. अखिल भारतीय नाटय परिषदेच्या नाट्य संकुलावर चार मोबाईल कंपन्यांचे टॉवर्स उभारण्यात आले आहेत. ते टॉवर्स एकाच इमारतीवर उभारले गेले आहेत. या सर्व व्यवहारांना कोणत्या ना कोणत्या यंत्रणेकडून किंवा अधिकाऱ्यांकडून संरक्षण मिळणार असेल, अशा गोष्टींवर बंदी घातली गेली नाही अथवा त्यावर नियंत्रण आणले गेले नाही तर यापासून मानवी आरोग्यास होणारे धोके पुढच्या काळात वाढत जाणार आहेत. डेन्स पाप्युलेशन असलेल्या सर्व भागांमध्ये अतिशय जवळ जवळ मोबाईल टॉवर्स दिसून येतात. ज्यांच्या इमारतींवर मोबाईल टॉवर्स लावले आहेत, त्या इमारतींच्या मालकांशी बैठक घेण्यात येऊन या संदर्भात पुढची पाऊले कशा दृष्टीने टाकली जाणार आहे याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, काल, परवापर्यंत असा कायदा होता की, शहरामध्ये अनधिकृत बांधकामे झाली व त्या अनधिकृत बांधकामाबाबत तक्रारी आल्यानंतर ती बांधकामे तोडण्यासाठी संबंधित प्राधिकरणाचे अधिकारी, शासनाचे अधिकारी जातात.

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1..... श्री.भास्कर जाधव.....

तेथे गेल्यानंतर स्वाभाविक आहे की, त्या भागातील लोकप्रतिनिधी जो असतो, त्याच्याकडे लोक जातात, आम्ही 25-30 वर्षापासून या भागात रहात आहोत, आज आम्हाला घराबाहेर काढले जात आहे असे गाऱ्हाणे मांडतात. त्यांना मदत कशी होऊ शकते या दृष्टीकोनातून लोकप्रतिनिधी भूमिका घेतात. 25-30 वर्षापासून ते या भागात रहात असताना आज त्यांना घराबाहेर का काढता? अशी भूमिका लोकप्रतिनिधींनी घेतल्यानंतर महापालिकेचे अधिकारी शासकीय कामात अडथळा आणला म्हणून कलम 353 खाली गुन्हा दाखल करायचे. गुन्हा दाखल केल्यानंतर महापालिका असेल तर आयुक्त, नगरपालिका असेल तर मुख्याधिकारी किंवा जिल्हा प्रशासन असेल तर जिल्हाधिकारी यांच्यापुढे त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा विषय जायचा.

हे टॉवर एका रात्रीत उभारले जात नव्हते. अधिकाऱ्यांना याची माहिती नव्हती असा भाग नव्हता. अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जात नव्हती. आपल्या सरकारने दोन्ही सभागृहात एक कायदा पारित केला आहे, त्याची अंमलबजावणी आता सुरु झालेली आहे. एखाद्या भागामध्ये अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम सुरु असेल आणि ते बांधकाम लक्षात आणून दिल्यानंतर कारवाई केली नाही तर संबंधित भागाचे वॉर्ड ऑफिसर किंवा तेथील पोलीस निरीक्षक यांना जबाबदार धरले जाईल. त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल केली जाईल आणि 5 वर्षापर्यंत त्यांना कारावासाची शिक्षा सुनावली जाईल अशी तरतूद आहे. यापुढील काळात अशा प्रकारे अनधिकृतपणे टॉवर उभे राहिले तर त्याबाबत सुध्दा हा नियम लागू होईल.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, मुंबई शहरात 1830 मोबाईल टॉवर अनधिकृतपणे उभारलेले आहेत. हा विषय न्यायप्रविष्ठ असला तरी हे मोबाईल टॉवर अनधिकृत असल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडित करणार आहात काय?

दिनांक 1 सप्टेंबर, 2012 पासून केंद्र शासनाच्या दूरसंचार विभागाने मोबाईल टॉवरसंबंधीचे नियम अधिक कठोर केले आहेत. मात्र 20 मार्च, 2013 रोजी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये हा विषय उपस्थित करण्यात आला होता. अशी नियमावली तयार झाल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांना नाही हे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उघड झाले आहे. अशी नियमावली असल्यास मला आणून द्या असे विधान एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केले. यावरुन प्रशासन किती गंभीर आहे हे दिसून येते. या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : या अनधिकृत टॉवरचा वीज पुरवठा खंडित करणार का असा प्रश्न माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. आज न्यायालयाच्या आदेशामुळे कोणतीही निष्कासनाची कारवाई करता येत नाही. परंतु वीज पुरवठा खंडित करण्याबाबत कोणती बाधा येते का हे तपासावे लागेल. त्याची माहिती घेण्यात येईल. केवळ निष्कासनाकरिता स्थगिती असेल आणि इतर बाबतीत स्थगिती नसेल, तसे इंटरप्रिटेशन दिलेल्या ऑर्डरवरुन करता आले तर त्याचा विचार करता येईल. अशा प्रकारची पॉलिसी तयार झाल्याची माहिती नाही. केंद्र शासनाचे धोरण संपूर्ण देशासाठी तयार झालेले आहे. राज्याची पॉलिसी संपूर्ण राज्याकरिता तयार होते. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे त्या त्या स्थानिक प्राधिकरणाची वेगळी पॉलिसी करता येईल. त्यामुळे तेथील अधिकाऱ्यांना कदाचित त्याची माहिती नसावी असा माझा समज आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनातील शेवटच्या परिच्छेदाकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. राज्यातील मोबाईल टॉवरसाठी शासनाच्या पर्यावरण विभागाकडून दिनांक 20 मार्च, 2010 रोजी शासन निर्णय निर्गमित झाला आहे. त्या निर्णयानुसार अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. हा प्रश्न अनेकदा या सभागृहात उपस्थित झालेला आहे. मी स्वत: एक तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मोबाईल टॉवरच्या माध्यमातून होणाऱ्या उत्सर्जनामुळे कॅन्सरसारखे गंभीर आजार होतात यावर शिक्कामोर्तब केले आहे का? नसेल तर मी पार्ल्यातील एक उदाहरण देऊ इच्छितो. पार्ल्यामध्ये एक सुप्रसिध्द गायिका राहतात. त्यांच्या घरावर मोबाईल टॉवर उभारण्यात आला आहे. त्यांच्या कुटुंबातील तीन महिलांना कॅन्सर झाला आहे. अशा प्रकारच्या घटना सर्वत्र घडत आहेत. राज्य शासन मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहे असा माझा ठाम आरोप आहे. मार्गदर्शक तत्वामध्ये या आजाराबद्दल काय नमूद केले आहे हे सभागृहाला सांगितले जाईल काय?

नंतर 2 टी.1..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी मघाशी विस्ताराने माहिती दिली होती. या विषयाच्या संदर्भात मतमतांतर आहे हे सुध्दा मी सांगितले होते. मोबाईलच्या टॉवरच्या किरणोत्सर्गामुळे कॅन्सर होतो की, नाही हे अद्यापपर्यंत सायन्सने सिध्द केलेले नाही. किरणोत्सर्गामुळेच 100 टक्के कॅन्सर होतो या निर्णयाप्रत सायन्स आलेले नाही. त्यामुळे टॉवरच्या किरणोत्सर्गामुळे कॅन्सर होतोच असे सांगता येत नाही.

सभापती महोदय, खरे म्हणजे हा तेथील स्थानिक प्राधिकरणाचा प्रश्न असल्यामुळे त्यावर शासन काय लक्ष ठेवणार आहे ? 3705 टॉवरपैकी 1830 लोकांनी सोडून बाकीच्या लोकांनी बीएमसीची परवानगी घेतली तर उर्वरित लोकांनी बीएमसीची परवानगी न घेता त्या भागामध्ये टॉवर उभारले आहेत. त्यामुळे ही बाब बीएमसीच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात यावयास नको का ? आज आपण या ठिकाणी लोक प्रतिनिधी म्हणून या विषयावर बोलत आहोत परंतु त्या भागातील महानगर पालिकेच्या लोक प्रतिनिधींनी एकत्र येऊन निर्णय घ्यावयास पाहिजे होता. यामध्ये चूक झालेली ही वस्तुस्थिती आहे. यावर काय उपाययोजना करावयाची याबाबत आपण येथे चर्चा करीत आहोत.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सविस्तर चर्चा दि.26.7.2010 रोजी झाली होती. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, किरणोत्सर्गामुळे शहरातील लोकांवर विपरीत परिणाम होत आहे. इलेक्ट्रो मॅग्नेटिक रेडिएशनच्या संदर्भात रिपोर्ट आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सभागृहात जी चर्चा झाली होती त्यावेळी सांगण्यात आले होते की, कोजेट कंपनीने यासंदर्भात सर्व्हे करुन रेडिएशनने कॅन्सर होतो हे सिध्दही केलेले आहे. मोबाईल टॉवर उभारण्याकरिता युएसएने नियमावली तयार केली असून आपल्या राज्यात याबाबतचा कायदा अस्तित्वात नसल्यामुळे मोबाईल कंपन्या दोन लाख रुपये देऊन सोसायटीवर टॉवर उभारण्याचे काम करीत असतात. मुंबईमध्ये मोबाईल टॉवरला रिलायन्स आणि बेस्टकडून वीज पुरवठा केला जात असतो. ज्या लोकांना कॅन्सर झालेला आहे तो कॅन्सर किरणोत्सर्गामुळे झाला आहे याबाबतची माहिती आम्ही टीव्हीवर बघितलेली आहे. यासंदर्भात केंद्र सरकारची नियमावली, राज्य सरकारची नियमावली, कंपन्याच्या नियमावली व महानगर पालिकेची नियमावली अशा वेगवेगळया नियमावली लावून तुम्ही जनतेच्या आरोग्याशी का खेळत आहात ? या टॉवरला जर बेस्ट आणि रिलायन्स कंपनी विद्युत पुरवठा करीत असेल तर तो विद्युत पुरवठा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

थांबविण्याचे काम शासनाचे आहे.

आपण सभागृहात सांगत आहात की, 1800 च्या वर अनाधिकृत टॉवरवाले आहेत. हे लोक कोर्टामध्ये गेल्यामुळे स्टे द्यायचा हा काय प्रकार आहे ? किरणोत्सर्गामुळे कॅन्सर झाल्यानंतर प्रत्येक व्यक्तीने कोर्टात जाऊन स्टे घेऊन यायचा का ? आपण या ठिकाणी नियमांमध्ये बदल करण्यासाठी बसलो आहेत. आतापर्यंत इलेक्ट्रो मॅग्नेटीक रेडिएशनमुळे कॅन्सर होतो हे जगात सिध्द झालेले आहे. रेडिएशन किती मीटर पर्यंत असावे हे सिध्द झालेले आहे. मागच्या वेळेस मंत्री महोदयांनी सभागृहात उत्तर देतांना सांगितले होते की, इमारतीच्या 70 टक्के लोकांनी मान्यता दिली तरच त्या इमारतीवर टॉवर लावले जातील. आपण एका इमारतीवर टॉवर लावाल परंतु त्याचा बाजूच्या इमारतीमधील लोकांना त्यामुळे कॅन्सर होत असेल तर त्याचे काय ? आपल्याला उत्पन्न मिळावे यासाठी इमारतीवर टॉवर लावले जातात परंतु त्याच इमारतीच्या टॉवरमुळे शेजारच्या इमारतीमधील लोकांना कॅन्सर होत असेल तर त्याचे काय ? ही सर्व माहिती असतांना आपण कारवाई करण्यासाठी दिरंगाई करीत आहात. या विषयाच्या संदर्भात मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, या विषयावर आपण सन 2010,,2011,2012 व आता 2013 मध्ये चर्चा करीत आहोत. महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी टॉवर लावले असेल तर त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ? राज्य सरकारचे अधिकारी ॲक्शन घेणार नसतील तर आपण राज्य शासनाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार काय ? मोबाईल टॉवरचा विद्युत पुरवठा तातडीने बंद केला जाणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या विषया संबंधी मी अतिशय विस्ताराने उत्तर दिले आहे. मी सभागृहाचे पूर्णपणे समाधान केलेले आहे, हे मला आपल्या चेहऱ्यावरून दिसत होते. एवढे स्पष्ट उत्तर मी येथे दिलेले आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आपल्यावर 100 टक्के अधिकार हा सन्माननीय सदस्यांचा आहे. कारण आपण आमचे आहात. सरकारचे नाहीत. माझ्या बोलण्यावरून माननीय सभापती खुश झालेले आहेत अशा प्रकारचे माननीय मंत्री महोदयांचे जे वाक्य आहे ते आपण कामकाजातून काढून टाकावे.

तालिका सभापती : ठीक आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच रेडिएशन फ्रिक्वेन्सी सांगितली आहे. दोन इमारतीमध्ये पाच मीटरपेक्षा कमी जागा असेल तर त्यास परवानगी द्यायची नाही अशा प्रकारचा निर्णय मी सांगितलेला आहे. मी रेडिएशनची फ्रिक्वेन्सी सांगितली आहे. दोन टॉवरमध्ये 35 मीटर पेक्षा कमी अंतर असेल तर ते देखील घातक आहे. 4 टॉवरमध्ये 45 मीटर पेक्षा कमी अंतर असेल तर ते घातक आहे. 6 टॉवरमध्ये 55 मीटर पेक्षा कमी अंतर असेल तर ते घातक आहे. केंद्र शासनाने केलेल्या स्टडी रिपोर्टच्या आधारे गाईड लाईन्स आखून दिलेल्या आहेत. त्या मी सर्वांना समजावून सांगितल्या आहेत. त्यामुळे 5 मीटरच्या आतील टॉवरना परवानगी द्यायची नाही हा प्रश्न निकालात निघालेला आहे. येथे अमेरिकेच्या रिपोर्टचा उल्लेख करण्यात आला आहे. एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, राज्य व केंद्र शासनाची पॉलिसी वेगवेगळी आहे. तसेच स्थानिक प्राधिकारी संस्थेची पॉलिसी वेगळी आहे. तेव्हा मी म्हटले की, केंद्र सरकारने केलेली पॉलिसी आधारभूत धरून आपल्याला शहरासाठी आणि ग्रामीण भागासाठी वेगळी पॉलिसी ठरवावी लागेल. मुंबई येथे डेव्हलपमेंट चार्जेस आकारताना छोट्या महानगरपालिकेमध्ये देखील तोच चार्ज आकारणार आहात काय, हा देखील एक मुद्दा आहे. तेथे तसा चार्ज आकारला जाणार नाही हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तेथे आपल्याला आताच सांगितलेले बेसिक अंतर हे ठेवावेच लागणार आहे. याशिवाय आपल्याला तेथील स्ट्रक्चरल ऑडिट करावे लागेल. तेव्हा यात जे काही मायनर चेंजेस आहेत ते करावे लागतील. त्यामुळे केंद्र शासनाने ठरवून दिलेली पॉलिसी हा बेस पकडलाच जाईल. राज्य शासन शहर आणि ग्रामीण यामध्ये थोडासा फरक निश्चितपणे ठेवणार आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

येथे सन्माननीय सदस्यांनी वीज कनेक्शन संबंधी प्रश्न विचारला आहे. या टॉवरना देण्यात येणारे वीज कनेक्शन काढता येईल काय, असा त्यांचा मुख्य प्रश्न होता. आम्ही ग्रामीण भागामध्ये काम केलेली माणसे आहोत. ग्रामीण भागामध्ये एखाद्या ग्रामपंचायतीची एनओसी नसते तो पर्यंत त्याला वीज कनेक्शन दिले जात नाही. त्याच पद्धतीने स्थानिक प्राधिकारी संस्थेची एनओसी नसेल तर त्यांनी तो पर्यंत वीज कनेक्शन देऊ नये, अशा प्रकारच्या सक्त सूचना देण्यात येतील.

मी मघाशी म्हणालो त्याप्रमाणे कोर्टाच्या निर्णयाचे इंटरप्रिटीशन केले जाईल. ते समजून घेतले जाईल. हायकोर्टाचा निर्णय लागण्यापूर्वी वीज कनेक्शन तोडता येत असतील तर त्याप्रमाणे कारवाई केली जाईल. येथे सत्ताधारी पक्षासह विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य डॉ.दीपकराव जाधव यांनी मागणी केली की, विभागातील जे कोणी अधिकारी आहेत, त्यांना दोषी धरून कारवाई करावी. तेव्हा सन्माननीय सदस्यांचा आग्रह आणि जनहित लक्षात घेऊन जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरूद्ध आयुक्तांना चौकशी करून नियमाप्रमाणे कारवाई करण्यासंबंधीच्या सूचना देण्यात येतील.

यानंतर श्री.अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मी मुंबई महानगरपालिकेमध्ये नगरसेविका असताना सुध्दा आम्हाला तेथे अशाप्रकारची उत्तरे मिळाली होती. निवेदनात नमूद केलेले आहे की, ऑक्टोबर 2011 पर्यंत अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कारवाई न करण्या बाबतचे माननीय उच्च न्यायालयाचे मनाई आदेश लागू होते. न्यायालय असे आदेश देणे अशक्य वाटते तेव्हा न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रत माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला उपलब्ध करुन द्यावी. मोबाईल टॉवर्समुळे लोकांच्या जीविताला धोका आहे अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र मुंबई महानगरपालिकेने न्यायालयात सादर केले आहे काय, असल्यास त्याची प्रत आम्हाला देण्यात येईल काय ? मुंबईत होणारी अनधिकृत बांधकामे असतील किंवा मोबाईल टॉवर्स असतील याबाबत अनेक उलटसुलट चर्चा होत असतात. वॉर्डातील जे.ई. 10हजार रुपये घेतो. पोलीस स्टेशनला वेगळे पैसे मिळतात, वॉर्डला वेगळे पैसे मिळतात. आपण लोकांच्या आरोग्याशी खे्ळत आहात. तेव्हा ज्या ठिकाणी अनधिकृत मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले असतील तेथील वॉर्ड ऑफिसरला जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रत वेब साईटवर उपलब्ध आहे. परंतु ती प्रत सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल. मुंबई महानगरपालिकेने मोबाईल टॉवर्समुळे लोकांच्या जीवितास धोका होतो तेव्हा न्यायालयाने लवकर निर्णय घ्यावा अशाप्रकारची विनंती केली आहे किंवा नाही त्याची माहिती देखील त्यांना देण्यात यईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले काही अधिकारी पैसे घेतात. मी मघाशी सांगितले की, वॉर्ड ऑफिसरला जबाबदार धरले जाईल. ही उत्पन्नाची देखील बाब आहे. कारण मोबाईल कंपन्यांकडून सोसायटी किंवा खाजगी मालक पैसे घेतात. परंतु सोसायटीने किंवा खाजगी मालकांनी मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता टॉवर्स उभारले असतील तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझी एक स्पेसिफीक तक्रार आहे. वाळकेश्वर सारख्या भागात सिने अभिनेत्री जुही चावला मोबाईल टॉवर्सच्या विरोधात रस्त्यावर येऊन तिने आंदोलन केल्यानंतर तेथील सर्व टॉवर्स काढून टाकण्यात आले. मुंबईतील लालबाग परिसरामध्ये जेथे लालबागच्या राजाची स्थापना होते त्याच्या बाजूला असलेल्या नारायण उद्योग सोसायटीवर काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

दिवसांमध्ये दहा-बारा मोबाईल टॉवर्स लावण्यात आले. तेथील गोरगरिब लोक काय आंदोलन करणार ? त्या सोसायटीवर उभे करण्यात आलेले टॉवर्स अनधिकृत असतील तर त्या सोसायटीवर आजच्या आज कारवाई करणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ऑक्टोबर 2011 मध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर नारायण उद्योग सोसायटीवर अनधिकृतपणे टॉवर्स उभे राहिले असतील तर त्या विभागातील वॉर्ड ऑफिसर, ती सोसायटी आणि त्या विभागातील पोलीस स्टेशन या तिघांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : खाटीक समाज अनुसूचित जातीच्या लाभापासून वंचित असणे

मु. शी.: खाटीक समाज अनुसूचित जातीच्या लाभापासून वंचित असणे यासंबंधी श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शिक्षण व समाजकल्याण विभाग शासननिर्णय क्र.सी.बी.सी. 1076/43790/5/1977 अन्वये राज्यातील खाटीक जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात येणे, सन 1987 पासून खाटीक समाज राज्यात विखुरलेला असून अनुसूचित जातीच्या लाभापासून व अमंलबजावणीपासून वंचित असणे, खाटीक समाजाला जात पडताळणी दाखले वेळेवर न मिळणे, त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी खाटिक समाज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महापालिका व कृषी उत्पादन बाजार समितीमध्ये बकऱ्यांच्या मंडीसाठी राखीव जागा मिळणे, केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत कत्तलखान्यासाठी शंभर टक्के अनुदान मिळावे, गटई कामगारांच्या स्टॉलप्रमाणे खाटीक समाजाला स्टॉल मिळावेत, जिल्हा, तालुका पातळीवर शेळ्या, मेंढ्या संस्था काढण्यासाठी शासनाकडून निधी मिळावा इत्यादी विविध मागण्यासंदर्भात दिनांक 2 एप्रिल, 2013 रोजी खाटीक समाजातर्फे मोर्चाचे करण्यात आलेले आयोजन, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्यायमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना खाटीक समाजासंबंधी आहे. या समाजातील जवळपास 50 हजार महिला व पुरुष आपल्या मागण्यांसाठी आझाद मैदानावर धरणे धरण्यासाठी आले आहेत. हा समाज आपल्या जिभेचे चोचले पुरवितो. परंतु गेल्या अनेक वर्षापासून हा समाज उपेक्षित आणि वंचित राहिलेला आहे. त्या समाजाच्या संदर्भात काही प्रश्न मांडण्यात आले आणि त्या प्रश्नाच्या संदर्भात सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे त्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. परंतु निवेदनामध्ये एकही कालबध्द कार्यक्रम निश्चित केलेला दिसत नाही. या प्रश्नाचा आणखी दोन-तीन विभागांशी संबध आहे. त्यामध्ये पणन विभाग आणि नगर विकास विभागाचा समावेश आहे. खाटीक समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करावा अशी त्यांची मागणी आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "सदर बाब डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत तपासण्यात येते व त्यांच्याकडून आलेल्या अहवालावरुन शासन संबंधित बाबी संदर्भात निर्णय घेते." महोदय, ही पध्दत आम्हाला सुध्दा माहीत आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या संदर्भातील अहवाल शासनाकडे सादर करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय ? आज राज्यात सबंध जातींचे दाखले मिळण्यात अडचणी येत आहेत. मी विचारु इच्छितो की, खाटीक समाजाला किती दिवसात जातीचे दाखले मिळतील ? राज्यात शेळी-मेंढी विकास महामंडळ स्थापन झाले. परंतु खाटीक समाजाच्या विकासासाठी खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन झाले नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "खाटीक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे." हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असेल तर किती दिवसांत या महामंडळाची स्थापना करण्यात येणार आहे ? या ठिकाणी माननीय पणन मंत्री उपस्थित आहेत. मी त्यांच्याशी या विषयी चर्चा केली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, एपीएमसीमध्ये खाटीक समाजाच्या लोकांना सभासद करुन त्यांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करुन देणार काय ? तसेच गटई पध्दतीचे गाळे खाटीक समाजाला देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? महोदय, चामड्यापासून टॅनिंगचे कारखाने सुरु करण्याची त्यांची मागणी आहे. त्यामुळे त्यांच्या मागणीबाबत सरकारची भूमिका काय आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, खाटीक समाजाला काहीच सवलती मिळत नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. राज्य शासनाने प्रसिध्द केलेल्या 59 अनुसूचित जातीच्या यादीमध्ये 'खाटीक' या जातीची नोंद अनुक्रमांक-31 वर आहे. त्यांना प्रशासन, आरक्षण इ. सर्व क्षेत्रात सवलती मिळत आहेत. हिंदू खाटीक, धनगर खाटीक यांचा अनुसूचित जातीच्या यादीमध्ये समावेश नसल्यामुळे त्यांना सवलती मिळणार नाहीत. महोदय, हिंदू खाटीक आणि धनगर खाटीक हे दोन्ही खाटीक एकच आहेत काय या बाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून तीन महिन्यात अहवाल मागवून, नंतर तो मंत्रिमंडळाच्या शिफारशीने केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, खाटीक समाज मागासलेला आणि गोरगरीब समाज आहे. धनगर समाज शेळ्या-मेंढ्या राखण्याचे काम करतो. त्या शेळ्या-मेंढ्या कत्तलखान्याकडे आल्यानंतर त्यांच्या मानेवर सुरा लावण्याचे काम मुल्ला, मुलाली किंवा मुसलमान करतात. त्यानंतरचे सोपस्कार म्हणजेच त्यांच्यापासून मिळणारे चामडे, तुकडे बाजारात विकण्याचे काम खाटीक समाज करतो. खाटीक समाजाला विदर्भात खाटीक म्हणतात, कोल्हापूर-बेळगांवमध्ये या समाजाला सूर्यवंशी लाड समाज म्हणतात. मला वाटते माझ्याशिवाय या सभागृहात कोणीही या समाजाचे गांभीर्य चांगल्याप्रकारे लक्षात आणून देऊ शकणार नाही. अतिशय महत्त्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांना धन्यवाद देतो. आज गोरगरीब खाटीक समाज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आझाद मैदानात आलेला आहे. मराठवाड्यात खाटीक समाजाला कलाम, तर काही ठिकाणी धनगर खाटीक असे म्हटले जाते. काही ठिकाणी क्षत्रिय मराठा धनगर समाज असेही म्हटले जाते. हा समाज अतिशय मागासलेला आहे.

शिक्षण व समाज कल्याण विभाग शासन निर्णय क्र.सी.बी.सी.1076/43790/5/1977 अन्वये घटना दुरुस्ती करुन खाटीक समाजांना सवलती दिल्या आहेत. माझा प्रश्न आहे की, हा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे काय ? ही बाब तपासण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. ही बाब कधी पाठविली आहे व त्यांच्याकडून अहवाल केव्हा येणार आहे ? त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर महाराष्ट्र सरकार मार्फत केंद्र सरकारकडे संपूर्ण खाटीक समाजाला सवलती देण्यासंदर्भात शिफारस करणार काय ? काही लोकांना खाटीक समाजाच्या सवलती दिल्या आहेत. परंतु काही लोकांच्या आडनावात फरक असल्यामुळे त्यांना सवलती नाकारल्या जात आहेत. ज्यांची नावे वेगवेगळी आहेत ते खरोखरच खाटीक आहेत काय, या बाबत महाराष्ट्र शासनाने संशोधन करावे किंवा माहिती घ्यावी. महोदय, राज्यात जातु पडताळणीच्या बाबतीत काय अडचणी आहेत हे आपल्या सर्वांना माहीत आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

जो आपल्या सर्टिफिकेटमध्ये खाटीक जात लावतो मग हिंदू खाटीक असेल, कलाल खाटील असेल, सूर्यवंशी लाड खाटीक असेल, क्षत्रिय मराठा धनगर समाज खाटीक लावत असेल, त्या सर्वांना खाटीक समजून शासन सवलती सुरु करणार आहे का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, खाटीक जातीची एंट्री 31 नंबरवर आहे. ज्याच्या सर्टिफिकेटवर खाटीक असा उल्लेख असेल त्यांना पूर्ण सवलती मिळतील. ज्या ठिकाणी मागे पुढे काही नाव असेल त्या बाबतीत जोपर्यंत केंद्र सरकारची, पार्लमेंटची ॲमेंडमेंट होत नाही तोपर्यंत त्यांना सवलती देता येत नाहीत. त्या दृष्टीकोनातून आपण रिसर्च इन्स्टिट्यूटकडे ही बाब पाठविलेली आहे. त्यानंतर विभाग त्याची तपासणी करील आणि मंत्रिमंडळाच्या शिफारशीने केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात येईल, नंतर त्यांना सवलती मिळतील.

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी ज्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे त्याबद्दल मी बोलू इच्छितो. शासन निर्णय क्रमांक सीबीसी/1076/43790/5/1977 अन्वये खाटीक हिंदू समाजाचा असो किंवा मुस्लीम समाजाचा असो त्यांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला आहे का ? जे खाटीक आहेत त्यामध्ये 90 टक्के मुस्लीम असतात. महाराष्ट्रामध्ये हिंदू खाटीक असेल तर त्याला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र दिले जाते पण मुस्लीम खाटीक असेल तर त्याला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही, हे खरे आहे का ? हे खरे असेल तर मुस्लीम समाजातील खाटीक समाजाला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, जी एंट्री असते त्यामध्ये तो जर असेल तरच त्यांना फायदे मिळतात. हा अहवाल साधारणत: तीन महिन्याच्या आत बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूटकडून येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, गटई कामगारांसाठी चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना झाली त्या धर्तीवर खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना होण्याच्या दृष्टीने त्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे तयार आहे का, वित्त विभागाची मान्यता घेतली आहे का, हे महामंडळ कधी स्थापन होणार ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, हा धंदा सगळीकडे जागोजागी करता येत नाही. गटईचा धंदा कोठेही करता येतो. पण हा धंदा एका आयसोलेटेड ठिकाणी करावा लागतो म्हणून गटई कामगारांसारखे या बाबतीत करता येणार नाही. परंतु त्यांना वेगळी आर्थिक मदत देण्याच्या बाबतीत शासन विचार करीत आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी अनेक प्रश्न विचारले होते परंतु एकाच प्रश्नाचे उत्तर देण्यात आले. हे विकास महामंडळ कधी स्थापन होणार आहे आणि त्याबाबत शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतला आहे का ? लेदरकरिता जी टॅनिंग फॅक्टरी सुरु करावी लागते ती शासन स्वत: करणार आहे की ते करण्यासाठी शासन प्रोत्साहन देणार आहे ? माननीय पणन मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. मार्केट कमिट्यांमध्ये व्यवसाय करण्याकरिता त्यांना अधिकृत परवानगी देणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, निवेदनामध्ये विचाराधीन आहे असे म्हटले आहे परंतु 1985 नंतर कोणतेही मागासवर्गीय महामंडळ स्थापन झालेले नाही. त्यामुळे याची शक्यता कमी आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड व गेवराई येथे सुरु केलेल्या खरेदी केंद्रांवर झालेल्या उडीद खरेदीच्या संदर्भातील तक्रारींकडे शासनाने केलेले दुर्लक्ष

मु. शी. : बीड व गेवराई येथे सुरु केलेल्या खरेदी केंद्रांवर झालेल्या उडीद खरेदीच्या संदर्भातील तक्रारींकडे शासनाने केलेले दुर्लक्ष यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्ह्यात नाफेडच्या उडीद खरेदीसाठी महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटींग फेडरेशनच्या वतीने बीड व गेवराई या दोन ठिकाणी सुरु केलेल्या उडीद खरेदी केंद्रांवर रुपये 4,300/- प्रति क्विंटल आधारभूत दराने सुमारे 19,500 मेट्रीक टन उडिदाची खरेदी होणे, बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे उडिदाच्या उत्पादनात घट होणे, प्रशासकीय आकडेवारीनुसार जिल्हाभरात 4,141 मेट्रीक टन उडिदाच्या उत्पादनाची नोंद होणे, मात्र, मार्केटींग फेडरेशनच्या जिल्हा मार्केटींग अधिकाऱ्याने व्यापारी, दलाल यांच्याशी संगनमत करुन सुमारे 17,000 मेट्रीक टन निकृष्ट दर्जाचा उडीद बाहेरील जिल्ह्यातून आणून या केंद्रावर विक्री करणे, खरेदी केंद्रावरील खरेदी केलेल्या उडिदाबरोबर शेकडो क्विंटल माती, दगड एकत्रित करुन त्याचेही पैसे उचलणे, शेतकऱ्यांच्या नावे बोगस आर्थिक व्यवहार करणे, अनेक शेतकऱ्यांनी या केंद्रावर उडीद विक्री केली नसल्याचे लेखी कळविणे, सुमारे 10 कोटी रुपयांचा आर्थिक अपहार व भ्रष्टाचार अधिकाऱ्यांनी करणे, लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व संबंधितांकडे केलेल्या तक्रारीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शासकीय निधीचा होत असलेला गैरवापर, शासनाने या गंभीर विषयाबाबत करावयाची सत्वर कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, गेवराई व बीड या दोन ठिकाणी खरेदी केंद्र सुरु केले. त्याची नोडल एजन्सी खरेदी विक्री संघाला दिलेली आहे. गेवराई तालुक्यामध्ये 7792 क्विंटल उडीद खरेदी केलेले आहेत. आमच्याकडे श्रीक्षेत्र शनी महाराजांचे वास्तव्य असल्यामुळे आमच्याकडे उडिदाचा पेरा किंबहुना काळ्या तेलबियाचा पेरा होत नाही. आमच्याकडे सूर्यफूल होत नाही, उडीद होत नाही, काहीच खरेदी होत नाही. गेवराई तालुक्यामध्ये जी एकूण उडीद खरेदी झालेली आहे, त्यामध्ये ज्याच्या नावाने खरेदी केलेली आहे, उदा. अमरसिंह पंडित यांच्याकडून समजा 13 क्विंटल उडीद खरेदी केले असतील, अशा वेळी तेथील सर्व शेतकऱ्यांनी लेखी लिहून दिलेले आहे की, हे उडीद आमच्या शेतातील नाही. 13 फेब्रुवारीला बीड खरेदी केंद्रावर एकाच दिवशी 1300 क्विंटल उडीद खरेदी झालेली आहे. त्या ठिकाणी एकच महिला ग्रेडर आहे. एक महिला ग्रेडर 1300 क्विंटल उडीद खरेदी करु शकत नाही आणि ते प्रॅक्टीकली शक्य नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

हे उडीद खरेदी करीत असताना नोडल एजन्सीचे खाते राष्ट्रीयकृत बँकेमध्ये असावयास पाहिजे. परंतु त्यांनी तसे केलेले नाही. तसेच ज्या शेतकऱ्यांकडून उडीद खरेदी केलेली आहे. त्या शेतकऱ्यांनी आम्ही उडिदाचे पीक घेतलेले नव्हते असे लेखी लिहून दिलेले आहे. तहसीलदारांचा पेरा निरंक आहे, तालुका कृषी अधिकाऱ्यांचा पेरा निरंक आहे. या मार्केटिंग अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन त्यांची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून चौकशी केली जाईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या प्रकरणाची चौकशी केली जाईल. चौकशीत जे जे दोषी सापडतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितले की, त्या शेतकऱ्यांच्या नावावर उडिदाची खरेदी करण्यात आलेली आहे. परंतु शेतकऱ्यांनी त्याला नकार दिलेला आहे. त्यामुळे या खरेदी केंद्रावर गेल्या 5 वर्षामध्ये किती उडिदाची खरेदी झाली होती आणि संबंधित मार्केटिंग अधिकारी त्या जिल्ह्यात किती वर्षापासून आहेत ?

श्री.प्रकाश सोळंके : या वर्षी पहिल्यांदाच उडिदाची खरेदी करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या एमएसपीच्या खाली बाजार भाव गेला तर नाफेड किंवा नोडल एजन्सीमार्फत खरेदी केली जाते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विचारलेली माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. बीड जिल्ह्यातील दलाल एका राजकीय व्यक्तीच्या अधिपत्याखाली काम करीत आहेत. बीड जिल्ह्यात कोणत्याही पिकाचे उत्पन्न झालेले नाही, तेथे दुष्काळी परिस्थिती आहे. खरिपाचे पीक हाती आलेले नाही. या मार्केटिंग फेडरेशनच्या अधिकाऱ्यांनी ही खरेदी दाखविलेली आहे. हे दलाल राजकीय व्यक्तीच्या हाताखाली काम करणारे हे लोक व मार्केटिंग फेडरेशनचे अधिकारी आहेत. त्यांनी हे काम केलेले आहे. या खरेदीत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असल्यामुळे शासन या मार्केटिंग अधिकाऱ्यास ताबडतोब निलंबित करुन पुढील कारवाई करणार आहे काय ? या फेडरेशनने राष्ट्रीयकृत बँकेत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

खाते न उघडता सहकारी बँकेत खाते उघडले आहे. ती बँक कोणाची आहे, कोणाच्या अधिपत्याखाली काम करीत आहे ? ती सहकारी बँक तर दिवाळखोरीत गेलेली आहे. त्यांनी शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्या बँकेत खाते उघडले आहे काय ? त्यामुळे शासन या मार्केटिंग अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करणार आहे काय आणि नंतर चौकशी करणार आहे का ?

श्री.प्रकाश सोळंके : उच्चस्तरीय अधिकारी म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली जाईल व त्यात ते दोषी आढळले तर तातडीने त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

पृ.शी.: पुणे येथील राज्य सहकारी संघाच्या मालकीची मालमत्ता विकासकास अल्प किंमतीमध्ये देणे

मु.शी : पुणे येथील राज्य सहकारी संघाच्या मालकीची मालमत्ता विकासकास अल्प किंमतीमध्ये देणे यासंबंधी श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तब्बल 133 कोटीहून अधिक किंमतीची पुणे येथील राज्य सहकारी संघाच्या मालकीची मालमत्ता बीओटी साठी विकासकास अवघ्या 35 कोटी 11 लाख रुपयांत देण्याचा नियमबाह्य करार संघाच्या संचालकांनी केल्याने त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश माहे ऑगस्ट, 2012 च्या सुमारास सहकार आयुक्तांनी देणे, राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळातील आर्थिक अनियमिततेमुळे राज्य सरकारने संचालक मंडळ सन 2011 च्या जानेवारी महिन्यात बरखास्त करणे, त्याच काळात संचालक मंडळाच्या बीओटी समितीच्या झालेल्या एकाच बैठकीत सदरहू करार रद्द करण्यात आल्याचे सन 2012 च्या पावसाळी अधिवेशनात सांगण्यात येऊनही अद्यापही हा करार रद्द करण्यात न येणे, तसेच संघातील या गैरव्यवहाराबाबत कोर्टात दाखल करण्यात आलेल्या दाव्याच्या निकालांमध्ये संघाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांविरुध्द बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही पोलिसांनी याप्रकरणी दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.रामदास कदम : या लक्षवेधीमध्ये राज्य सहकारी संघाची पुणे येथील जागेची शासकीय किंमत 135 कोटी रुपये एवढी आहे. बाजारभावाचा विचार करता त्या जागेची किंमत 400 कोटी रुपये एवढी आहे. पुणे रेल्वे स्टेशनच्या अगदी बाजूला असलेली ही जागा बीओटी तत्वावर 99 वर्षासाठी देण्याचे काम या सर्व मंडळींनी केलेले आहे. शासनाने या प्रकरणी कारवाई करुन ते मंडळ बरखास्तही केलेले आहे. त्याबाबत मी शासनाला धन्यवाद देतो. पण ती जागा बिल्डरच्या नावावर आहे, विजेचे मीटर त्याच्या नावावर आहे. त्या जागेचा त्याने कब्जा केलेला आहे. यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ? ही बाब न्यायप्रविष्ट आहे. ते लोक न्यायालयात गेलेले आहेत याची मला कल्पना आहे. पण त्या जागेचा शासनाने ताबडतोब ताबा घेतला पाहिजे. कारण त्याने फक्त 1 कोटी रुपयेच अग्रिम घेतलेला आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

हे संचालक मंडळ बरखास्त केल्यानंतर त्यांनी पुन्हा मिटींग घेऊन ठराव पास केलेला आहे. ही 400 कोटीची जागा ज्यांनी अनधिकृतपणे 99 वर्षाच्या लिजवर 35 कोटी रुपयामध्ये विकासकाच्या घशात घातली त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे ? ही जागा तातडीने ताब्यात घेण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. हा गैरप्रकार संचालक मंडळ आणि काही अधिकारी यांच्या संगनमताने झालेला आहे. त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. पोलीस केस दाखल केलेल्या आहेत. तसेच या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी चालू आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. शासन या प्रकरणी स्वत: इण्टरव्हेन करुन हा करार रद्द करुन जागा ताब्यात घेण्याच्या बाबतीत निश्चित पावले टाकील.

श्री. रामदास कदम : या गोष्टीला दोन-तीन वर्षे झालेली आहेत. जागा ताब्यात घेण्याच्या बाबतीत शासनाच्या माध्यमातून जी कारवाई व्हायला पाहिजे होती ती अद्याप झालेली नाही. 400 कोटी रुपयाची जागा 35 कोटी रुपयाना विकली. लाईट मीटर देखील विकासकाने आपल्या नावावर करुन घेतलेले आहे. तेव्हा ही जागा तातडीने ताब्यात घेण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच संबंधित दोषी अधिका-यांवर किती दिवसात कारवाई करण्यात येणार आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : दिनांक 3 जानेवारी 2008 आणि 7 ऑक्टोबर 2010, ज्या दिवशी या प्रकाराची कुणकुण लागली त्यावेळी नोटीस दिली होती. त्यानंतर संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले, पोलीस केस दाखल करण्यात आली. औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये एका माजी संचालकाने याचिका दाखल केली. मला जी माहिती प्राप्त झाली त्याप्रमाणे औरंगाबाद उच्च न्यायालयाने या प्रकरणी Until the disposal of the final petition स्टे दिलेला आहे. या बाबतीत स्पेशल कौन्सिलर नेमून आम्ही सिंगल बेंचने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात जॉईण्ट बेंच समोर जाणार आहोत. सिंगल बेंचन जो निकाल दिलेला आहे तो तातडीने स्थगित करुन घेणे महत्वाचे आहे. Until the disposal of the final petition अशा प्रकारची स्टे ऑर्डर दिलेली आहे. पुण्यामध्ये एक सिव्हील मॅटर चालू आहे. त्या संदर्भात स्टे नाही. यामध्ये कारवाईचा भाग हा उच्च न्यायालयाच्या माध्यमातून आहे. आम्ही ही माहिती घेण्याचा प्रयत्न केला की, जर पुण्यामध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील....

कारवाई झाली असेल तर औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये पिटिशन कसे काय फाईल झाले ? भरुचा आणि संचालक मंडळाने जे ॲग्रीमेण्ट केलेले आहे ते रद्द करुन ही जागा सरकारच्याच मालकीची राहील आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये ही जागा दुस-याला जाऊ देणार नाही अशी शासनाची स्पष्ट भूमिका आहे.

जे ॲग्रीमेण्ट केलेले आहे त्यासंदर्भात दिवाणी न्यायालयामध्ये केस दाखल झालेली आहे. त्याबाबतीत स्टे नाही. त्याने वॉटर कनेक्शन आणि वीज कनेक्शनचे बिल भरुन वरचे दोन मजले स्वत:च्या ताब्यात आहेत असे दाखविले.

...नंतरश्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

त्यांनी दुसऱ्याला भाडयाने जागा दिली आहे असे दाखविले. त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार केली की, तेथे श्री.जोगदंड नावाचा अधिकारी आहे, तो आम्हाला येऊ देत नाही. दुसरी पोलीस तक्रार बंड गार्डन पोलीस स्टेशनला नोंदविण्यात आली आहे. मला वाटते की, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. माननीय राज्यमंत्री यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व ताकद पणाला लावून सदर जागा सरकारला पुन्हा मिळेल असा प्रयत्न करण्यात येईल आणि कलम 88 ची कारवाई सरकारने सुरु केलेली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, अनेक शासकीय जागा बीओटी तत्वावर विविध संस्थांना देते. परंतु त्या संस्थांकडून त्या जागा परत मिळवून घेण्यासाठी अथक प्रयत्न करावे लागतात. शासकीय जागा बीओटी तत्वावर देण्यासाठी शासनाने काही मार्गदर्शक तत्वे तयार केलेली आहेत काय ? या बाबतीत शासनाचे मार्गदर्शन तत्व नसल्यामुळे संचालक मंडळाला जे योग्य वाटते ते संचालक मंडळ करीत असते. 133 कोटी रुपये किंमतीची जागा असते, त्या जागेची बाजारभावाची किंमत 400 कोटी असते. ती जागा संस्थांना 35 कोटी रुपयांना देतात. शासकीय जागा संस्थांना देताना शासनाची स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे असली पाहिजेत. बीओटी तत्वावर जागा द्यावयाची असेल तर त्यासाठी कोणते निकष असले पाहिजे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषाचे उल्लंघन सस्थांकडून होते, त्यानंतर शासनाला कोर्टात जावे लागते. शासनाला अशा प्रकरणी कोर्टात जावे लागू नये म्हणून शासन काही मार्गदर्शक तत्वे बनविणार काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपल्याकडे बीओटी तत्वावर जागा देण्याच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्यांचा एक स्टॅन्डींग जी.आर. काढलेला आहे. या सभागृहात आजच विधेयक संमत केलेले आहे. या नवीन कायद्याच्या अनुषंगाने सहकारी संस्थांना ट्रेनिंग देणे गरजेचे आहे. शासनाचा मनोदय असा आहे की, ही जागा सरकारने आपल्या ताब्यात घ्यावयाची आणि तेथे अद्यावत अशा प्रकारचे ट्रेनिंग इन्स्टिटयूट निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. दिनांक 10 एप्रिल रोजी संचालक मंडळाने जनरल बॉडीची बैठक घेण्याचे निश्चित केले आहे. या संचालक मंडळातील काही संचालक दोषी नाहीत. परंतु काही संचालकांचे म्हणणे असे आहे की, जनरल बोर्डाच्या बैठकीत सदर जागा सरकारला हस्तांतरीत करण्याचा ठराव होण्याची शक्यता आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : ही मूळ जागा राज्य शासनाची आहे. ती लीजवर सहकार बोर्डाला दिली. या संदर्भात नवीन कायदा मंजूर झालेला आहे. नवीन कायद्याप्रमाणे हा अधिकार जनरल बॉडीला आहे. राज्य शासनाचे नियंत्रण जात आहे. सदर जागा देताना राज्य सरकार आणि सहकार बोर्डात करार झाला असेल. ही जागा महसूल विभागाची आहे. ती जागा ताब्यात घेण्यासाठी राज्य शासन काय प्रयत्न करणार आहे, औरंगाबाद खंडपीठाने जो स्टे दिलेला आहे, त्याच्या विरुध्द सुप्रीम कोर्टात अपील कशा प्रकारे व कधीपर्यंत करणार आहात ?

श्री.हर्षवर्धन पाटील : माननीय सदस्यांना या प्रकरणाची थोडी कमी माहिती दिसते आहे. ही जागा महसूल विभागाची जागा नाही. 1970 साली ही जागा 6 लाख रुपयात राज्य सहकारी संघाने खरेदी केलेली आहे. मात्र त्या जागेवर आरक्षण अर्बन लॅन्ड सिलींगचे होते. ही जागा राज्य सरकारने 1970 साली 6 लाख रुपयात सहकारी संघाला दिली. 1972 मध्ये सहकारी संघाने या जागेचा ताबा घेतला. त्यात एक अट अशी होती की, त्याचा वापर आपल्याला उद्याच्या अपीलच्या ठिकाणी करता येईल. मला असे सांगावयाचे आहे की, युएलसीची जागा देताना राज्य सरकारने दोन अटी घातल्या होत्या. ती जागा फक्त ट्रेनिंगसाठी दिली जाईल आणि त्या जागेचा वापर होस्टेलसाठी करण्यात यावा. याचा अर्थ स्पष्ट आहे की, सहकारी संघाच्या संचालक मंडळाने शासनाच्या दोन्ही अटींचे पालन केलेले नाही. मला असे वाटते् की, हाच मुद्दा अपील मध्ये घेणार आहोत. सुप्रीम कोर्टात जाण्याची आवश्यकता भासणार नाही. सिनियर बेंचकडे अपील केले जाईल. या बाबतीत तातडीने 8 ते 10 दिवसामध्ये माझ्या विभागामार्फत प्रयत्न केला जाईल. या सगळया कामासाठी आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. त्याचे कारण असे आहे की, हा एक अत्यंत महत्वाचा विषय आहे. या बाबतीत सहकार विभाग अतिशय गांभीर्याने मार्ग काढण्याचा प्रयत्न करील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पुणे येथील जागा आहे.त्या जागेचा करार पुणे येथे झाला आहे. मुळात संभाजीनगर हे उच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र नसताना सुनावणी कशी काय घेतली ? आपले जे सरकारी वकील असतील त्यांचे त्या संदर्भात काय आक्षेप घेतले आहेत काय, घेतले नसतील त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. या ठिकाणी सगळे पटवापटवीचे काम दिसते आहे. या बाबतीत शासनाने विधी व न्याय विभागाचे मत घ्यावे.

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5.....

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी माहिती घेतली असता असे कळले की, जे चार माजी संचालक कोर्टात गेले आहेत त्यांनी त्यांचा औरंगाबाद येथील निवासी पत्ता नमूद केलेला आहे. ते तेथेच राहणारे आहेत, म्हणून पुण्यामध्ये कारवाई झाली. पुणे मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात आहे. चार संचालक मराठवाड्याचे असल्यामुळे त्यांनी तेथील वकीलपत्र दाखल करुन आमच्यावर अमुक प्रकारची कारवाई झाली असे न्यायालयाला सांगितले. तरी सुध्दा ती माहिती घेण्यात येईल. तेथील पब्लिक प्रॉसिक्युटर यांनी कशा प्रकारे स्टेटमेंट दिले, सरकारच्या वतीने कोणत्या वकिलांनी बाजू मांडली त्याची माहिती घेण्यात येईल. मी या विचारात आहे की, सहकार विभागाचा स्वतंत्र कौन्सिलर या कामासाठी नेमण्यात यावा. त्याची स्वतंत्रपणे नेमणूक केली आहे. मी, माननीय राज्यमंत्री, सहकार आयुक्त आणि सचिव मिळून याबाबत खुले मॉनिटरिंग करु. ही जागा पुन्हा सरकारच्या ताब्यात येईल यासाठी प्रयत्न केला जाईल. त्यात कोणतीही हयगय केली जाणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. दुपारी 3.15 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा सुरु होईल.

(दुपारी 2.41 ते 3.15 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावे.

उप सभापती : ठीक आहे. सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(दुपारी 3.16 ते 3.21 पर्यंत बैठक स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : इंदिराबाई आगाशे स्कूल,श्रीपूर (ता.माळशिरस,जि.सोलापूर) या शाळेतील विद्यार्थ्यांनी फी न भरल्यामुळे त्यांना वर्गात बसण्यास मनाई करून दिवसभर उन्हात उभे राहण्याची दिलेली अमानवी शिक्षा याबाबत श्री.रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

इंदिराबाई आगाशे इंग्लिश स्कूल, श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर ही शासनमान्य इंग्रजी माध्यमाची शाळा असून या शाळेत शेतकऱ्यांची व गोर-गरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. शाळेची फी न भरल्याबाबत शाळेच्या व्यवस्थापक मंडळाने संबंधित विद्यार्थ्यांना वर्गात बसण्यास मनाई करून दिवसभर शाळेच्या प्रांगणात उन्हाळ्याच्या दिवसात उन्हात उभे राहण्याची अमानवी शिक्षा केली. त्यामुळे 12 ते 15 मुले आजारी झाली असून पालक संतप्त झाले आहेत.

सदर प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांचा छळ करणाऱ्या व्यवस्थापक मंडळाविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी मी विनंती करीत आहे.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : देशातील नागरिकांच्या मदतीसाठी राज्य व केंद्र शासनाने सुरू केलेल्या 14 हेल्पलाईन पैकी 11 हेल्पलाईन बंद असणे याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

देशातील नागरिकांच्या मदतीसाठी केंद्र व राज्य शासनाने सुरू केलेल्या 14 हेल्पलाईन पैकी पोलीस मदत, ॲम्ब्युलन्स हेल्पलाईन आणि महिलांसाठी मदत वगळता अन्य 11 हेल्पलाईन नॉट रिचेबल मेसेज देत असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, सद्य:स्थितीत महिलांसाठी असलेली 1091 ही एकमेव सेवा सुरू असून शेतकरी, भूकंप तसेच नैसर्गिक आपत्तीकाळात मदत, राष्ट्रीय महामार्गावरील मदत, ब्लड बँकेविषयी माहिती, ट्रॅफिक विषयक माहितीसाठी असलेल्या हेल्पलाईनवर संपर्क होत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असणे, एकूणच राज्यातील विविध हेल्पलाईन या फक्त कागदोपत्रीच सुरू असणे, राज्यातील वाढते दंगे, बलात्कार, लूटमार, दरोडे अशा विविध घटना पाहता सदरहू हेल्पलाईन सुरू करण्याकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही, सदरहू विषय राज्यातील आणि देशातील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याने मी हा विषय विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

.....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :नाशिक येथील जयआनंद निराश्रित बालगृहातील मुलींचे मानसिक शोषण व छळ केला जात असणे या बाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

नाशिक येथील जयआनंद निराश्रित बालगृहात गेल्या अनेक वर्षापासून सहा ते चौदा वयोगटातील 34 मुलींचे तेथील पाच कर्मचाऱ्यांकडून मानसिक शोषण व मानसिक छळ केला जात असल्याची मुलींनी महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांकडे तक्रार केल्याने दिनांक 25 मार्च 2013 रोजी सदर गैरप्रकारास वाचा फुटली. मुलींनी पाच जणांविरुध्द तक्रार केली मात्र चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येणे, तसेच न्यू एज्युकेशन इन्स्टिटयुट संचलित वाय.डी.बिटको शाळेतील शिक्षक हा विद्यार्थिनींशी गैरवर्तन करीत असल्याबाबत दिनांक 22 मार्च, 2013 रोजी पालकांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केलेली असणे, मात्र या प्रकरणाबाबत शिक्षण विभागाकडून अनभिज्ञ असल्याचे दाखवून कारवाई करण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. या दोन्ही घटनांमधील व्यक्तीवर तातडीने कारवाई केली जात नसल्याने विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत पालकांच्या मनात प्रश्न चिन्ह उभे राहत असणे, या दोन्ही गंभीर प्रकरणांची तातडीने सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कठोर कारवाई करावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : गेवराई येथे गूढ आवाज आणि हादऱ्याच्या घटनांमुळे तेथे पसरलेले संशयाचे आणि दहशतीचे वातावरण या बाबत श्री.अमरसिंह पंडित, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

गेवराई, जि.बीड,शहर व परिसरात गुरुवार दिनांक 28 रोजी अचानक गूढ आवाजाने मोठा हादरा बसणे, शहरातील घरांच्या खिडक्या व तावदाने फुटणे, भूकंपाच्या भीतीने भयग्रस्त नागरिक घराबाहेर पडणे, अनेक ठिकाणी इमारतींना तडे जाऊन घरातील फरशा फुटण्याचे प्रकार घडणे, सदरची घटना वारंवार घडणे, शुक्रवार, दिनांक 29 रोजी अशीच घटना उमापूर व परिसरातील गावांमध्ये घडणे, गूढ आवाज व हादऱ्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात भीतीचे वातावरण पसरणे, आवाज कोणत्या कारणांमुळे झाला याचा प्रशासकीय पातळीवर शोध घेण्याचा प्रयत्न होणे, प्रशासकीय पातळीवरुन आवाज आणि हादरा या बाबतच्या घटनांचा शोध घेण्यास आलेले अपयश, यामुळे जनतेत संशय व दहशतीचे वातावरण पसरणे, घातपात, दहशतवादी कारवाई किंवा भूकंप सदृश्य गूढ आवाज या बाबत जनतेत तर्कवितर्क व शंका निर्माण होणे, जनतेत निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी शासनाने तत्पर कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : मुंबई आणि उपनगरातील मॉलमधील खाजगी सुरक्षा व्यवस्था ढिसाळ असणे या बाबत श्री.किरण पावसकर,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुंबई आणि उपनगरात झपाट्याने मॉलची संख्या वाढत आहे. मात्र मॉल व तत्सम महत्वाच्या ठिकाणी अस्तित्वात असलेली खाजगी सुरक्षा व्यवस्था ढिसाळ असल्याने गतवर्षी पोलीस दलाच्या संरक्षण आणि सुरक्षा शाखेच्या वतीने केलेल्या मॉकड्रील सुरक्षा चाचणीत निदर्शनास आले आहे. मॉल व तत्सम ठिकाणी देशी व विदेशी पर्यटक व स्थानिक नागरिक यांची खरेदीसाठी गर्दी होत असते. अशा ठिकाणच्या सुरक्षेची जबाबदारी मॉल मालकांवर असताना त्यांच्याकडून नेमण्यात आलेल्या खाजगी सुरक्षारक्षक कंपन्यांची सुरक्षा व्यवस्था निकृष्ट दर्जाची आहे. मॉकड्रील केल्यानंतर असे निदर्शनास आले की, या सुरक्षारक्षकांना साधे प्रशिक्षणही देण्यात आलेले नाही. सुरक्षारक्षकांना कामावर ठेवत असताना त्यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी या कपंन्यांची आहे. सुरक्षारक्षक ही शोभेची वस्तू न रहाता सुरक्षारक्षकांना पूर्ण प्रशिक्षण सुरक्षा कंपन्यांकडून देण्यात यावे अन्यथा या सुरक्षा कंपन्यांचे परवाने रद्द करण्याबाबत कार्यवाही व्हावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:कचरावेचकांच्या संघटनेने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसमोर केलेले धरणे आंदोलन या बाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

कचरा वेचणाऱ्या लोकांची "कागद, काच, पत्रा,कष्टकरी पंचायत संघटना" अशी संघटना आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील ठेकेदारांनी कचरा वेचकांना रोज 254 रुपये देणे आवश्यक असताना त्यांना फक्त 50 ते 100 रुपये रोज या दराने वेतन देण्यात येते. तेव्हा या संघटनेचे दिनांक 20 मार्च 2013 पासून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसमोर आंदोलन सुरु आहे. या कंपनीने कामगारांची गैरहजेरी खूप दाखविली आहे. ठेकेदाराने महानगपालिकेकडून घेतलेले पैसे आणि प्रत्यक्षात कामगारांना दिलेले पैसे यामध्ये चार हजार मनुष्य दिवसांच्या हजेरीचा फरक आहे. ही बाब महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या निदर्शनास आणून सुध्दा त्याबाबत कोणतीही कार्यवाही झ ालेली नाही. तेव्हा पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि बी.व्ही.जी यांच्यामध्ये जो करार झालेला आहे त्याची चौकशी करण्यात यावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

यांनतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : श्री.मुरलीधर काटकर यांची मु.पो.आंबेरी (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील 19 एकर जमीन टाळंबा प्रस्ताव क्र.17/2002 धरणाच्या पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या जमिनीस स्थगिती देण्याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"श्री.मुरलीधर महादेव काटकर यांची मु.पो.आंबेरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील सर्व्हे क्र.66, हिस्सा क्र.1, सर्व्हे क्र.67, हिस्सा क्र.8 आणि सर्व्हे क्र.68, हिस्सा क्र.2 येथील 19 एकर जमीन टाळंबा प्रस्ताव क्र.17/2002 धरणाच्या पुनर्वसनासाठी शासनाने संपादित करुन त्यांना भूमिहीन केले आहे. या बाबत श्री.मुरलीधर काटकर यांनी पुनर्वसनाची जमीन देण्यावर हरकत घेतली आहे. श्री.मुरलीधर काटकर यांची ही जमीन वडिलोपार्जित नसून स्वत:च्या कष्टाने 22 वर्षांपूर्वी त्यांनी विकत घेतलेली आहे. सदर बाब गंभीर असून ते कधीही आत्महत्या करतील अशी त्यांची मानसिकता झाली आहे. त्यामुळे श्री.मुरलीधर काटकर यांच्यावर होणारा अन्याय थांबवावा व टाळंबा प्रस्ताव क्र.17/2002 धरणाच्या पुनर्वसनासाठी शासनाने भूसंपादन केलेल्या जमिनीस तत्काळ स्थगिती देऊन, शासनाने तातडीने कार्यवाही करावी. सदरची बाब मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे निदर्शनास आणून देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : राज्यातील कर्णबधिरांसाठी भारतीय बनावटीचे कॉक्लिअर इम्प्लांट तयार करण्याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात सन 2002 च्या नॅशनल सॅम्पल सर्व्हे अर्थात राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार अपंगांच्या एकूण लोकसंख्येपैकी 51 टक्के शारीरिक अपंग, 14 टक्के अंध व 15 टक्के कर्णबधिर व्यक्ती असल्याचे आढळून आले होते. यापैकी कर्णबधिर यांच्या समस्येवर तोडगा काढण्याबाबत डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या काळात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या माध्यमातून भारतीय बनावटीचे कॉक्लिअर इम्प्लान्ट तयार करण्याच्या प्रकल्पाला चालना देऊन एक लाख रुपयांचे कॉक्लिअर इम्प्लान्ट सन 2012 मध्ये तयार करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मात्र राज्यात अद्याप सदर बनावटी इम्प्लान्ट तयार न होणे, परिणामी राज्यातील कर्णबधिरांना परदेशी बनावटीच्या कॉक्लिअर इम्प्लान्टसाठी किमान सहा ते बारा लाखाचा खर्च करावा लागणे, या बाबत राज्यात भारतीय बनावटीचे कॉक्लिअर इम्प्लान्ट बनविण्यास चालना देण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : नेत्रदान केलेल्यांपैकी 70 टक्के डोळे वापरलेच जात नसल्याची उघडकीस आलेली घटना, याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दृष्टीहीनांना नेत्र प्रत्यारोपणाचा फायदा व्हावा या दृष्टीने नेत्रदान करुन दृष्टीहीनांना नवे जग दाखविण्याची अनेकांची तयारी असली तरी दान केलेल्यांपैकी तब्बल 70 टक्के डोळे वापरलेच जात नसल्याची माहिती उघडकीस आली आहे. नेत्र प्रत्यारोपण व त्याच्या जपणुकीसाठी शासनाची स्वत:ची यंत्रणा व व्यवस्था नसल्याने डोळ्याचा वापर प्रत्यारोपणासाठी होत नाही, डोळे उपलब्ध करुन देणाऱ्यांची तसेच किती रुग्णांना डोळे प्रत्यारोपणाचा फायदा झाला याची माहिती आय बँक देत नाही. नेत्रदान केल्यानंतर डोळ्यांचे पुढे नेमके काय होते याची कोणतीही माहिती पारदर्शकपणे ठेवली जात नसल्याने नेत्रदान मोहिमेला आलेले अपयश, आय बँकाकडे नेत्रदान केलेल्या डोळ्यांची यादी नसते, त्यामुळे किती रुग्णांना या मोहिमेचा लाभ झाला हे कळण्यास मार्ग नसल्यामुळे शासकीय, अशासकीय व स्वयंसेवी संस्थेच्या नेत्र रुग्णालयातील नेत्रपेढ्यांना मार्गदर्शक सूचना करण्यात यावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु.शी.: स्वातंत्र्यपूर्व काळापासून सरकारच्या ताब्यातील जमिनी परत मिळण्याची आशा लावून बसलेल्या नांदूर बहुला वासीयांचे पुनर्वसन त्याच जागेवर करुन त्या गावाला पुन्हा शासकीय नकाशावर आणणे, याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सन 1943 साली दुसऱ्या महायुध्दाच्या वेळी सार्वजनिक सुरक्षितता व युध्दाचे कारण सांगून ब्रिटिश शासनाच्या तत्कालीन कलेक्टरने लेखी कराराद्वारे नाशिक जिल्ह्यातील नांदूर बहुला गावातील सर्व जमिनी ताब्यात घेतल्या होत्या. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन 1950 मध्ये कलेक्टर, नाशिक यांनी राजपत्रात प्रसिध्दी देऊन या गावातील संपूर्ण 2298 एकर जमीन मिलीटरीच्या ताब्यात दिली. त्यामुळे या गावातील शेतकरी व सर्व ग्रामस्थ विस्थापित झाले होते. मात्र गावकऱ्यांच्या सहकार्याने या गावातील लढवय्ये कार्यकर्ते श्री.पुंजाजी दराडे यांनी मोठ्या जिद्दीने न्यायालयीन लढा देऊन सुप्रीम कोर्टाचे दरवाजे ठोठावले. सदर प्रकरणी शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळण्याबाबत तीन महिन्यांत कार्यवाही करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दि.5 मार्च, 2013 रोजी निर्णय दिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून म्हणजेच तब्बल सत्तर वर्षांपासून सरकारच्या ताब्यातील आपल्या जमिनी परत मिळण्याची आशा लावून बसलेल्या नांदूर बहुला वासीयांचे शासनाने त्याच जागेवर तातडीने पुनर्वसन करुन या गावाला पुन्हा शासकीय नकाशावर आणावे, अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी करीत आहे."

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : गोवा शासनाने लागू केलेल्या प्रवेश करातून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांना सूट मिळण्याबाबत श्री. विनायक राऊत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"महाराष्ट्र-गोवा राज्याच्या सीमेवर गोवा शासनाने गोवा राज्यात येणाऱ्या वाहनांवर दिनांक 15 एप्रिल, 2013 रोजीपासून प्रवेश कर लागू केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी व दोडामार्ग तसेच वेंगुर्ला या सीमावर्ती तालुक्यातील तसेच इतर तालुक्यातील लोकांना पणजी, फोंडा, गोवा इत्यादी ठिकाणी वारंवार जावे लागते. त्यामुळे गोवा राज्य शासनाकडून लागू करण्यात येणाऱ्या प्रवेश कराची झळ सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना फार मोठ्या प्रमाणात बसणार आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वाहनाव्दारे जाणाऱ्या जनतेला हा प्रवेश कर माफ करावा यासाठी महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि माननीय परिवहन मंत्री यांनी गोवा राज्य शासनाच्या संबंधित मंत्र्यांशी संपर्क सांधून यावर तोडगा काढण्याची आवश्यकता असल्याने सदरची बाब मी या विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे."

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

उप सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हा औचित्याचा मुद्दा आपण शुक्रवारी मान्य केलेला होता परंतु त्या दिवशी औचित्याचा मुद्दा मांडू नका अशी आपण विनंती केली होती. त्यामुळे सदरहू औचित्याचा मुद्दा मी आता मांडत आहे. आजचा जो औचित्याचा मुद्दा आहे तो मी नंतर मांडतो.

सभापती महोदय, सध्या राज्यातील बहुतांश शाळांमध्ये शालांत परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे वासंतिक वर्ग एव्हाना सुरु झाले आहेत. त्याचबरोबर राज्य शिक्षण मंडळाने नेहमीप्रमाणे 10 वी चा अभ्यासक्रम या वर्षी बदलला आहे. या बदललेल्या अभ्यासक्रमाची आणि राष्ट्रीय प्रज्ञा शोध व किशोर वैज्ञानिक प्रोत्साहनपर योजना पुस्तके अद्याप बाजारात उपलब्ध झालेली नसल्यामुळे व ती लवकरच उपलब्ध होण्याची शक्यता नसल्यामुळे या परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नियोजन कोसळले आहे. विज्ञान आणि गणित वगळता 10 वी च्या सर्व विषयांच्या अभ्यासक्रमात सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षापासून अमूलाग्र बदल होणार असून या अभ्यासक्रमाला अद्याप राज्य शिक्षण मंडळाने मान्यताच दिलेली नसल्यामुळे 10 वी ची पुस्तके छापून बाजारात येण्यासाठी आणखी 1 ते 2 महिन्यांचा कालावधी लागणार आहे. अनेक विद्यार्थी 9 वी ची परीक्षा झाल्याबरोबर 10 वी च्या अभ्यासाला सुरुवात करतात परंतु या वर्षी पुस्तकेच नसल्यामुळे या विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले असून शासनाच्या उदासीनतेमुळे राज्यातील मुलांच्या गुणवत्तेवर परिणाम होणार आहे. अनेक पालक सुटीच्या काळात विषयात कच्च्या असलेल्या मुलांचा अभ्यास करुन घेतात. त्यांना पुस्तकांअभावी अभ्यास कसा करुन घ्यायचा असा यक्ष प्रश्न पडलेला आहे. मंडळाची पाठ्यपुस्तके उपलब्ध नसली तरी महागड्या खाजगी कोचिंग क्लासेसकडे आणि खाजगी गाईड्स, प्रश्नावली अशा प्रकाशकांची महागडी पुस्तके छापून तयार आहेत. याची चौकशी करण्यात यावी आणि युध्द पातळीवर काम करुन 10 वी ची व इतर पुस्तके किमान एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. मोहन जोशी .....

सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. या महिना दीड महिन्याच्या सुट्टीच्या काळात दहावीच्या विद्यार्थ्यांचे जे विषय कच्चे असतात त्या विषयांचा अभ्यास त्यांचे आईवडील करुन घेतात. अभ्यासक्रम बदलणार आहे हे शासनाला माहीत असताना शासनाने डिसेंबर महिन्यापासून या कामाला सुरुवात करणे आवश्यक होते. त्यामुळे यामध्ये जे कोणी दोषी असतील त्या संदर्भात शासनाने चौकशी करावी. सभापती महोदय, दहावीच्या विद्यार्थ्यांना ही पुस्तके ताबडतोब उपलब्ध करुन देण्यासाठी आपण शासनाला आदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो. या संदर्भात कमीत कमी उद्या या सभागृहामध्ये निवेदन झाले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी.....

ही पुस्तके बाजारात केव्हा उपलब्ध होतील या संदर्भातील निवेदन किमान उद्या तरी सभागृहात करण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करतो. माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आपण त्यांना निवेदन सादर करण्याचे निर्देश द्यावेत.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.मोहन जोशी जी ने जो सुझाव यहां पर दिया है, उस बारे में विचार करके मंत्री महोदया कृपया कल आप सभागृह में निवेदन करें. कारण दहावीच्या विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे.

प्रा.फौजिया खान : होय.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जकात कर रद्द करुन शासनाने एलबीटी कर दिनांक 1 एप्रिल, 2013 पासून सुरु केलेला आहे. त्याच्या विरोधात राज्यातील अनेक शहरांमध्ये हजारो व्यापाऱ्यांनी काल पासून बेमुदत संप सुरु केलेला आहे. दुकाने बंद आहेत, व्यवहार बंद आहेत. सर्वसामान्य जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होत नाहीत. त्यांच्या संपाचा आजचा दुसरा दिवस आहे. त्या व्यापाऱ्यांनी रस्त्यावरुन मोर्चा काढला होता. त्यामुळे शासनाने या विषयात हस्तक्षेप करुन या एलबीटीमध्ये काही त्रुटी असतील तर त्या दूर कराव्या आणि व्यापाऱ्यांच्या संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यासाठी बैठक घेऊन हा प्रश्न सोडवावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांना मी सांगू इच्छितो की, शासनाला जर आपण अशा प्रकारे सूचना करु लागलो तर हे राज्य व्यापाऱ्यांना चालविण्यास द्यावे लागेल. सर्वसामान्य लोकांनी कर भरावयाचा आणि व्यापाऱ्यांनी भरावयाचा नाही असे कसे चालेल ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एलबीटीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सरकारच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. या व्यापाऱ्यांनी 10-15 वर्षापूर्वी जकात रद्द करण्यासाठी हा विषय ऐरणीवर आणला होता. त्यामुळे जकात कर रद्द करुन त्याऐवजी एलबीटी कर सुरु केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात व्यापाऱ्यांचे आंदोलन होत असेल तर ते शासनाने ताबडतोब थांबवून त्यांच्या प्रमुखांना आतमध्ये घातले पाहिजे.

श्री.मोहन जोशी : या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य व आमचे मार्गदर्शक श्री.दिवाकर रावते यांनी आता जे मत मांडले आहे. त्याबाबत सभागृहाच्या पटलावर चुकीचे येऊ नये म्हणून एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणत आहे. सुप्रीम कोर्टाने फक्त स्टे देण्याचे नाकारलेले आहे. राज्यातील 10 महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांची याचिका दाखल करुन घेतलेली आहे. सुप्रीम कोर्टाने स्टे दिलेला नाही. सर्वसामान्य जनता कर भरत आहे. पण एलबीटीमध्ये जाचक अटी आहेत त्याबाबत शासनाने हस्तक्षेप करावा अशी मी विनंती केली होती.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, जकात कर रद्द करुन त्याऐवजी एलबीटी लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. ही कर पध्दती दि.1.4.2013 पासून अंमलात आणण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार दि.1.4.2013 पासून ही कर पध्दती अंमलात आलेली आहे. राज्य सरकारने हे धोरण स्वीकारलेले आहे, त्याची अंमलबजावणी सुरु झालेली असताना त्याबाबत औचित्याचा मुद्दा मांडणे मला प्रशस्त वाटत नाही. या कर पध्दतीबाबत अडचणी असतील तर त्याबाबत शासन लक्ष देईल. पण या औचित्याच्या मुद्यामुळे शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात चित्र तयार होत आहे. ते होऊ नये. या व्यापाऱ्यांनी जी मागणी केली आहे त्याबाबत शासनाला काय मध्यस्थी करता येईल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा. परंतु सन्माननीय सदस्यांनी या औचित्याच्या मुद्याचा आग्रह धरु नये अशी मी त्यांना विनंती करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मी प्राध्यापकांच्या संपासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. परंतु ती येऊ न शकल्यामुळे औचित्याच्या मुद्याद्वारे हा विषय सभागृहामध्ये उपस्थित करण्यासंबंधी मला परवानगी द्यावी अशी मी माननीय सभापतींना विनंती केली होती.

सभापती महोदय, प्राध्यापकांच्या संपाला दोन महिने झालेले आहेत. विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापक हे सर्वजण अस्वस्थ आहेत. राज्यामध्ये अशा प्रकारची परिस्थिती प्रदीर्घ काळ रहाणे हे राज्यातील विद्यार्थ्यांच्या अणि प्राध्यापकांच्या हिताच्या दृष्टीने योग्य नाही. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. या संपाच्या संदर्भात केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरदजी पवार साहेब यांनी केन्द्राकडे रदबदली करुन 80 टक्के रक्कम मिळविलेली आहे. त्यानंतरही काही मागण्या शिल्लक आहेत. दिल्लीमध्ये नेमका काय निर्णय झाला या संबंधी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी सभागृहाला अवगत करावे अशी माझी त्यांना विनंती आहे. कारण यासंदर्भात उलटसुलट बातम्या येत आहेत. या प्राध्यापकांच्या ज्या मागण्या आहेत त्याची शासनाने तातडीने दखल घेऊन शासनाची भूमिका सभागृहाला अवगत केली पाहिजे. अन्यथा बाहेर जो गोंधळ चालू आहे त्यामुळे प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक हे अडचणीमध्ये येतील.

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, हा सर्वांच्याच दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय आहे. मी अगदी थोडक्यात यासंबंधी खुलासा करतो. यामध्ये दोन विषय आहेत. एक विषय सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितला. दुसरा विषय सर्व प्राध्यापकांशी संबंधित आहे. तो विषय असा आहे की, पाचव्या वेतन आयोगानंतर जेव्हा 2006ला सहावा वेतन आयोग लागू झाला त्यावेळचा 2006 ते 2010 या मधील अरिअर्स त्यांना मिळावा, राज्याच्या सर्व कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करुन ॲरिअर्स दिलेला आहे त्याप्रमाणे यांना ॲरिअर्स मिळावा अशी त्यांची मागणी आहे. 1908 कोटी रु. इतकी ॲरिअर्सची रक्कम आहे. युजीसीने विशिष्ट पेस्केलचे पॅकेज सर्व अधिव्याख्यातांसाठी दिलेले आहे. या अधिव्याख्यात्यांचे सेवानिवृत्तीचे वय 65 करावे अशा त्यांच्या काही अटी होत्या. त्या संदर्भात आम्ही कॅबिनेटमध्ये सेवानिवृत्तीचे वय 62 ठेवण्याचा निर्णय घेतला. युजीसीचे टोटल पॅकेज स्वीकारले नव्हते. केन्द्र

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

सरकारचे म्हणणे असे होते की, जर 100 टक्के पॅकेज स्वीकारले नाही तर 80 टक्के रक्कम दिली जाणार नाही. ब-याच राज्यांनी 65 वर्षे वयाचा मुद्दा स्वीकारला नाही. म्हणून 80 टक्के रक्कम देण्याचा निर्णय केन्द्र सरकारला घेणे भाग पडले.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

सभापती महोदय, केंद्र शासनाने एका महत्वाच्या निर्णयात थोडासा बदल केला आहे. पहिला निर्णय असा दिला होता की, अफरन्ट आम्ही तुम्हाला ॲडव्हान्समध्ये हे 80 टक्के पैसे देऊ. त्यामुळे मंत्रिमंडळाने सुध्दा निर्णय घेतला की,हे पैसे आम्ही तुम्हाला निश्चितपणे देऊ. डिसेंबर, जानेवारीमध्ये केंद्र सरकारच्या एचआरडी मिनिस्ट्रीचे पत्र आले. त्यांनी असा बदल केला की, अगोदर राज्यांनी खर्च करावा आणि नंतर ते पैसे आम्ही रिएम्बर्स करुन देऊ. अचानक बदल झाला त्या दरम्यान हा संप सुरु झाला. तरी सुध्दा या संपकरी सर्व संघटना,प्राध्यापक यांच्या संदर्भात मी या खात्याचा मंत्री म्हणून माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या समवेत गेल्या 50 दिवसात तीन बैठका त्यांच्या समवेत घेतल्या.

महोदय, बऱ्याच वेळा वृत्तपत्रात असेही लिहिले जाते की, राज्य शासन या बाबतीत गंभीर नाही. सदर संघटनाच्या प्रतिनिधींना राज्य शासन बैठकांना बोलवित नाही. तिन्ही बैठका माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर घेतल्या. यात दोनच विषय महत्वाचे आहेत, बाकी विषय लहान आहेत. यात पहिला विषय असा आहे की, पहिल्या बैठकीत माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांनी असे मान्य केले की, राज्य शासनाला अचानकपणे 1500 कोटी रुपये देता येणार नाही. ते पैसे तीन टप्प्यात देवू. आता आपला अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामध्ये यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी या सभागृहाच्या आणि मीडियाच्या माध्यमातून प्राध्यापकांना सांगू इच्छितो की, 20 ते 25 एप्रिल, 2013 पर्यंत ही 500 कोटी रुपयांची रक्कम वाटली जाईल.

महोदय,माननीय केंद्रीय कृषि मंत्री श्री. शरदराव पवार यांनी केंद्रीय मनुष्यबळ मंत्र्याबरोबर बैठक घेतली. त्या बैठकीत अत्यंत महत्वाचा असा निर्णय घेतला की, हे पैसे वर्षभरात मिळणार होते. ते वर्षभरात न मिळता दहा-दहा दिवसाच्या फरकाने म्हणजे एका महिन्यातच पूर्ण रक्कम मिळू शकेल. तो निर्णय दिल्ली येथील वृत्तपत्रात छापून आलेला आहे. 500 कोटी रुपयांच्या युटीलायझेशनची रिसीट आपण केंद्र शासनाच्या एचआरडीला दिल्या बरोबर पुन्हा 500 कोटी रुपयांची रक्कम मिळेल. त्यानंतर 10 दिवसांनी पुन्हा 500 कोटी रुपयांची रक्कम मिळेल. आम्ही

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

1526 कोटी रुपये मे महिन्याच्या शेवटपर्यंत देणार आहोत असे मला या सभागृहाच्या माध्यमातून सर्व प्राध्यापक बांधवांना सांगावयाचे आहे. केंद्र शासनाकडून ही रक्कम दीड ते दोन महिन्यात मिळेल. माननीय श्री.शरदराव पवार यांनी केलेली मध्यस्थी महत्वाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरत आहे.

सभापती महोदय, त्यांच्या दुसऱ्या महत्वाच्या मुद्याच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की,1991 ते 1999 या कालावधीमध्ये अधिव्याख्यातांच्या ज्या काही नेमणुका झाल्या होत्या. त्या नेमणुका देताना युजीसी ही अर्हता ठरवित असते. त्यांच्या क्वॉलिफिकेशनची इलिजिबिलिटी युजीसी ठरवित असते. त्यांच्या नोटीफिकेशनमध्ये असे लिहिलेले होते की, नेट, सेट किंवा पीएचडी यापैकी कुठली तरी एक अर्हता अधिव्याख्यात्यांनी धारण करणे आवश्यक आहे. त्या कालावधीमध्ये बऱ्याचशा अधिव्याख्यात्यांच्या नेमणुकांना विद्यापीठाने कंडीशनल ॲप्रुव्हल दिले. नेट, सेट च्या बाबतीत जो अंतिम निर्णय होईल त्याला अनुषंगुन याबाबतचे परमनंट ॲप्रुव्हल देण्यात येईल. एकूण 5 हजार अधिव्याख्यात्यांच्या नेमणुका 1991 ते 1999 या 9 वर्षाच्या कालावधीत झाल्या. यांचाच हा प्रश्न सातत्याने आपण अनेक वर्षापासून पाहतो आहोत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरदराव पवार होते. युतीच्या राजवटीमध्ये श्री. मनोहर जोशी, श्री. नारायण राणे मुख्यमंत्री होते. या सगळयांच्याच कालखंडात या वेगवेगळया नेमणुका झालेल्या होत्या.

महोदय, माझ्या अगोदर माजी उच्च शिक्षण मंत्री व सध्याचे विद्यमान विधानसभा अध्यक्ष श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी सुध्दा मंत्रिमंडळासमोर जाऊन या 5 हजार अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात अनेक महत्वाचे निर्णय घेतले. या अधिव्याख्यात्यांनी तीन वर्षामध्ये नेट-सेट किंवा पीएचडी करावे, केले नाही तर काढून टाकण्यात येईल अशी वेगवेगळया प्रकारची संधी त्यांना देण्यात आली. या 5 हजार अधिव्याख्यात्यांपैकी अंदाजे 2283 अधिव्याख्यात्यांनी नेट, सेट, किंवा पी.एच.डी. केले आहे. त्यांनी वेगवेगळया कालावधीत नेट, सेट, किंवा पी.एच.डी. केले आहे. ज्या तारखेपासून नेट, सेट, किंवा पी.एच.डी. केले....

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.राजेश टोपे.....

त्या तारखेपासून त्यांना सर्व सेवा मिळालेल्या आहेत. त्यांना कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) लागू झाली आहे. त्यातून त्यांना सिनियर स्केल, सिलेक्शन ग्रेड लागू झाली आहे. हे जे 5000 अधिव्याख्याते आहेत, ज्यांनी नेट, सेट किंवा पी.एचडी अर्हता धारण केलेली नाही, त्यांना चौथ्या, पाचव्या आणि सहावा वेतन आयोगाच्या बॉटम स्केलला पगार देत आहोत. दर दोन-तीन महिन्यांनी त्यांना थकबाकी दिली जाते. ज्यांनी नेट, सेट, पी.एचडी अर्हता धारण केलेली नाही त्यांना अंदाजे 55 ते 60 हजार रुपये पगार मिळत आहे. तरी त्यांचे म्हणणे आहे की, ज्या तारखेला आमची नेमणूक झाली तेव्हापासून आम्हाला कॅसचे बेनिफिट द्यावेत म्हणजे प्रमोशनच्या सिनियर स्केल आणि सिलेक्शन ग्रेड द्याव्यात. तेवढेच शासनाने मान्य केलेले नाही. ते फायदे मिळावेत यासाठी त्यांचा संघर्ष सुरु आहे.

सभापती महोदय, आम्ही कॅबिनेटपुढे प्रस्ताव घेऊन गेलो आहोत. कॅबिनेटसमोरील प्रस्तावात तीन ऑप्शन्स अंतर्भूत केलेले आहेत. केव्हापासून सेवा ग्राह्य धरायची, थकबाकी न देता सेवा ग्राह्य धरायची की थकबाकीसह ग्राह्य धरायची आणि तिसरा पर्याय कॅबिनेट ज्या तारखेपासून निर्णय घेईल त्या तारखेपासून त्यांच्या सेवा रेग्युलर धराव्यात किंवा कॅसचे बेनिफिट त्यांना द्यावेत. कॅबिनेटने तिसरा निर्णय मान्य केला. ज्याअर्थी नेट, सेट किंवा पी.एचडी अर्हता धारण केलेली नाही त्या अर्थी युजीसीने सूट दिल्याकारणाने त्यांना त्या तारखेपासून बेनिफिट देण्यात यावा हा निर्णय शासनाकडे प्रलंबित नाही. त्यांच्या मर्जीप्रमाणे निर्णय झालेला नाही असे त्यांना वाटत असल्यामुळे त्यांचा संप सुरु आहे. या दोन्ही मुद्याबाबत मी मुद्दाम माहिती दिली आहे. या शिवाय चर्चेच्या माध्यमातून काही शिथिलता आणता येईल का याबाबत विचार करता येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी संपकरी प्राध्यापकांना वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनाच्या फरकाची थकबाकी देण्याचे मान्य केले. प्राध्यापकांनी दिवसभरात किती तास काम केले पाहिजे या बाबत धोरण ठरले आहे का? 55 ते 60 हजार रुपये सध्या पगार दिला जात आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. दिवसाला किमान किती तास काम केले पाहिजे याबाबत खुलासा करावा. दिवसाच्या कामकाजाच्या वेळेतील तीन तास कमी झाले पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे का?

(उत्तर आले नाही)

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक 38254 हा बीड जिल्हा रुग्णालयातील वॉर्मर मशिन बंद असल्याबाबतचा होता. या प्रश्नाला मंत्री महोदय उत्तर देत असताना चुकीचे उत्तर दिले जात आहे असा मी आक्षेप नोंदविला होता. सभागृहाला चुकीची माहिती दिली जात होती.

सभापती महोदय, मी जबाबदारीने बोलत होतो. या क्षणाला वॉर्मर मशिन बंद आहेत. मशिन बंद असल्याबाबतच्या व्हिडिओ क्लिप्स, फोटो मी मंत्री महोदयांच्या ई-मेल ॲड्रेसवर मेल केले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर चौकशी करुन कारवाई करु असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले. नंतर मला अशी माहिती मिळाली की, बीड जिल्हा शल्य चिकित्सकांनी वॉर्मर मशिन दुरुस्त करुन त्या सुरु करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्या विरोधात मी हक्कभंगाचा प्रस्ताव मांडणार आहे.

नंतर 3एल.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या वेळेस जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले असल्यामुळे हक्क भंगाचा प्रश्न येत नाही.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय,प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळेस मी संबंधित अधिकाऱ्याकडून माहिती घेतली असून त्यासंदर्भातील फोटोग्राफ्स माझ्याकडे आहे ते मी आपल्याला दाखविण्यास तयार आहे. या घडीला त्या ठिकाणचे सर्व बेबी वॉर्मर कार्यरत आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. धनंजय मुंडे :सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांनी जे फुटेज पाठविले आहे त्या फुटेजच्या अगोदर मी माननीय मंत्री महोदयांना फुटेज पाठविले आहे. माझ्याकडे जे फुटेज आहेत ते मी काही सन्माननीय सदस्यांना दाखवले आहे. त्या मशिन्सचे वॉर्मर बंद आहे. मशिन्स सुरु असल्याचा लाईट सुरु आहे परंतु प्रत्यक्षात ते मशीन्स बंद आहेत. प्री मॅच्यूअर्ड बेबीला जे रेज मिळावयास पाहिजे ते रेज त्या मशिन्समधून येत नाही. या ठिकाणी पाचही मशीन्स बंद असल्यामुळे मला हा प्रश्न पुन्हा उपस्थित करावा लागला आहे. या सभागृहात मी जबाबदरीने बोललो असून मी खोटे ठरु नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माझ्या अधिकाऱ्यांनी मला चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल असे मी सांगितले होते. माझ्याकडे जे ई-मेल आलेले आहेत ते मी आपल्याला दाखविण्यास तयार आहे. तसेच या मशीन्स बंद आहेत की, सुरु आहेत यासंदर्भात एस.पी. यांना पाठवून सर्व माहितीची खातरजमा आपण करु शकतो. परंतु इतके जोशमध्ये येऊन मंत्र्यांवर कारवाई करा असे या सभागृहात कधी झाले नाही.

उप सभापती :मंत्र्यांवर कारवाई करा असे सन्माननीय सदस्य म्हणाले नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या सभागृहात प्रामाणिकपणे सांगितले आहे की, माझ्या अधिकाऱ्याने मला चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. असे निर्भयपणे सांगणारे आपण पहिलेच मंत्री आहात. तुम्ही सरकार म्हणून या सभागृहात जे सांगितले तसे या पूर्वी कधीही सांगितले गेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी मला फुटेज दाखवले त्यावेळेस मशिन्सचे लाईट बंद होते. आपण बाहेर गेल्यानंतर फोन करण्यात आला व त्यानंतर मशिन्स सुरु झाले. सन्माननीय सदस्यांनी आपल्याला पाठविलेल्या ई-मेलची वेळ बघा व त्यांनी पाठवलेल्या ई-मेलची वेळ बघा.

उप सभापती : सभागृहात आपण विश्वासाने काम करीत असतो. आता विधेयके घेण्यात येतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. V OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री. डी.पी.सावंत (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 5 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 5 मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विधेयकामध्ये प्रत्येक ठिकाणी प्रतीकुलगुरु असा उल्लेख करण्यात आलेला आहे. प्रो व्हाईस चान्सलर म्हणजे प्र-कुलगुरु असा अर्थ होतो, प्रतीकुलगुरु असा अर्थ होत नाही. त्यामुळे ही चूक सुधारुन विधेयक मांडले गेले पाहिजे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. I OF 2013

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA SELF-FINANCED SCHOOLS (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2012.)

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 1 - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, 2012 यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, हे विधेयक डिसेंबर महिन्यात नागपूरच्या अधिवेशनात मंजूर करण्यात आले आहे. या अधिनियमाला माननीय राज्यपाल महोदयांची अधिसंमती देखील प्राप्त झालेली आहे. दिनांक 19 जानेवारी 2013 पासून हे विधेयक अंमलात आले आहे. या अधिनियमाच्या कलम 3 मध्ये नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रत्येक वर्षी अर्ज सादर करायचा असेल तर तो 31 जानेवारी पूर्वी करणे आवश्यक असून त्याच वर्षी मान्यता देण्यात येईल अशा प्रकारची तरतूद आहे. यावर्षी नवीन शाळा व अपग्रेडसाठी वेळ कमी असल्यामुळे सन 2013-2014 साठी फक्त 15 मार्च 2013 पर्यंत मर्यादा ठेवावी अशा प्रकारची सुधारणा आपण आणत आहोत.

तसेच कलम 8 मधील पोट-कलम (1) मधील तरतुदीनुसार कलम 3 अन्वये मागितलेली कोणतीही परवानगी देण्याबाबतचा अथवा ती नाकारण्याबाबतचा राज्य शासनाचा निर्णय अर्जदारास त्या शैक्षणिक वर्षाच्या दिनांक 1 मे पूर्वी कारणांसह कळवावयाचा आहे. त्यासाठी देखील वेळ कमी असल्यामुळे आपण 15 मे पर्यंत अर्ज स्वीकारणार आहोत. ही वस्तुस्थिती विचारात घेता विधी व न्याय विभागाच्या सहमतीने हा अधिनियम सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक 6 फेब्रुवारी 2013 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. या बैठकीच्या निर्णयाच्या अनुषंगाने माननीय राज्यपाल महोदयांच्या संमतीने सुधारणा संदर्भात अध्यादेश दिनांक 22 फेब्रुवारी 2013 च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाला आहे. या अध्यादेशाचे विधेयकामध्ये रूपांतर करण्यासाठी हा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवलेला आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी येथे काही मुद्यांचा खुलासा करणे आवश्यक आहे. कलम 3 अन्वये शासनाने मुदतवाढीसाठी अनुमती दिलेली आहे. कलम 8 अन्वये अर्जदारास निर्णय कळवायचा असल्यामुळे शासनाने मुदतवाढ मागितलेली आहे येथ पर्यंत सर्व ठीक आहे. महानगर क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत प्राथमिक शिक्षण दिले जाते. म्हणजे प्राथमिक शाळेची परवानगी स्थानिक स्वराज्य संस्था देणार आहे. कलम 3 अन्वये ज्या शाळा अर्ज करणार आहेत तो अर्ज थेट शिक्षण संचालकांकडे करणार आहेत. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळेसाठी जे कोणी परवानगीसाठी अर्ज करतील त्यांना तिन्ही विभागाच्या परवानग्या शिक्षण संचालकांमार्फत देण्यात येणार आहेत काय की, पूर्वी प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांना पूर्व प्राथमिक शाळांना परवानगी देण्याचा अधिकार देणार आहात याबाबतचा खुलासा येथे होणे आवश्यक आहे. काही संस्था मोठ्या उद्देशाने शाळा सुरू करण्यासाठी येतात. आपण ज्या अटी घातल्या आहेत त्या सर्वांनाच पूर्ण करणे शक्य नाही. ज्या इच्छूक संस्था आहेत ज्यांनी कायदेशीर बाबी पूर्ण केल्या आहेत त्यांच्याकडे पायाभूत सुविधा कमी असतील तर त्या टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी शासन संधी देणार आहे काय याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा अशी माझी विनंती आहे.

.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, स्वयंअर्थसहाय्यित शाळांच्या संदर्भातील विधेयक या ठिक्राणी चर्चेसाठी आले होते त्यावर सविस्तर चर्चा होऊन ते मंजूर झाले आणि खालच्या सभागृहात मंजुरीसाठी गेले. त्यानंतर हे विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झाले.

सभापती महोदय, आता जे विधेयक चर्चेसाठी आलेले आहे ते मुदतीच्या विषयातील असले तरी त्या संदर्भात एक बाब मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणत आहे आणि त्यातून आपल्या अधिकाऱ्यांना जे सांगायचे आहे ते देखील सांगतो.

सभापती महोदय, हे विधेयक चर्चेसाठी आले होते त्यावेळी मराठी शाळांची मान्यता रद्द करण्या संदर्भात आपल्या अधिकाऱ्यांनी पोरखेळ चालविला होता. अशा शाळा चालविणाऱ्यांना तुरुंगात टाकण्यापर्यंत त्यांनी पाऊल टाकले होते. त्याचा आम्ही सर्वांनी निषेध केला होता. मराठी शाळा टिकल्या पाहिजेत, मराठी शाळा बंद पडता कामा नये, हे राज्य मराठी आहे, राज्यभाषा मराठी आहे. मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मराठी शाळा बंद करा सांगण्याचा जो आचरटपणा केला त्यावर येथे चर्चा झाली. नंतर चालू असलेल्या मराठी शाळांची यादी देण्यात आली. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही अशा शाळा बंद करणार नाही. शाळांना दिलेल्या नोटीस आम्ही थांबवू. शाळांना देण्यात आलेल्या नोटीसा थांबविण्याचे आश्वासन या सभागृहात देण्यात आले. या संदर्भात आझाद मैदानावर जे आंदोलनास बसले होते त्यांच्याशी चर्चा करण्यास माननीय मंत्री महोदय माझ्या सोबत आले होते. माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांना शब्द दिला की, महाराष्ट्र शासन मराठी शाळा बंद करण्याच्या मानसिकतेमध्ये नाही आणि शासनाचा तसा कोणता आदेश नाही. आम्ही ते करणार नाही. हे सर्व झाले असताना त्या शाळांना वारंवार नोटीसा पाठविल्या जात आहेत.

सभापती महोदय, या संदर्भात माझी, शाळांचे प्रतिनिधी आणि मंत्री महोदय यांच्या बरोबर तीन बैठका झाल्या. त्या तिन्ही बैठकीच्या वेळी अधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये जी तांत्रिक बाब होती ती सुधारण्यासाठी थोडा वेळ घेतला. त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्याचे अधिक्राऱ्यांनी सांगितले. त्यानंतर सांगितले की, आम्ही मराठी शाळा बंद करणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी महत्वाचा मुद्दा मांडलेला आहे. ज्या जुन्या मराठी शाळा आहेत त्या स्वयं अर्थसहाय्यित शाळांच्या निकषात बसणार नाहीत. कारण त्या शाळांमध्ये आपणास अपेक्षित असलेले नियोजन आणि संयोजन नाही. परंतु त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उप सूचना घातल्या त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले होते.. शासनाने उप सूचना टाकल्यामुळे आता ज्या शाळा सुरु आहेत त्यांना मान्यता देण्याकरिता हे विधेयक लागू नाही पण त्या व्यतिरिक्त ज्या नवीन शाळा येतील त्यांना हे लागू होईल आणि आपण ते स्वीकारले.

सभापती महोदय, हे सर्व झाल्यानंतर आठ दिवसांपूर्वी त्या शाळांना 1 लाख रुपये दंड आणि पाच वर्षाची शिक्षा भोगावी लागेल अशाप्रकारच्या नोटीसा पाठविण्यात आल्या. या सदनामध्ये निर्णय झाल्यानंतर, सरकारची मानसिकता असल्यानंतर आणि मराठी शाळा सुरु रहाव्यात असा आग्रह असल्यानंतर अधिकारी असे वागणार असतील तर त्यांना बसल्या जागेवर फटकावण्यात येईल हे लक्षात घ्यावे. मग आम्ही आपला कोणताही कायदा मानणार नाही. या राज्यात मराठी भाषेची गळचेपी करणाऱ्याला क्षमा केली जाणार नाही हे लक्षात ठेवावे. आज मी पुन्हा एकदा सांगतो की, कारणे दाखवा नोटीसा मागे घेतल्या नाहीत तर त्याचे दूरगामी परिणामी होतील आणि त्याचे नेतृत्व आम्हाला करावे लागेल हे मी जाहीररित्या सांगतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, स्वयंअर्थसहाय्यित शाळा विधेयक मंजूर झाल्यानंतरचे हे पहिले वर्ष आहे. स्वयंअर्थसहाय्यित शाळा विधेयकाचा मसुदा तयार होताना आम्हाला स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ आणि विद्यापीठ कायद्याचा अनुभव होता. माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांना अशा प्रकारची परवानगी देताना, विधेयकात सुधारणा करण्यासाठी दोन वेळा सभागृहात यावे लागले. विधेयक संमत झाल्यानंतरचे हे पहिले वर्ष आहे. या विषयी अर्ज करण्याची, परवानगी देण्याची, एलओआय याची प्रोसजिर ठरवून त्याला कायद्याचे स्वरुप दिलेले आहे. वास्तविक पाहता हे पहिले वर्ष असल्यामुळे यामध्ये काही सवलती द्यावयास पाहिजे असा मी माननीय मंत्र्यांना आग्रह करीत होतो. किती तारखेपर्यंत अर्ज मागवाचे, किती तारखेपर्यंत शाळा सुरु करण्यासाठी पत्र द्यावयाचे आणि या बाबत किमान पहिल्या वर्षी तरी शिथिलता द्यावी असा आमचा आग्रह होता. परंतु तसे होऊ शकले नाही. परंतु आता मर्यादा दिल्यामुळे हे विधेयक आणावे लागले आहे. परंतु अजूनही स्वयंअर्थसहाय्यित शाळा विधेयकाची अनेक संस्था चालकांना माहिती नाही. अधिकाऱ्यांना सुध्दा माहिती नाही. हे विधेयक वेबसाईटवर असले तरी या विधेयकातील कलमे आणि त्या अनुषंगाने शासन जी परवानगी देणार आहे, त्या बाबतच्या धोरणांची अनेक संस्था चालकांना माहिती नाही. अनेक लोकांपर्यंत हे विधेयक पोहोचू शकले नाही.

महोदय, या विधेयकान्वये 15 मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. परंतु ही मुदतवाढ कमी आहे. या मुदतीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. मी आपल्याला ठाणे जिल्ह्याचे उदाहरण देतो. ठाणे जिल्ह्यात 294 संस्था चालकांनी शाळा सुरु करण्यासाठी चलनाद्वारे पैसे भरले आणि शिक्षणाधिकाऱ्यांची परवानगी घेतली. परंतु प्रत्यक्षात मुदतीमध्ये केवळ 236 संस्था चालकांचेच प्रस्ताव प्राप्त झाले. ज्यांनी चलन भरले त्यांचे प्रस्ताव तयार आहेत, परंतु ते प्रस्ताव कोणत्या ना कोणत्या कागदपत्रांअभावी प्राप्त होऊ शकले नाहीत. चलन भरुनही ते प्रस्ताव वेळेवर प्राप्त होत नाहीत. एका जिल्ह्यात जर 30-40 शाळा प्रस्ताव सादर करण्यापासून वंचित राहत असतील तर अन्य जिल्ह्यात सुध्दा या पेक्षा वेगळी परिस्थिती नसेल असे मला वाटते.

या विधेयकान्वये आपण सुधारणा करीत आहात. आपण अजून 15 दिवसांनी मुदत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

वाढविली तर विशेष फरक पडणार नाही. पहिल्या वर्षासाठी ज्यांना प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा सुरु करावयाच्या असतील त्यांना त्या सुरु करता येतील. कारण या शाळा सुरु करण्यासाठी शाळांना कोणतेही अनुदान द्यायचे नाही असे या विधेयकाचे धोरण आहे. शिवाय काही शाळांची दर्जावाढ करावयाची आहे. म्हणजेच इयत्ता चौथी पर्यंतच्या शाळेची 5 वी ते 8 वी पर्यंत, इयत्ता 10 वी पर्यंतच्या शाळांची कनिष्ठ महाविद्यालयांपर्यंत दर्जावाढ करण्यास परवानगी दिली जाणार आहे. मुळात दर्जावाढीचा अर्थ आमच्या अधिकाऱ्यांना कळलेला नाही. संस्था चालकांना सुध्दा त्याचा अर्थ कळलेला नाही. ही परिस्थिती लक्षात घेऊन ज्यांना शाळा सुरु करण्याची इच्छा आहे त्यांना संधी देण्याची आवश्यकता आहे. आज अनेक संस्था चालक स्वत:च्या ताकदीवर शाळा सुरु करण्यास इच्छुक आहेत. त्यांच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर आहे किंवा ते इन्फ्रास्ट्रक्चर उभे करतील. परंतु या शाळांमुळे शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा पडणार नाही. ज्या संस्था अशा प्रकारे स्वयंअर्थसहाय्यित शाळा सुरु करण्यास इच्छुक आहेत त्यांच्यासाठी मुदत वाढविली तर बरे होईल. आपण अगोदर मुदत वाढविली नसती तर प्रश्न आला नसता. परंतु आपण मुदत वाढविली आहे. माझी मागणी आहे की, ही मुदत 15 मार्च ऐवजी 15 एप्रिलपर्यंत वाढवावी, अशी मी विनंती करतो.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, हे विधेयक डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये संमत झाले होते परंतु आताच सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी ज्या भावना मांडल्या त्याच्याशी मी सहमत आहे. कारण यामध्ये सर्व पातळ्यांवर खूप वैचारिक गोंधळ झाला. खूप उशिरा नोटिफिकेशन निघाले आणि 15 मार्चची मुदत दिल्यामुळे अनेक लोकांचे प्रस्ताव देण्याचे राहिले होते. त्यांना प्रस्ताव देण्याची परवानगी मिळावी. ज्या मराठी शाळा पूर्वीपासून चालू आहेत त्या शाळा हे इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण करु शकणार नाहीत. त्यांच्यासाठी कशा पध्दतीने अपवाद करावयाचा याचा विचार केला पाहिजे. कारण काही शाळा दुर्गम भागामध्ये चालू आहेत, आदिवासी भागामध्ये चालू आहेत, झोपडपट्टयांमध्ये चालू आहेत त्या ठिकाणी जर आपण एक एकरची किंवा दोन एकरची अट घातली तर त्या शाळा ती अट कधीही पूर्ण करु शकणार नाहीत. हा एक मुद्दा शासनाने विचारात घ्यावा.

सभापती महोदय, आरटीईमध्ये अशी तरतूद आहे की ज्या अनधिकृत शाळा आहेत किंवा ज्या शाळांना मान्यता नाही अशा शाळा सुरु केल्यानंतर त्यांना तीन महिन्यांची मुदत देत असतो. तीन वर्षामध्ये त्यांनी परवानगी घ्यावयाची असते. त्या कलमाचा उपयोग करुन घेऊन ज्या शाळा या पूर्वी चालू झालेल्या आहेत त्यांचाही यामध्ये समावेश व्हावा. ज्या जुन्या शाळा चालू आहेत त्यांना ज्या अटी आहेत त्यातून सवलत द्यावी अशी सुधारणा या विधेयकामध्ये करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, या विधेयकाच्या कलम 9 मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, इंग्रजी माध्यम वगळून ज्या शाळा पाच वषापूर्वी स्थापित झालेल्या आहेत आणि ज्या शाळा आरटीईचे नॉर्म्स पूर्ण करीत असतील त्यांना काही कंसशन्स देऊन मान्यता देण्यात येईल. त्यामुळे कोणतीही नोटीस देण्याचा किंवा त्यांच्यावर प्रेशर आणण्याचा प्रश्नच यामध्ये राहात नाही. जर कोणत्या अधिकाऱ्यांनी अशी नोटीस पाठविली असेल त्या अधिकाऱ्याचे नाव जर आपण आमच्याकडे दिले तर त्याच्या बाबतीत त्यांना ताकीद देण्यात येईल.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पटपडताळणीच्या संदर्भात नोटीस दिल्याचे सांगितले.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ती नोटीस कशाच्या संदर्भात आहे याची माहिती घे्ण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छिते की, उप संचालकांच्या पातळीवरच हे अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे ते घेणार नाही. या विधेयकाखाली ज्या शाळा असतील त्याबाबत उप संचालकांकडे छाननीसाठी अर्ज मागविण्यात येतील. वेबसाईटवर ठेऊन लोकांच्या काही हरकती असतील, आक्षेप असतील तर ते मागविण्यात येतील. डायरेक्टर शिफारस करुन पाठवतील आणि शेवटी ते शासनाकडे येईल. त्यानंतर शासनाकडून त्यांना अंतिम मान्यता मिळेल. मान्यता म्हणजे आधी त्यांना लेटर ऑफ इन्टेन्ट देण्यात येईल. जर त्यांनी सर्व निकषांची पूर्तता केली तर त्यांना पत्र देण्यात येईल. जर एका दिवसात निकषांची पूर्तता करीत असतील तर त्यांना एका दिवसात पत्र देण्यात येईल पण 18 महिन्यांच्या कालावधीमध्ये फायनल मंजुरीच्या पूर्वी त्यांनी ते निकष पूर्ण केले पाहिजेत. मग त्यांना शिक्षण अधिकाऱ्यांकडून पत्र मिळेल. या पध्दतीची मान्यता शासनाकडून मिळाल्यानंतर शिक्षण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्यांना परवानगीचे पत्र मिळेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी कालावधी वाढविण्याबाबत सांगितले. त्यांनी सांगितले की, लोकांना समजत नाही, कन्फ्युजन आहे. 7108 अर्ज प्राप्त झालेले आहेत आणि प्रत्येक वर्षी अशी संधी आहे. आता एप्रिल पर्यंत मुदत वाढविली तर किती कालावधी राहणार आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान.....

एप्रिल महिन्यामध्ये ते अर्ज घेणे शक्य नाही. कारण जून महिन्यापासून शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यावर शाळा सुरु करणे गरजेचे आहे. अर्ज घेण्याचा कालावधी वाढविला तर त्या शाळा वेळेवर सुरु करता येणार नाहीत. शासनाकडे व्यापक प्रमाणात अर्ज आलेले आहेत. याचा अर्थ सर्वांना ही पध्दत समजलेली आहे. त्यांनी चांगल्या प्रकारे समजून शासनाकडे प्रस्ताव दाखल केलेले आहेत. यामध्ये मराठी माध्यमांच्या शाळांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे सभागृहाला मी विनंती करीत आहे की, हे विधेयक मंजूर करण्यात यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

<u>खंड-2, सन 2013 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 1 याच्या कलम 3 ची सुधारणा</u>

तालिका सभापती : खंड 2 ला सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सुधारणा सुचविलेली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"खंड 2

पृष्ठ क्रमांक 2 -

ओळ क्रमांक 8 मध्ये "15 मार्च, 2013" ऐवजी

"15 एप्रिल, 2013" हा मजकूर दाखल करण्यात यावा."

सुधारणा प्रस्तुत झाली.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा कालावधी वाढविणे शक्य नाही. कारण हा कालावधी जर 15 दिवसासाठी वाढविला तर 15 जूनपासून शाळा सुरु होऊ शकणार नाहीत. त्याच प्रमाणे 15 मे ची तारीख सुध्दा वाढेल. पुढील वर्षी 31 जानेवारी महिन्यापर्यंत नवीन प्रस्ताव देता येतील. प्रत्येक वर्षासाठी ही प्रक्रिया असणार आहे. या वर्षी 7 हजार प्रस्ताव आलेले आहेत. त्यापेक्षा अधिक प्रस्ताव स्वीकारणे शक्य होणार नाही. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, त्यांनी आपली सुधारणा मागे घ्यावी.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, किती अर्ज यावे व कोणी अर्ज करावे हा त्या शाळांचा व संस्था चालकांचा प्रश्न आहे. शासनाने सर्वांसाठी ही पध्दत अनुसरलेली आहे. त्यासाठी शासनाला एक पैसाही द्यावयाचा नाही. त्या शाळांचा सर्व खर्च त्या संस्थांनी करावयाचा आहे. शासनाचा बोजा कमी करण्यासाठी या संस्था पुढे येत आहेत आणि शासनाचेच काम करीत आहेत. स्वत:च्या ताकदीवर पुढे येत आहेत. मुदत संपलेली असताना शासनाने 31 जानेवारी ऐवजी 15 मार्च, 2013 पर्यंत मुदत वाढविलेली आहे. 15 मार्च ही तारीख उलटून 10 दिवस होऊन गेलेले आहेत. हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी येऊ शकले नाही. आज हे विधेयक चर्चेसाठी आलेले आहे. म्हणून ही मुदत 15 एप्रिल, 2013 पर्यंत वाढविण्यामध्ये शासनाला काही अडचण असेल असे मला वाटत नाही. अनेक चांगल्या संस्था आहेत. त्या संस्थांकडे इन्फ्रास्ट्रक्चर आहे. शाळा सुरु करण्याची त्यांची इच्छा आहे. त्यांच्याकडे आर्थिक पाठबळ आहे. अशा संस्थांना या वर्षी परिघापासून व परवानगीपासून वंचित ठेवणे बरोबर होणार नाही. त्यामुळे त्यांना शेवटची संधी द्यावी. 15 एप्रिल, 2013 पर्यंत ज्यांचे अर्ज येतील त्यांना शासनाने परवानगी देणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेले अर्ज घेण्यात येऊ नये. एवढेच मी या सुधारणेच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्या प्रमाणे कालावधी वाढविणे शक्य होणार नाही. कारण 7 हजार अर्जांची बारकाईने छाननी करावयाची आहे. नवीन शाळांकडे इन्फ्रास्ट्रक्चर असले म्हणजे सर्व झाले असे नाही. या शाळांकडे जमीन आहे की नाही, इमारत आहे की नाही एवढेच तपासावयाचे नाही. या शाळांकडे दर्जा सुध्दा असावयास पाहिजे. त्यासाठी छाननी बारकाईने करावी लागेल. यामध्ये शाळांची भरमसाठ वाढ व्हावी असे अभिप्रेत नाही. कोणीही शाळा सुरु करु शकतो त्याचा अर्थ असा नाही की, इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली तर त्यांना कसेही शिक्षक नेमता येतील. शाळा सुरु करीत असताना त्या दर्जाचे शिक्षक उपलब्ध झाले पाहिजेत.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

प्रा. फौजिया खान...

त्या पध्दतीची व्यवस्था त्या शाळेत असली पाहिजे असे अनेक विषय आहेत. छाननीच्या कामासाठी प्रशासकीय कामासाठी वेळ मिळणे आवश्यक आहे. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करते की त्यांनी आपल्या सुधारणेचा आग्रह धरु नये. 31 जानेवारी पर्यन्त नवीन अर्ज देण्याची सर्वांना मुभा आहे.

श्री. रामनाथ मोते : मी माननीय मंत्री महोदयांना पुनश्च विनंती करतो. सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. अर्ज घेण्याची मुदत 15 एप्रिल पर्यन्त वाढविली तरी काही हरकत नाही. ही मुदत 31 मार्च पर्यन्त करावी अशी माझी सूचना होती. परंतु 31 मार्च पर्यन्त हे विधेयक चर्चेला येऊ शकले नाही. त्यामुळे मला दुसरी सुधारणा द्यावी लागली. ही मुदत 15 एप्रिल पर्यंत केल्यामुळे काहीही फरक पडणार नाही. शिक्षण क्षेत्रातील अनुभव लक्षात घेता मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करत होतो की, पहिल्या वर्षासाठी या तरतुदी विधेयकामध्ये टाकू नका. शासनाकडे हे अधिकार ठेवावेत. कारण या वर्षी शाळा सुरु करण्यासाठी पडताळणीच्या अनुषंगाने आपल्याला तो निर्णय घेता येईल. अनेक संस्थांना यासंबंधीची माहिती पोहोचलेली नाही. त्यांच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे, पैसे तयार आहेत. त्यांची दोन वर्षे पुढे जातील. ही अर्ज घेण्याची मुदत 15 एप्रिल पर्यंत करावी अशी माझी विनंती आहे.

श्रीमती फौजिया खान : ज्या सतर्क आहेत अशा 7 हजार संस्थांनी प्रस्ताव दिलेले आहेत. ज्या संस्था सतर्क नाहीत त्यांनी आपले प्रस्ताव सादर केलेले नाहीत. त्यांचे प्रस्ताव आता कसे घ्यायचे असा प्रश्न निर्माण होतो. 31 जानेवारी पर्यन्त त्यांचे प्रस्ताव आले तर पुढील शैक्षणिक वर्षापासून त्यांना परवानगी देता येईल.

श्री. रामनाथ मोते : माझी कोणतीही संस्था नाही. तसेच मी कोणताही अर्ज केलेला नाही. मला स्वत:ला शाळा नको आहे. ज्या संस्थांना शाळा सुरु करायच्या आहेत त्यांच्यासाठी मी ही सुधारणा पोटतिडिकेने मांडत आहे. ज्या शाळा नव्याने सुरु हाणार नाहीत, ज्या शाळा सुरु आहेत पण त्यांना शासनाची मान्यता नाही अशा शाळा देखील स्वयंअर्थसहाय्यितमध्ये आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे शासनाने त्या शाळांवर कारवाई सुरु केली. त्यांच्यावर दंडाची आकारणी केली, फौजदारी कारवाई केली. दुस-या बाजूला आपण त्यांना परवानगीसाठी संधी नाकारणे बरोबर नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

आदरणीय मंत्री महोदयांचा मान ठेवून मी माझी सूचना मागे घेईन. परंतु माझी त्यांना एक विनंती आहे आणि त्याबाबतीत त्यांनी निर्णय घ्यावयाचा आहे. ज्या शाळा शासनाच्या परवानगी विना सुरु आहेत त्याना परवानगी मिळण्यासाठी स्वयंअर्थसहाय्यितमध्ये यावयाचे आहे. त्या शाळांना शासनाचे अनुदान नको. त्यांना फक्त शासनाची परवानगी हवी आहे आणि ती देखील स्वयंअर्थसहाय्यितमध्ये हवी आहे. माहिती वेळेवर न पोहोचल्यामुळे, अन्य काही अडचणीमुळे त्यांना अर्ज करता आलेले नाही. शासनाने बृहतआराखडया नुसार देखील प्रस्ताव मागविलेले आहेत. त्यामध्येही त्यांचा गोंधळ झालेला आहे. काहीनी बृहत आराखडयामध्ये अर्ज केलेले आहेत. ते अर्ज टिकणार नाहीत. ज्या संस्था आता सुरु आहेत त्यांच्यावर कोणतीही फौजदारी कारवाई होणार नाही असे मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे. मी माझी सूचना मागे घेतो.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

प्रा.फौजिया खान : महोदय, सेक्शन-9 मध्ये या संदर्भातील रिलॅक्सेशन ठेवलेले आहे. रिलॅक्सेशन ठेवलेले असल्यामुळे याचा प्रश्नच येत नाही. सन्माननीय सदस्य जे म्हणतात ते शक्य नाही. असे केल्यास एकप्रकारे शिस्त बिघडविण्यास सुरुवात होईल. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, त्यांनी कृपया आपली सुधारणा मागे घ्यावी.

श्री.रामनाथ मोते : महोदय, मी माझी सुधारणा मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने सुधारणा मागे घेण्यात आली.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 3 ते 5 (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक-1 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2013 वि.प.वि.क्रमांक 1 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :जायकवाडी धरणाच्या संकल्पित साठयापेक्षा कमी पाणी धरणात आल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती

मु.शी. :जायकवाडी धरणाच्या संकल्पित साठयापेक्षा कमी पाणी धरणात आल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती या विषयावर सर्वश्री. हेमंत टकले, सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. एम.एम.शेख, अब्दुल्ला खान दुर्राणी, विक्रम काळे, कपिल पाटील, विनायकराव मेटे, राणा जगजितसिंह पाटील, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मांजरा खोऱ्यातील मसलगा खोऱ्याच्या संदर्भात मी आज सकाळी बोलत होतो. मसलगा मध्यम प्रकल्प १९९२ मध्ये पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी योग्य प्रमाणात पाणी साठू लागले होते. २००१-२००२ मध्ये १३५९९ टीएमसी पाणी जमा होत होते व आजही त्या धरणात तेवढेच पाणी जमा होत आहे. वितरण कमी होत असतांना या ठिकाणचे पाणी कालव्यातून एकदाच सोडले गेले आहे. भ्रष्टाचारामधून निर्माण झालेले या ठिकाणचे ६-७ कि.मी. चे कालवे पहिल्याच पाण्यात कोसळल्यामुळे त्या कालव्यातून आजपर्यंत एकदाही पाणी सोडले गेले नाही. अशा पध्दतीने कामे होत असतील तर ते चांगले नाही. धरण आहे, धरणात पाणी आहे, कालवे आहेत परंतु हे कालव्यातून पहिल्यांदाच पाणी सोडल्याबरोबर हे कालवे कोसळले गेले. सन २००४ नंतर या कालव्यातून एकदाही पाणी सोडता आलेले नाही. असलेल्या पाण्याचा उपयोग शेती करता होत नसेल तर मराठवाडयाला दुष्काळाला सामोरे जावेच लागणार आहे. मराठवाडयाला दुष्काळाच्या खाईत लोटण्याचा मार्ग आपणच निर्माण केलेला आहे.

महोदय, यासंदर्भात तेथे जाऊन अधिकाऱ्यांना विचारले असता अधिकाऱ्यांनी सांगितले की, आमचे धरण व्यवस्थित झालेले आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ गितेनंतर 16:45

श्री.दिवाकर रावते.....

पाणी का जात नाही? ते म्हणाले, कालव्याचा प्रश्न आमचा नाही. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना फोन केला आणि त्यांच्याशी चर्चा केली. ते म्हणाले, कालवे त्यांच्या ताब्यात आम्ही त्याच क्षणी देऊन टाकले आहेत. कालवे ताब्यात घेत असताना त्यांनी पूर्ण तपासणी करुन घ्यायची असते. अशा प्रकारे अधिकारी एकमेकावर जबाबदारी टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. शेतीला पाणी जात नाही. धरण आहे, पाणी आहे परंतु भ्रष्टाचारामुळे कालवे कोसळले जात असतील तर आणि अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असतील तर मराठवाड्यातील पाणी समस्या सुटणार कशी?

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असेल, शेतीच्या पाण्याचा प्रश्न असेल, माझ्याकडे चितळे समितीचा अहवाल आहे. चितळे समितीकडे हा विषय गेला होता. त्याची प्रत माझ्याकडे आहे. मला दुर्दैवाने सांगावे लागते की, 2001-02 साली कालव्याची लांबी कपात व कालवे गाळाने भरलेले आहेत, नादुरुस्त व बांधकाम पडलेले असा तपशीलातील शेरा आहे. 2011-12 या वर्षी तोच शेरा नमूद केलेला आहे. म्हणजे दहा वर्षे अधिकारी या प्रश्नाकडे लक्ष देत नसतील तर अधिकारी काय काम करतात याचा लेखाजोखा कधी घेणार आहात की नाही? संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार का?

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राम पंडागळे आता सभागृहात उपस्थित नाहीत. काल त्यांनी भाषण करताना अनेकदा 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असा उद्घोष चालू ठेवला होता. हा उद्घोष करुन त्यांनी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे इतक्या वेळा पाय चेपले की त्यांना घरी जाऊन मसाज करुन घ्यावा लागला असेल. माननीय उप मुख्यमंत्र्यांना त्यांनी छत्रपतींच्या रांगेत नेऊन बसविले. बोले तैसा चाले.....बोले तैसा चाले.....सतत दादांच्या पाऊलांचे वर्णन करण्याचा ते प्रयत्न करीत होते. मी एक उदाहरण देतो. मंत्री म्हणून काम करीत असताना तुमचे आदेश खालच्या स्तरावरील अधिकारी अंमलात आणत नाहीत याचे दु:ख वाटते. जबाबदारी प्रमुखांना घ्यावी लागते. नाकर्त्या अधिकाऱ्यांची जबाबदारी मंत्र्यांना स्वीकारावी लागते. मराठवाडा पाण्याच्या समस्येने बेजार झालेला आहे, विदर्भ आणि खानदेशाला पाणी मिळत नसेल तर आणि त्यासाठी धोरण आखल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचे काम अधिकाऱ्यांवर येऊन पडते. ते जर आदेश अंमलात आणत नसतील तर तुमचा त्यांच्यावर वचक नाही असा त्याचा अर्थ होतो. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ गितेनंतर 16:45

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, जालना जिल्हयामध्ये तीव्र दुष्काळ आहे. जालना येथे डिसेंबर, 2007 मध्ये जलसंपदा मंत्री या नात्याने माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अंबड तालुक्यातील चिंचखेड व कासारवाडी साठवण तलावाचे भुमीपूजन केले. 39 हेक्टर जमीन संबंधित शेतकऱ्यांची अधिग्रहित करण्यात आली. अधिग्रहित केलेल्या जमिनीचा मोबदला आजपर्यंत मिळाला का? फक्त 45 लाख रुपये मोबदल्याच्या स्वरुपात दिले गेले. उर्वरित रक्कम मार्च, 2013 पर्यंत दिलेली नाही. पाठपुरावा केला जात आहे, परंतु अधिकारी लक्ष देत नाहीत. कासारवाडी साठवण तलावाच्या कामाकरिता रु.4.93 लाख एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी भाषणात जाहीर केले. बोले तैसा चाले.....मी भुमीपूजन करीत आहे. दोन्ही साठवण तलावांची कामे 24 महिन्यात म्हणजे दोन वर्षात पूर्ण होऊन शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ मिळेल हा माझा शब्द आहे. त्यांनी जाहीर भाषणात दिलेला शब्द होता. बोले तैसा चाले.....लोकांना आदर वाटला. डिसेंबर, 2009 पर्यंत आपल्याला पाणी मिळेल, साठवण तलावाची कामे पूर्ण होतील. ज्यांची जमीन संपादित केली गेली त्यांना अद्याप पूर्ण पैसे मिळालेले नाहीत.

मी 2013 च्या एप्रिल महिन्यात भाषण करण्यासाठी उभा आहे. या कामावर आतापर्यंत रु.3,63,90,000/- एवढी रक्कम खर्च झाली आहे. दोन्ही साठवण तलावांची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे तत्कालीन जलसंपदा मंत्री आणि सध्याचे उप मुख्यमंत्री यांनी दिलेला शब्द न पाळल्यामुळे जालना जिल्हयाला तीव्र दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. ही दोन्ही तलावांची कामे पूर्ण झाली असती तर आज जनावरांना पिण्याचे पाणी मिळाले असते, शेतीचे सिंचन वाढले असते. परंतु तसे झालेले नाही. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. त्यांच्या पावलांना वंदन करण्याची संधी न देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करणार आहात?

नंतर 3यू.1...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, परळी विद्युत केंद्रातून 500 मे.वॅ.ची वीज निर्मिती होत होती. पण हे विद्युत केंद्र आता बंद पडले आहे. जुलै नंतर या वीज केंद्रातून वीज निर्मिती सुरू होणार आहे. महाराष्ट्राचे हक्काचे 500 मे.वॅ.वीज उत्पादन बंद पडल्यामुळे खेड्यांमध्ये अंधार पडला आहे. त्यामुळे आज खेड्यांमध्ये लोडशेडींग होत आहे. काल मला माननीय मंत्री श्री.अजित पवार अत्यंत केविलवाणी वाटले. गेल्या वर्षी छातीवर हात ठेवून ते सांगायचे की, होय डिसेंबर 2012 पर्यंत आम्ही राज्य भार नियमन मुक्त करणार. तेव्हा सगळे म्हणायचे की, बोले तैसा चाले..... पण राज्य भार नियमन मुक्त झाले नाही. काल माननीय मंत्री श्री.अजित पवार उत्तर देताना म्हणाले की, भविष्यामध्ये लोडशेडींग कमी करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. या सभागृहामध्ये शरणागती पत्करल्याप्रमाणे वाक्य त्यांना उच्चारावे लागले आहे.

काल-परवा जी सुट्टी होती त्या कालावधीत मी स्वत: प्रकल्पांवर गेलो होतो. वीज पुरवठा कोणत्या तारखांना बंद झाला व त्यामुळे किती नुकसान झाले हे देखील मी आपणास सांगू इच्छितो. पाण्याच्या कमतरतेमुळे दिनांक 13.2.2013 रोजी एकूण 3 संच बंद पडले होते. दिनांक 28.11.2012 रोजी 4 संच बंद पडले होते. दिनांक 14.2.2013 रोजी एकूण 5 संच बंद पडले होते. दिनांक 25.1.2013 रोजी एकूण 6 संच बंद पडले. शेवटी दिनांक 17.2.2013 रोजी एकूण 7 संच बंद पडले. हे संच पाणी नसल्यामुळे बंद पडले आहेत. आपले मुदगलचे देखील पाणी गेले आहे. भविष्यात पाणी न मिळाल्यामुळे औष्णिक केंद्राचे संच बंद पडले. मुदगलचे पाणी आपण सोडले होते. ते देखील आपल्या उपयोगी पडलेले नाही.

सभापती महोदय, परळी औष्णिक विद्युत केंद्र दिनांक 18.1.2013 ते 17.2.2013 पर्यंत सुरू होते. या काळात 220.680 दशलक्ष एवढी वीज निर्मिती झाली. त्यानंतरची वीज निर्मिती थांबली. आता दुरूस्तीचे काम सुरू आहे.

आता कोळसा मनमाड येथे गेला आहे. यांच्याकडे 2200 कामगार मजूर आहेत. तसेच 1557 कर्मचारी होते. त्यापैकी 95 कर्मचारी तेथे गेले आहेत. उर्वरित कर्मचारी बिनकामाचा पगार घेत बसलेले आहेत. कारण ते सेवेत कायम आहेत. येथे 2200 रोजंदारीवर मजूर होते. त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

हाताला आज काम नाही. काल आमच्या शिवसेनच्या जिल्हाप्रमुखांनी त्यांची एक महिन्याच्या जेवणाची व्यवस्था केली आहे. एका बाजूल चारा छावणी आहे. त्यासाठी गवत पुरवावे लागते. दुसऱ्या बाजूला पिण्याचे पाणी मिळण्यासाठी शासनाशी झुंजावे लागत आहे. जमत असेल तर आम्हाला देखील पाणी द्यावे लागत आहे. पाण्या अभावी शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. त्यामुळे तो धायमोकलून रडत आहे. आज 2200 मजुरांच्या हाताला काम नाही. त्यामुळे त्यांच्या अन्नधान्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तो देखील मिटवायचा आहे. अशा प्रकारे विदीर्ण अवस्था एका परळीच्या विद्युत केंद्रामुळे झाली आहे.

मी माजलगावला देखील गेलो होतो. तेथून आपण पाणी का घेतले नाही ? मंत्री महोदय, आपण सांगत होता की, 19 टीएमसी पाणी सोडले आहे. वरच्या धरणातून 1 ऑगस्ट रोजी जायकवाडीसाठी पाणी सोडले जाते. तेव्हा पाऊस पडत असतो, धरणे भरत असतात. त्यावेळी सर्व ठिकाणी पाणी पडत असल्यामुळे 80 टक्के पाणी जायकवाडीमध्ये येते. काल आपण पाणी सोडल्यानंतर फार आरडाओरड झाली. त्यासंबंधी मी सभागृहात बोललो. आपण मराठवाड्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले. पाण्यासाठी तडफडणाऱ्या मुक्या जनावरांचा आपण अनादर केला. आज संपूर्ण देशभरात दुष्काळाची चर्चा सुरू असताना राज्यातील माननीय मंत्री मात्र मराठवाड्याला पाणी मिळू नये म्हणून कंबर कसून उभे राहतात. त्यामुळे आम्ही कुठल्या राज्यकर्त्यांकडे पहायचे. या गोष्टीचे मला वाईट वाटले. माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात हे संभाजीनगरचे पालकमंत्री आहेत. या दुष्काळाला तोंड देताना आपण पालकत्व स्वीकारून बोलले पाहिजे. एक वेळ माझ्या भागातील शेती थांबली तरी चालेल असा विचार केला पाहिजे. मराठवाडा हा महाराष्ट्रात आहे. तेथील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळाले पाहिजे असा विचार आपण केला पाहिजे. उलट त्यांनी सांगितले की, परतीचा पाऊस आला की, पाणी कसे द्यायचे ते पाहू. माननीय पालकमंत्री असे बोलत असल्यामुळे त्यांना पालकमंत्री पदी का ठेवले आहे असा प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

ज्यांना पालकत्व पार पाडता येत नाही त्यांना नैतिकदृष्टया पालकमंत्री म्हणून राहण्याचा अधिकार नाही.

सभापती महोदय, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री आहेत. त्यांनी सांगितले की, पाणी सोडल्यास राजीनामा देईन. मराठवाड्याच्या पिण्याच्या पाण्याकरिता मंत्री राजीनामा देण्याच्या घोषणा करतात हे योग्य वाटत नाही. या प्रकरणामध्ये नंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मध्यस्थी केली. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब यांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्यासाठी तडजोड करु नका, एक वेळ शेतीला पाणी मिळाले नाही तरी चालेल, परंतु पिण्यासाठी पाणी सोडा". मग त्या ठिकाणी पाणी आले, परंतु ते सुध्दा पूर्ण स्वरुपात आले नाही. त्या पाण्याचा उपयोगही झाला नाही. हे पाणी वेळेवर मिळाले असते आणि त्यातील चार टीएमसी पाणी उजव्या कालव्यातून माजलगावमध्ये सोडले असते तर ते पाणी परळीला जाऊन तेथील औष्णिक विद्युत केंद्र जुलै महिन्यापर्यंत नक्कीच चालू राहिले असते. फार फार दीड ते दोन टीएमसी पाण्यावर त्यांच्या दोन फेऱ्या होतात. परंतु वेळेवर पाणी न सोडल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा संघर्ष निर्माण झाला परंतु त्याच वेळेला एक औष्णिक केंद्र बंद पडले. त्यामुळे 500 मेगावॅट वीज निर्मिती बंद पडून महाराष्ट्राच्या अंधारामध्ये भर टाकण्याचे काम केले. नियोजनाच्या अभावामुळे मराठवाड्यातील वीज निर्मिती बंद पडली. मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. मग सरकारला रेल्वेने पाणी वा अन्य मार्गाने पाणी आणण्यासाठी कसरती कराव्या लागल्या. आपल्याच मंत्रिमंडळातील मंत्री महोदयांनी असा आडवा धोंड टाकल्यानंतर ही परिस्थिती निर्माण झाली त्याची व्यथा मी येथे मांडत आहे. तेव्हा या संदर्भात आपण कोणास जबाबदार धरणार आहात असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मराठवाड्याचा अनुशेष हा महत्वाचा भाग आहे. मराठवाड्याच्या वाट्याचे 25 टीएमसी पाणी केव्हा आणि कसे देणार आहात ? आपण आम्हाला सांगितले की, भीमा उपसा सिंचन झाल्यानंतर आपणास पाणी देण्यात येईल. परंतु हे काम होण्यासाठी किती आडकाठी आहे हे आपणास माहीत आहे. तो प्रकल्प आणखी पंधरा-वीस वर्षे होईल असे दिसत नाही. हा प्रकल्प पूर्ण होणार नसेल तर मराठवाड्याला पाणी कसे मिळेल हा प्रश्न आमच्यासमोर आहे. आपण या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सर्व प्रश्नांतून मार्ग कसा काढणार आहात ? मराठवाड्यातील आमदार माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे जाणार आणि सांगणार की, आमचे 25 टीएमसी पाणी आम्हाला द्यावे.

सभापती महोदय, मी अत्यंत जबाबदारीने सभागृहापुढे एक प्रश्न मांडतो. कृष्णा खोरे लवाद झाला. त्या संदर्भात अपील केले किंवा कसे ते मला माहीत नाही. त्या दिवशी सांगण्यात आले की, 31 मार्च रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत अपील जाणार आहे. कृष्णा खोरे लवादामध्ये आपणास कमी पाणी मिळाले. आपणास जास्त पाणी मिळाले असते तर आमच्या मराठवाड्यात एक-दोन टीएमसी पाणी वाढले असते.

सभापती महोदय, सन 1970 मध्ये कृष्णा खोरे करार झाला. त्या करारामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, हे पाणी खोऱ्याला देताना जो अवर्षण प्रवण भाग असेल त्या भागात योजना राबवून प्रथम तेथे पाणी द्यायचे आणि मग इतर भागामध्ये पाणी द्यायचे. परंतु या कराराच्या उलटे काम झालेले आहे. कृष्णा खोरेचे पाणी आल्यानंतर सांगली तालुक्यातील माण,खटाव या दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये प्रथम पाणी पोहोचले पाहिजे होते. मराठवाड्यातील बीड आणि धाराशीव व लातूरचा काही भाग या ठिकाणी 25 टीएमसीचे पाणी द्यायला पाहिजे होते. परंतु आपण तेथे पाणी नेले नाही. करारामध्ये स्पष्ट उल्लेख असताना त्या कराराचा भंग केल्याचे पाप आमच्या भागातील सर्व शेतकऱ्यांना व नागरिकांना भोगावे लागत आहे. ही कोणी चूक केली, करारामध्ये अटी असताना त्या अटी कोणी मोडल्या ?

सभापती महोदय, आंध प्रदेशला जास्त पाणी गेले. ज्या खोऱ्यामध्ये पाणी आहे परंतु इतर खोऱ्यामध्ये अवर्षण प्रवण भाग असेल त्या भागात पाणी नेले तर त्याचा विचार होईल. या करारातील अटींचा आंध्र प्रदेश राज्याने फायदा घेतला आणि त्यांनी जास्तीत जास्त 40-50 टक्के पाणी अवर्षण प्रवण खोऱ्यामध्ये वळवले. त्यामुळे त्यांचे म्हणणे मान्य झाले आणि त्यास लवादाने मान्यता दिली. त्या ठिकाणी असलेल्या पाण्याचा तुटवडा लक्षात घेऊन जास्त पाणी दिले. आम्हाला आहे ते पाणी अडविता आले नाही आणि आता अतिरिक्त पाणी कृष्णा भीमेतून उलटे आणून ते उजनी धरणात सोडणार आहात. मग सोलापूरकरांचा प्रश्न निर्माण होईल. तेव्हा मराठवाड्यास पाणी कधी व कसे मिळणार ? मराठवाडा आणखी 25 वर्षे उदास राहणार ही व्यथा घेऊन मी हे सर्व मांडत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री.दिवाकर रावते....

ही पक्षीय भूमिका नाही किंवा विरोधासाठी विरोध नाही. महोदय, मराठवाड्यातील आक्रोश या सदनात मांडण्याची कधी संधी मिळाली नव्हती. सत्ताधारी पक्षाने हा प्रस्ताव मांडल्यामुळे मराठवाड्यातील आक्रोश मांडण्याची संधी मिळाली आहे. हा प्रस्ताव आणल्याबद्दल मी सत्तारुढ पक्षातील सदस्यांना मनापासून धन्यवाद देतो.

महोदय, मंगळवारी सत्तारुढ पक्षाच्या वतीने प्रस्ताव मांडला जातो. सरकारने एका एका योजनेतून केलेले चांगले काम आणि सरकारने केलेल्या कामाचे कौतुक करण्याबाबतचा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाच्या वतीने मांडण्यात येतो. विरोधी पक्षाकडून सरकारच्या उणिवा दाखविणारा प्रस्ताव मांडला जातो. या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सत्तारुढ पक्षाने दुष्काळावरील प्रस्ताव मांडला, दुसऱ्या आठवड्यात महिलांवरील अत्याचाराचा प्रस्ताव मांडला, या आठवड्यात पाण्याच्या प्रश्नाबाबतचा प्रस्ताव मांडला आहे. आमचे शासन किती नाकर्ते आहे हे तुम्हीच दाखवून दिले आहे. मुळात जे प्रश्न विरोधी पक्षाने मांडायचे असतात ते प्रश्न सत्तारुढ पक्ष मांडू लागले आहे. तुम्हाला वाटते की, विरोधी पक्षाचे सर्व प्रस्ताव मांडले की, त्यांचे हत्यार निघून जाईल. मी तुम्हाला सांगतो की, आमचे हत्यार निघून जात नाही. जर सत्तारुढ पक्षच स्वत:चे कपडे फाडत असेल तर आम्ही तुम्हाला कशाला अडविणार ? सत्तारुढ पक्षाकडूनच आमचे मंत्री कसे आहेत, आमचे सरकार कसे आहे, आमच्या सरकारचा कारभार कसा आहे, सरकारच्या योजना बाराच्या भावात कशा चालल्या आहेत हे सांगितले जात असेल तर आम्ही खरोखरच तुमचे स्वागत करतो. या सरकारला सत्तेवर राहण्याची संधी नाही हे तुम्हीच जाहीर करीत आहात.

महोदय, आदरणीय श्री.अजित पवार यांचे या सभागृहातील कालचे अर्थसंकल्पाच्या सर्वसाधारण चर्चेवरील भाषण हे अर्थमंत्री म्हणून शेवटचे भाषण होते हे मी अधिकृतपणे सांगतो. कारण पुढील वर्षी निवडणुकीची आचारसंहिता असेल. त्यामुळे अर्थसंकल्प मांडता येणार नाही. जून महिन्यात पुन्हा विधानसभेच्या निवडणुका असतील. त्यामुळे या वर्षी जे द्यायचेच नाही ते भरभरुन दिले. शिवाय माननीय दादा मुख्यमंत्री होणार असल्यामुळे त्यांचे अर्थ मंत्री या नात्याने कालचे शेवटचे अधिकृत भाषण होते असे समजा. ते मुख्यमंत्री होतील की नाही हा पुढचा भाग आहे. मी सत्तारुढ पक्षातील सदस्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही उभे राहून काही बोलू नका. जे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ओरिजीनल असतात ते उठत नाहीत. या ठिकाणी आपण एवढा बाटगेपणा दाखविता कामा नये. माननीय अर्थ मंत्र्यांनी त्यांच्या शेवटच्या भाषणातून सुध्दा आम्हाला काही दिले नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 'बाटगेपणा' असा शब्दप्रयोग केला आहे. माझी विनंती आहे की,...

श्री.दिवाकर रावते : महोदय, स्थलांतरित हा उपरा असतो. सन्माननीय सदस्यांची हरकत असेल तर मी शब्द मागे घेतो. मी आता तुम्हाला सभ्य भाषेत सांगतो.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते नेहमीच चांगले बोलतात. त्यांच्या भाषणातून नेहमी काही तरी घेण्यासारखे असते. कालचे भाषण माननीय अर्थ मंत्र्यांचे शेवटचे अधिकृत भाषण होते असे ते म्हणाले. परंतु ते चुकीचे आहे. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी सभागृहात आणि सभागृहाबाहेर ज्या घोषणा केल्या होत्या त्या घोषणा त्यांनी अर्थसंकल्पातून तंतोतत पूर्ण केल्या आहेत. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा 200 रुपयांवरुन 500 कोटी रुपये करण्यात आली आहे. म्हणूनच मी म्हणतो की, बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले. मी पुन्हा एकदा सांगतो की, माननीय श्री.अजितदादा पवार यांचे कालचे भाषण शेवटचे नव्हते. पुढच्या वेळी ते मुख्यमंत्री म्हणून सभागृहात येतील आणि श्री.रावते साहेब तुम्हाला विरोधी पक्षाचे काम करावे लागेल. हाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती : त्यांचे शेवटचे भाषण होते, हे वाक्य कामकाजातून काढून टाकावे.

श्री.दिवाकर रावते : महोदय, वैधानिक पध्दतीतील सन्माननीय सदस्यांना कळत नसेल तर मी काय करणार ? अर्थमंत्री म्हणून श्री.अजित पवार यांचे कालचे भाषण शेवटचे होते. कारण पुढे त्यांना अर्थसंकल्प मांडता येणार नाही.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

बोले तैसा चाले... सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी असे म्हटले होते की, मी डिसेंबरपर्यंत महाराष्ट्र लोड शेडींग मुक्त करीन. पण ते झाले नाही. बोले तैसा चाले..मी त्या विषयामध्ये जात नाही. सन्माननीय सदस्यांनी एवढे मनाला लावून घेऊ नये.

सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, आता या महाराष्ट्रातील परिस्थिती फार गंभीर आहे. जेव्हा संधी असेल तेव्हा जर आपण निर्बंध आणले तर ते लोक स्वीकारतात. या सभागृहामध्ये सर्वांनी चिंता व्यक्त केलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केलेली आहे. या महाराष्ट्रामध्ये किमान पाच वर्षाकरिता तरी बोअरवेल म्हणजेच कुपनलिका खणण्यावर बंदी घालावी. त्या संदर्भातील सर्व यंत्रणा महाराष्ट्रातून हद्दपार करावी. या ठिकाणी एकही नवीन बोअरवेल निर्माण होता कामा नये. ज्या बोअरवेल आहेत त्यांचे पुनर्भरण करा. ज्या बोअरवेल आहेत त्याच वापरा परंतु नवीन बोअरवेल खणण्याचे थांबवावे. आता या जमिनीखालील पाणी उपसणे बंद झाले पाहिजे. कुपनलिकेचे पुनर्भरण करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ते प्रोत्साहन ग्रामपंचायत पातळीपर्यंत द्यावे. त्यासाठी अनुदान देता आले तर पुन्हा पाणी निर्माण करण्याची वेगळी चांगली क्षमता निर्माण होईल. त्यामध्ये भ्रष्टाचार निर्माण होणार नाही याची काळजी घेतली आणि पुनर्भरणाचा वेगळा अनुदानित कार्यक्रम केला तर फार बरे होईल.

सभापती महोदय, ठिबक सिंचनाकरिता बिनव्याजी दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन दिले तर आणि ते कर्ज जर लोकांना मिळाले तर शेतकरी मोठ्या प्रमाणावर ठिबक सिंचनाकडे वळतील आणि कमी पाण्यामध्ये उत्तम शेतकरी म्हणून ते जगण्याचा प्रयत्न करतील. शेवटी नसलेल्या पाण्याकरिता नियोजन करणे हा महत्वाचा भाग आहे. आपल्याला वीज निर्मितीकरिता किंवा इतर प्रकल्पाकरिता जसे कार्बन क्रेडीट मिळते त्या पध्दतीने पाणी वापरण्यामध्ये जी बचत होईल अशा बचत करणाऱ्या सहकारी पाणी वाटप संस्थांना बक्षीस म्हणून अनुदान द्यावे अशा प्रकारच्या ठोस सूचना मी शासनाला करीत आहे. आमच्या मराठवाड्यामध्ये सहकारी पाणी वाटप संस्था भरपूर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आहेत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाणी वाटप संस्था आहेत. विदर्भामध्ये अशा संस्था नगण्य आहेत. अशा पाणी वाटप संस्थांना जर आपण प्रोत्साहित केले, जर आपण लोकांना प्रोत्साहित केले तर भविष्यामध्ये पाण्याचा वापर नियंत्रित होईल. पण बोअरवेलच्या बाबतीत शासनाने खास निर्णय घ्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी या प्रस्तावावर बोलत असताना बरीच आकडेवारी दिलेली आहे तसेच सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी अभ्यासपूर्ण भाषणे केलेली आहेत. मी फक्त मराठवाड्यातील जनतेच्या ज्या काही अपेक्षा आहेत त्या संदर्भातील काही मुद्दे मांडतो आणि त्या संदर्भात शासनाकडून अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी तरुण, तडफदार पाटबंधारे मंत्री आहेत. मी माननीय श्री. सुनील तटकरे साहेबांना सांगू इच्छितो की, आपण टिकेकडे लक्ष देऊ नका. कारण काम करणाऱ्या माणसावरच टिका होत असते. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भात सांगितले. मराठवाड्यामध्ये धरणे होत नव्हती कारण पाणी प्रमाणपत्र नव्हते. इतकी वर्षे झगडून आमचे नेते श्री. तटकरे साहेबांनी हे पाणी दिले. परंतु माननीय राज्यपालांनी निर्बंध घातले. आता मराठवाड्यामध्ये या 18 टीएमसी पाण्यामध्ये एकूण 263 योजना होणार आहेत. या ठिकाणी बीड जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे, प्रा. सुरेश नवले तसेच श्री. अमरसिंह पंडित हे तीन सदस्य बोलले. पण 263 पैकी 108 योजना एकट्या बीड जिल्ह्यामध्ये होणार आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण....

त्याही सातच तालुक्यामध्ये होणार आहेत. त्या ठिकाणी अत्यंत भीषण दुष्काळ आहे. त्यामुळे मराठवाड्यात जेथे जेथे पाण्याचा प्रश्न आहे त्यासाठी किमान 600 हेक्टरपर्यंत प्रकल्प मंजूर केले पाहिजेत. या ठिकाणी राज्यपालांच्या निर्देशांचे कारण सांगितले जाते. मी व सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित माननीय राज्यपालांकडे गेलो होतो. त्यांनी आम्हाला असे सांगितले की, मी शासनावर बंधन घातलेले नाही. त्यामुळे आम्हाला खरे कारण काय आहे ते समजले पाहिजे. शासनाची जर अडचण असेल तर विधानपरिषदेमध्ये सर्व संमतीने ठराव करुन राज्यपालांना विनंती करण्यात येईल. परंतु माननीय जलसंपदा मंत्री हे निर्णय घेऊ शकतील अशी आमची धारणा आहे.

सभापती महोदय, जायकवाडी प्रकल्पाबाबत या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली आहेत. ज्यावेळी हे धरण बांधण्यात आले त्यावेळी वरच्या भागात भागात 102 टीएमसीची धरणे बांधण्याचे अपेक्षित होते. परंतु सध्या तेथे 185 टीएमसी पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात धरणे बांधल्यामुळे खालच्या भागात पाणी कसे येणार ? सन्माननीय सदस्य श्री.अपूर्व हिरे यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्या भागासाठी तुम्हाला भांडावेच लागेल. परंतु त्यातून आमच्यावर अन्याय होऊ नये. कायद्याप्रमाणे होऊ द्या. जलसंपत्ती नियमन अधिनियम, 2005 मंजूर करण्यात आलेला आहे. त्यातील कलम 18 मधील उपखंड (स) (ग) हे उपखंड कशासाठी तयार केले आहेत ते माहीत नाही. त्या कलमामध्ये असे नमूद केले आहे की, " दिनांक 15 ऑक्टोबरला संपूर्ण खोऱ्यातील पाण्याचे नियोजन केले पाहिजे, पाण्याचे समन्यायी वाटप केले पाहिजे."

सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले म्हणाले ते खरे आहे. जायकवाडी धरण 10 टक्के भरले तर वरची धरणे 10 टक्के भरली पाहिजेत. जायकवाडी धरण 100 टक्के भरल्यानंतर वरची धरणे भरण्याची सुरुवात करावी. त्याची टक्केवारी निश्चित करावी. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांच्या भाषणात असा उल्लेख केला की, पाण्याच्या प्रश्नावरुन एका मंत्री महोदयांनी राजीनामा देतो असे म्हटले होते. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी असे म्हटले की, गणपती विसर्जनासाठी 500 एमसीएफटी इतके पाणी सोडण्यात आले होते. परंतु खरोखरच गणपती विसर्जनासाठी पाणी सोडले होते की, गणपतीच्या नावाखाली सिंचनासाठी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ KTG/

श्री.सतीश चव्हाण.....

सोडले होते ? यातील खरे कारण काय ते समजले पाहिजे.

मी स्वत: पाहिले आहे की, पावसाळ्यात कॅनॉल बंद करण्यात आले होते. खालच्या भागातील धरणे भरली नसतील तर त्या काळात सिंचन अपेक्षित नसते. हे कालवे बंद केल्यानंतर त्या कालव्यात पाणी सोडण्याचा अधिकार कोणी दिला, त्याला दोषी कोण आहे ? मंत्री महोदयांच्या दबावामुळे पाणी सोडण्यात आले होते का ? सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी यासाठी एक ॲथोरिटी नेमण्याची सूचना केली आहे त्या सूचनेला माझा पाठिंबा आहे. त्या ॲथोरिटीकडे कोणाला आपले म्हणणे मांडावयाचे असेल तर ते मांडता येईल. त्या ॲथोरिटीने जायकवाडी धरणात किती पाणी असावे, दारणा धरणामध्ये, गंगापूर धरणात किती पाणी असावे हे त्यांना ठरवू द्यावे. म्हणून दिनांक 15 ऑक्टोबर रोजी पाण्याचे नियोजन अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मराठवाड्याच्या दृष्टीने 25 टीएमसी पाण्याचा महत्वाचा मुद्दा आहे. शासनाने आज केवळ 7 टीएमसी पाण्याचे नियोजन केलेले आहे. 7 टीएमसी पाण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार 5 हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. या वर्षीच्या बजेटमध्ये 75 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे आतापर्यंत या कामासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 5 हजार कोटी रुपयांच्या योजनेसाठी आजपर्यंत 500 कोटी रुपयांची तरतूद झाली असेल तर उर्वरित कामासाठी 4500 कोटी रुपये लागणार आहेत. दरवर्षाचे एस्कलेशन कॅल्क्युलेट केले तर या कामाच्या खर्चात वाढ होणार आहे.

काल माननीय मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबईतील विमानतळाची माहिती देताना असे सांगितले की, 4 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प 13 हजार कोटी रुपयांपर्यंत गेला आहे आणखी दोन वर्षांनी त्याची किंमत 17 हजार कोटी पर्यंत जाईल. त्या प्रमाणे या प्रकल्पाची किंमत वाढेल. परंतु कन्झर्व्हेटिव्ह एस्टीमेटप्रमाणे कमीत कमी दरवर्षी किमान 10 टक्के तरी प्रोजेक्ट कॉस्ट वाढणार आहे. म्हणजे दरवर्षी 450 कोटी रुपयांनी या प्रकल्पाची किंमत वाढणार आहे. पण शासनाने या वर्षीच्या बजेटमध्ये केवळ 75 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एवढी तुटपुंजी तरतूद कशासाठी केली जाते त्याऐवजी हा प्रकल्प स्क्रॅप तरी करुन टाकावा. 7 टीएमसी पाणी देत असताना पश्चिम महाराष्ट्रातील लोक आमच्यावर उपकार करीत असल्यासारखे बोलत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशोधित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण.....

कृष्णा खो-याचा 10 टक्के भाग हा मराठवाड्यामध्ये येतो म्हणून त्या हक्काने आम्ही पाणी मागत आहोत. 25 टीएमसी पाणी दिले जाईल असे सांगितले. तसा प्रचार झाला. परंतु 7 टीएमसी पाणी दिले. त्याची कामे चालू केली. त्यासाठी फक्त 75 कोटी रु.ची तरतूद केली. या हिशेबाने तरतूद केली तर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी 75 वर्षे लागतील. 25 टीएमसी पाण्यातील 7 टीएमसी पाणी गेल्यानंतर 18 टीएमसी पाणी राहिले. आता हे राहिलेले 18 टीएमसी पाणी भीमा स्थिरीकरण प्रक्लपातून देण्यात येणार आहे. हे पाणी केव्हा मिळेल याबाबतीतही संदिग्धता आहे. या भीमा स्थिरीकरण प्रकल्पासंबंधी माननीय मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा केला पाहिजे. हा प्रकल्प सध्या कोणत्या स्टेजला आहे, शासनाचे काय धोरण आहे हे आम्हाला सांगितले पाहिजे. हा प्रकल्प आम्हाला मृगजळ दाखविल्या प्रमाणे आहे. मराठवाडयातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता कमीत कमी पिण्यासाठी पाणी देण्यासाठी तरी आपण दया दाखवा. पिण्याच्या पाण्यासाठी काही प्रकल्प तयार करणे गरजेचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, जर 12 धरणे बांधली तर संपूर्ण गेवराई तालुक्याचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल आणि स्थलांतरणाचा देखील प्रश्न सुटेल. मराठवाड्यात उमरगा, लातूर आणि उस्मानाबाद ही तीन गावे आहेत. उमरगा गावामध्ये एका महिन्यातून 2 तास पाणी येते. उस्मानाबाद जिल्ह्यासाठी उजनीतून पाणी आणले. ते पाणी 25 टीएमसीच्या हिशेबात धरु नका म्हणजे झाले. लातूर शहराला बॅरेजेसमुळे पाणी मिळाले. कै. विलासराव देशमुख, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार, तसेच डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे लातूरला 25 टीएमसी पाणी मिळाले. हे बॅरेजेस झाले त्यावेळी खूप टीका झाली होती. या बॅरेजेसमुळे 30 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आणि 250 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे. नवी मुंबई एअर पोर्टच्या संदर्भात इतका खर्च वाढला असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कृष्णा खो-याचे उदाहरण दिले.

मराठवाड्याची भौगोलिक परिस्थिती अशी आहे की तेथे मोठ्या धरणांसाठी जागा नाही. लहान धरणासाठी पुनर्वसनासारख्या अडचणी आहेत. तेरणा, मांजरा, मनार यासारख्या ज्या लहान लहान नद्या आहेत त्या ठिकाणी केटी वेअर्स बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. यासाठी पुनर्वसनाचा किंवा भूसंपादनाचा प्रश्न येणार नाही. एका वर्षात ही धरणे होऊ शकतात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण....

मराठवाड्यामध्ये साईट शोधून अशा धरणांसाठी नियोजन केले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी कॅनॉलला पैसे दिले. काही उपसा सिंचन योजनांना पैसे दिले. आमच्या मराठवाड्यामध्ये उपसा सिंचन योजना नाहीत. एक रामकृष्ण गोदावरी उपसा सिंचना योजना औरंगाबाद येथे आहे. माझ्या माहिती प्रमाणे या योजनेमुळे कमीत कमी 100 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. शासनाने ही योजना ताब्यात घेतली पाहिजे.

पश्चिम महाराष्ट्राबद्दल आपण जे काही केले त्याबद्दल आपले आणि तेथील जनतेचेही अभिनंदन. वैजापूरच्या काही भागामध्ये बिलकूल पाणी जात नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण...

त्यांना नांदूर-मध्यमेश्वरचे पाणी जात नाही, जायकवाडी धरणाचे पाणी जात नाही, अशा गावांसाठी रामकृष्ण गोदावरी उपसा सिंचन योजना आहे. काही कारणामुळे ती उपसा सिंचन योजना बंद पडली आहे. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, नाशिक येथील काही उपसा सिंचन योजना शासनाने ताब्यात घेतल्या आहेत अशी माझी माहिती आहे. मराठवाडयात एक-दोन उपसा सिंचन योजना आहे, त्या योजना कधी चालू झाल्याच नाहीत. काही कारणामुळे चालू झाल्या नसतील. माझ्या माहितीप्रमाणे रामकृष्ण गोदावरी उपसा सिंचन योजना शासनाने ताब्यात घेतली तर 100 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ताबडतोब सुटू शकतो.

सभापती महोदय, एका योजनेमध्ये उर्वरित योजनेचे अपूर्ण काम पूर्ण होऊ शकते. या सिंचन योजनेच्या उर्वरित कामासाठी 80 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. माझी विनंती आहे की, ज्या भागात कोणतेही सिंचनाचे पाणी जाऊ शकत नाही अशा भागासाठी ही योजना शासनाने तातडीने ताब्यात घ्यावी आणि 100 गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न दूर करावा. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि या चर्चेवरील माझे मनोगत पूर्ण करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आज या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष किती वाढत चाललेले आहे हे सकाळपासून चर्चा सुरु आहे त्यावरुन दिसून येते. असे म्हटले जाते की, पुढील युध्द हे पाण्यासाठी होणार आहे. ...(अडथळा).. सभापती महोदय, ज्यावेळी असे विषय चर्चेला येतात त्यावेळी हा सभागृहाचा हक्क असतो, त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील एखाद्या सन्माननीय सदस्याने माननीय सभापतींकडे बोलण्याची अनुमती मागितली तर माननीय सभापती त्यांना अनुमती देऊ शकतात. सभापती महोदय, पुढील युध्द पाण्यासाठी होणार अशी परिस्थिती असताना देशा-देशामधील वाद किंवा युध्द बाजूला राहिले, आता जिल्हया-जिल्हयामध्ये, तालुक्या-तालुक्यांमध्ये पाण्याच्या प्रश्नावरुन वाद निर्माण होतील की काय अशी परिस्थिती समाजामध्ये निर्माण झाली आहे. परंतु या ठिकाणी आमचे भाग्य आहे आमचे मंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांची दूरदृष्टी विचारात घेता दुष्काळासारख्या परिस्थितीबाबत त्यांनी जे नियोजन केले आहे त्यावरुन काही प्रमाणात दिलासा मिळताना दिसत आहे.

सभापती महोदय, धरणाच्या साखळीतील पाणी किंवा समुहातील पाणी याचे निश्चित नियोजन करुन ते कसे वाटप करायचे हे ठरविणे आज कोणालाही जमलेले नाही आणि ते जमणे शक्य नाही. याचे कारण असे की, जमीन, पाणी आणि लोकसंख्या या त्रिकोणाचा मेळ घालायचा, या त्रिकोणाचे सूत्र बसवायचे झाले तर ते बसू शकत नाही. त्यामुळे आपण या ठिकाणी नियोजनाच्या बाबतीत कितीही चर्चा केली, कागदोपत्री कितीही नियोजन केले तरी निसर्ग आता लहरी झालेला आहे. या निसर्गाच्या लहरीपणामुळे नियोजनाचे सूत्र ठरविणे आणि ते अंमलात आणणे हे कोणाच्याही हातातील काम राहिलेले नाही. परंतु पाण्याबाबत नियोजन असले पाहिजे हे मी निश्चितपणे मान्य करतो. त्यामुळे हे सत्य स्वीकारुन ही आजची चर्चा झाली पाहिजे. तशी चर्चा झालेली आहे.....(बेल वाजल्यानंतर)... सभापती महोदय, सगळयांनी बोलल्यानंतर आम्हाला जर बोलण्यासाठी वेळ दिला जाणार नसेल तर मी खाली बसतो.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : आपण भाषण सुरु ठेवावे. तुम्ही मुद्दाच सुरु केलेला नाही.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : बेल वाजवायचे कारण काय आहे? पटत नसेल तर मी खाली बसतो.

तालिका सभापती : मंत्री महोदय उत्तरासाठी बसलेले आहेत. आपण आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.सतीश चव्हाण : माननीय सभापतींनी वेळ संपत आल्याबद्दल सूचना देण्यासाठी बेल वाजविली आहे.

श्री.जयवंतराव जाधव : याच्या पूर्वी सर्वजण त्याच्यावरच बोलले आहेत. सभापती महोदय, आपण सुरुवातीची बेल वाजविल्याबद्दल धन्यवाद.

नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

समन्यायी पध्दतीने पाणी वाटपाचा विचार हा अतिशय योग्य आहे. परंतु तो प्रत्यक्ष अंमलात आणणे फार अवघड आहे. समन्यायी पध्दतीने पाणी वाटपाचा विषय कागदावर सोपा वाटतो. प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणी करणे हे कठीण काम आहे.

सभापती महोदय, दरवर्षी निसर्गाच्या कृपेने आपल्याला पावसाच्या माध्यमातून पाणी उपलब्ध होत असते. दरवर्षी अमुक इतके पाणी मिळेल याची निश्चिती नसते. पाण्याच्या उपलब्धतेबाबत तूट निर्माण झाली तर त्या तुटीमध्ये सहभागी होण्यास कोणी तयार नसतो. पाणी उपलब्ध झाले तर ते समन्यायी पध्दतीने वाटप झाले पाहिजे याचे धोरण आखताना तूट निर्माण झाल्यास ती कशी भरुन काढायची हा प्रश्न निर्माण होतो. धरणाच्या खालच्या भागातील लोकांना पाण्याचा उपयोग होत असतो, त्या परिसराचा विकास होत असतो. लाभक्षेत्रात धरणे बांधले जात असताना ज्यांची जमीन संपादित होत असते ते विस्थापित होत असतात. धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतरही विस्थापितांना जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. ज्यांच्या जमिनीवर धरणाची उभारणी झाली त्यांना धरणाचा उपयोग होत नाही. पाणी दुसरीकडे जात असते. विस्थापितांना न्याय मिळत नाही. धरण पूर्ण झाल्यानंतर किमान बाजूच्या लोकांना तरी धरणातील पाण्याचा फायदा मिळाला पाहिजे. डोळ्यासमक्ष पाणी दिसताना पाण्याचा वापर करता येत नाही. ते पाणी दुसरीकडे जाते.

सभापती महोदय, एखाद्या भागात धरण झाले म्हणजे तो भाग सुजलाम-सुफलाम झाला असे समजू नये. मराठवाड्याच्या ज्या भावना आहेत त्या आम्ही मान्य करतो. आजही देशातील अनेक धरणातील पाणी पाकिस्तान, बांगलादेश, चीन या देशात वाहून जात आहे. तुम्ही आम्ही एकाच प्रकारच्या रक्ताची, हाडामांसाची माणसे आहोत. एकमेकांना सहाय्य करणे हे आपले कर्तव्य आहे, तसे आपल्यावर संस्कार झालेले आहेत. मराठवाड्याला पाणी मिळाले पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत. पाणी देत असताना ते पिण्यासाठी द्यायचे आहे. आमच्या भागात पाणी उपलब्ध आहे आणि तुमच्या भागात पिण्यासाठीच पाणी उपलब्ध नसेल तर आम्ही आमच्या भागातील सिंचन बंद करु. परंतु आमच्याकडे पाणी उपलब्ध नसताना, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असताना मराठवाड्याला पाणी कसे द्यायचे? ज्या भागातील लोकांचे आम्ही प्रतिनिधीत्व करतो त्यांना आम्ही काय उत्तर द्यायचे? माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी सांगितले की, वैजापूरला पाणी मिळत नाही. वैजापूरचे सर्वपक्षीय कार्यकर्ते आणि नेते आले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी वैजापूरला पाणी मिळत नाही असे म्हटलेले नाही. वैजापूर तालुक्याच्या काही भागाला पाणी मिळत नाही असे म्हटले होते.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नांदूर मध्यमेश्वर धरणाचे पाणी मिळावे म्हणून वैजापूरचे कार्यकर्ते आले आणि त्यांनी धरणाचे गेट उघडून टाकले. तुमच्याकडे पर्याय नाही म्हणून आमच्या समोरचे पाणी घेऊन जाता अशा वेळी आम्ही फक्त हातावर हात ठेवून बसायचे का?

नंतर 4डी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ...

जगामध्ये पाण्यावरुन युध्द होतील तेव्हा होतील परंतु पाण्यावरुन आमच्या भावाभावांमध्ये वाद होता कामा नये. आम्ही सर्व बांधव आहोत. आमच्या बांधवांमध्ये पाण्यावरुन वाद निर्माण होता कामा नये. म्हणून मला यासंदर्भात सूचना करावयाची आहे की, आमच्या पाण्यासाठी आपण शासनाकडे विनंती करा, शासनाकडून मागण्या मान्य करुन घेण्यासाठी तुम्हाला जे काही दबाव टाकावयाचे असतील ते तुम्ही टाका परंतु दादागिरी करुन आमचे पाणी कोणी काढून घेत असेल तर ते आलेल्या पायानिशी जाणार नाही एवढे मी निमित्ताने सांगू इच्छितो. पाणी मागणे तुमचा हक्क आहे, पाणी मागणे हा तुमचा अधिकार आहे ....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मराठवाडयाच्या सिंचनाच्या बाबतीतील प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून आलेला आहे. मराठवाडयाच्या हक्काचे पाणी जे नियमाने देण्याचे मान्य झालेले ते पाणी आम्ही मागतो आहोत. येथे दादागिरीचा किंवा भीक मागण्याचा किंवा आमच्यावर दया करण्याचा विषयच नाही. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये हे सांगण्यासाठी उभा आहे.

तालिका सभापती (श्री. विक्रम काळे) : सभागृहाच्या कामकाजातून दादागिरी शब्द काढून टाकला जावा.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मुद्दा असा आहे की, आमचे मित्र श्री. जयवंतराव जाधव हे या सभागृहात नवीन असतांना त्यांनी चांगल्या प्रकारे मुद्दे या सभागृहात मांडले असल्यामुळे मी त्यांचे कौतुक करतो. परंतु भाषणाच्या ओघात काय शब्द वापरावेत याचे भान ठेवण्याची आवश्यकता आहे. जायकवाडी धरण जेव्हा निर्माण झाले तेव्हा त्याची क्षमता, वरचा भाग, कॅचमेंट एरिया या सगळयांचा विचार करता जायवाडीच्या पाण्यावर खऱ्या अर्थाने नाशिक आणि नगर जिल्हयांनी अतिक्रमण केलेले आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझे भाषण सुरु असल्यामुळे मी माझे विचार मांडत आहे. सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे असतील तर ते त्यांनी आपल्या भाषणात मांडावेत. त्यांनी त्यांच्या भाषणात माझे जे काही मुद्दे खोडावयाचे आहेत ते त्यांनी खोडून काढावेत. नाशिकमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्यामधून जायकवाडी धरणासाठी पाणी सोडले गेले आहे. गोदावरी, दारणा या समूहामधून जायकवाडीसाठी आतापर्यंत 11 टीएमसी पाणी सोडले गेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ...

आहे. नाशिकमध्ये उपलब्ध असलेला पाणी साठा, लोकांच्या गरजेनुसार करण्यात आलेले आरक्षण याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पाणी सोडण्याबद्दल आम्ही कधीही नकार दिलेला नाही. माननीय श्री. पवार साहेबांनी सांगितले होते की, पाण्याचा धर्म पाळा, पाण्याच्या बाबतीत प्रत्येकाला सहकार्य करण्याची भावना ठेवा.

माननीय श्री.भुजबळ साहेब तसेच माननीय श्री. पिचड साहेबांच्या निळवंडे धरण, दारणा, गोदावरी समूहाचे पाणी सोडण्याकरिता माननीय श्री. सुनील तटकरे साहेबांकडे बैठका झाल्यामुळे पाणी सोडले गेले. जायकवाडी धरणासाठी 11 टीएमसी पाणी सोडले असतांना प्रत्यक्षात जायकवाडी धरणात केवळ 5.5 टीएमसी पाणी पोहचले गेले. जायकवाडीला पाणी दिले जाणार नाही म्हणून आम्ही काही दबाव आणला होता ?आम्ही कोर्टात गेलो होतो? तुम्ही पाण्याची मागणी वेळीच केली असती, मंत्री महोदयांनी वेळीच परवानगी दिली असती तर आमची त्याला कोणत्याही प्रकारे हरकत राहिली नसती परंतु 11 टीएमसी पाणी सोडलेले असतांना जायकवाडी धरणात केवळ 5.5 टीएमसी पाणी येते हे बरोबर आहे काय ? आमच्या शेतीलाही पाण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

सभापती महोदय, आम्ही नाशिक शहरासाठी 5200 एमसीएफटी पाण्याचे आरक्षण केले होते. ते आम्ही स्वत:हून मागे घेतले आहे. आता आम्ही फक्त 3600 एमसीएफटी पाणी नाशिक शहराकरिता ठेवलेले आहे. नाशिक शहरातील सर्वपक्षीय नेत्यांनी पाणी कपातीचा निर्णय घेतला असून आजूबाजूच्या परिसराला पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, नियोजन करणे या सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांच्या मताशी सहमत आहे. पाणी कधी सोडायला पाहिजे होते, ते कधी पर्यंत पोहचेल याचे नियोजन करणे आवश्यक आहे. सदर नियोजन करताना अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींना देखील विश्वासात घेतले पाहिजे.

राज्यातील अनेक शहरांमध्ये महिना-दीड महिना पाणी येत नाही. आमच्या मनमाड शहरामध्ये वर्षानुवर्षे महिन्यातून एकदाच पाणी यायचे. माननीय मंत्री आणि माननीय पालक मंत्री या सर्वांनी पाण्याचे नियोजन करून दिले. मनमाड शहराला महिन्याभराने पाणी यायचे ते आता दर 25 दिवसांनी पाणी येते. आम्ही सर्व महिला भगिनींना डॅमवर घेऊन गेलो. त्यांना सांगितले की, एवढेच पाणी आपल्याकडे आहे. ते आपल्याला मे महिन्या पर्यंतच वापरायचे आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय करून चालणार नाही.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाची पाणी वाटप नियोजन समिती आहे. त्या समितीमध्ये नाशिक जिल्ह्यातील एकमेव प्रतिनिधी आहे. बाकीचे सगळे सदस्य नगर जिल्ह्यातील आहेत. पाणी वाटप समिती नाशिक जिल्ह्यासाठी असून त्या समितीवर आमच्या जिल्ह्याचेच सदस्य नाहीत. नाशिक जिल्ह्यातून पाणी जात असल्यामुळे आमच्या जिल्ह्यातील प्रतिनिधींना सुद्धा समितीवर घेण्यासंबंधीचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पाणी आरक्षण संबंधातील अधिसूचना जिल्हाधिकाऱ्यांनी अगोदरच जाहीर करणे आवश्यक असते. मी आपणास सांगू इच्छितो की, पाणी आरक्षणाची अधिसूचनाच काढली गेलेली नाही. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, पाण्याच्या आरक्षणा संबंधातील अधिसूचना असतील त्या वेळीच देणे आवश्यक आहे. जेणे करून याबाबतीत लोकप्रतिनिधींना सूचना करावयाच्या असतील तर त्या करता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

सभापती महोदय, नाशिक जिल्ह्याचे दुर्दैव असे आहे की, दारणेचे पाणी मराठवाड्याला जाते. वैतरणाचे पाणी मुंबईला जाते. गोदावरीचे पाणी नगरला जाते. नांदूर मधमेश्वरचे पाणी जाते वैजापूरला. त्यामुळे नाशिक जिल्हा कोरडाच रहात आहे.

मला येथे एकच विनंती करावयाची आहे की, मराठवाडा असेल, उत्तर महाराष्ट्र असेल येथील पाण्याचा प्रश्न हा सुटलाच पाहिजे. हा प्रश्न सुटण्याकरिता पेठ सुरगाणा तालुक्यातील दमणगंगा मधील 133 टीएमसी पाण्याकडे लक्ष वेधू इच्छितो. आज या पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. हे पाणी गुजरातकडे वळले तर आपल्यातील हा जो वाद आहे तो अधिक पराकोटीला जाईल. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी गुजरात राज्या बरोबर एमओयु केलेला आहे. तो रद्दबातल करण्याकरिता राज्य सरकारने पावले उचलण्याची गरज आहे. दमणगंगेच्या पाण्याचे नियोजन कसे करायचे याबाबत गुजरात राज्य पुढे गेलेले आहे. आपण कोणालाही न विचारता गुजरात बरोबर एमओयु साईनच कसा केला हा सर्वात मोठा प्रश्न आहे. गुजरात राज्याने एफडब्ल्यूटीबाबत एमओयु केला आहे त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी अतिशय गंभीरतेने विचार केला पाहिजे. आपल्यावर कोर्टात जाण्याची वेळ आली तर कोर्टात जावे. माननीय पंतप्रधानांकडे यासंबंधी बैठक घेऊन हा प्रश्न सोडविता आला तर तो सोडवावा अशी मी येथे विनंती करतो.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंवतराव जाधव...

सभापती महोदय, नाशिक जिल्ह्यामध्ये कॅचमेंट एरिया आहे. त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे नियोजन झाले तर नाशिक बरोबर, अहमदनगर आणि मराठवाड्याला पाणी देणे अधिक सोईचे होईल. नाशिक जिल्ह्यातील किकवी प्रकल्पास शासनाने मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनाची प्रक्रिया 90 टक्के पूर्ण झालेली आहे. या प्रकल्पासाठी 525 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. किकवी धरण झाल्यास गोदावरी आणि धारणा समुहातील अधिक पाणी मराठवाड्याला देता येईल आणि किकवीचे पाणी नाशिककरिता वापरता येईल. आपणास अशाप्रकारे नियोजन करता येईल.

सभापती महोदय, गुजरातकडे जाणारे पाणी मांजरपाडा-1 आणि मांजरपाडा-2, वांजूळपाडा येथे अडविण्यासाठी 140 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. हा निधी लवकर उपलब्ध करुन दिल्यास पाण्याचा प्रश्न लवकर सुटू शकेल. .

सभापती महोदय, मांजरपाडा-2 च्या सर्वेक्षणाकरिता 50 लक्ष रुपयांची आवश्यता आहे ते देण्यात यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, वळण योजनांकरिता मग त्यामध्ये ननाशी वळण योजना असेल, गोळशी वळण योजना असेल किंवा हट्टीपाडा वळण योजना असेल या योजनांकरिता 28 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आपण हा निधी दिल्यास वळण योजनेच्या माध्यमातून आपणास पाणी देता येईल.

सभापती महोदय, जायकवाडीच्या धरणाच्या बाजूला प्रकल्प वर्षा राबविताना त्याचे व्यवस्थित नियोजन केल्यास पाण्याचा प्रश्न मिटू शकेल. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आमच्या पक्षाचे प्रतोद श्री.हेमंत टकले आणि आमच्या मराठवाड्यातील इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला आणि शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये नवचैतन्य निर्माण करणारा जो प्रस्ताव आणला आहे त्यावर अतिशय सविस्तरपणे चर्चा करण्याची संधी आम्हाला मिळाली याचा आम्हाला आनंद आहे.

सभापती महोदय, मराठवाड्याचे सुपुत्र स्व.शंकरराव चव्हाण, माझे वडील स्व.वसंतराव काळे, तसेच या राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांचे स्मरण केल्याशिवाय मी पुढे जाऊ शकणार नाही. कारण या महान नेत्यांच्या भगीरथ प्रयत्नामुळे मराठवाड्यामध्ये गोदावरीसारखा प्रकल्प उभा राहिला आहे.

सभापती महोदय, मराठवाड्याच्या हक्काचे 25 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. यासाठी मराठवाडयामध्ये अनेक आंदोलने झाली. माननीय डॉ.पद्मसिंह पाटील साहेब असतील किंवा माझे वडील स्व.वसंतराव काळे असतील यांनी सुध्दा बीड आणि उस्मानाबाद जिल्हयात पाणी परिषदा घेण्याचे काम केले. आमच्या हक्काचे पाणी मिळाले पाहिजे ही भूमिका त्यांनी घेतली. सन 2007 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांनी मराठवाड्याच्या हक्काचे 25 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय घेतला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

हा दोन टप्प्यातील प्रकल्प आहे. उजनी जलाशयातून उस्मानाबाद जिल्ह्यात दोन उपसा सिंचन योजनेद्वारे जवळपास 19 अब्ज घन फूट पाणी उपलब्ध करुन दिले जाणार आहे. महोदय, या प्रकल्पाला दि.23 ऑगस्ट, 2007 रोजी 2382.50 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली गेली. आपण पाहतो की, जसजसा काळ पुढे जातो तसतशी दरवर्षी प्रकल्पाची किंमत वाढत जाते. या प्रकल्पाच्या किंमतीत सुध्दा सातत्याने वाढ होत आहे. या प्रकल्पाला 2007 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर दि.27 ऑगस्ट, 2009 रोजी पुन्हा 4845.50 कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली गेली. पण पुढे काय झाले हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

महोदय, माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे हे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचे निकटवर्तीय समजले जात होते. कारण माननीय श्री.सुनील तटकरे यांनी सुध्दा तितकेच स्नेह जपण्याचे काम केले होते. स्नेह, संबंध कसे जोडावेत याचे कौशल्य माननीय श्री.सुनील तटकरे यांच्याकडे आहे. त्यांचे नाव 'सुनील' आहे. त्यांच्या नावातील 'सु' म्हणजे 'चांगले आणि 'नील' म्हणजे 'पाणी' होय. तसेच 'तटकरे' म्हणजे 'पाण्याचा तट बांधणारे' होय. आज मला आनंद वाटतो की, माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी कोकणात सुध्दा सिंचन वाढविण्याचे काम केलेले आहे. माननीय श्री.सुनील तटकरे साहेब, ज्या पध्दतीने तुम्ही तुमच्या मतदारसंघाकडे पाहता त्याच पध्दतीने स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्याचा विडा उचलला पाहिजे आणि तो विडा तुम्ही उचलाल अशी मी अपेक्षा करतो. कारण जोपर्यंत आपण प्रकल्पासाठी निधीची तरतूद करणार नाही तोपर्यंत प्रकल्प पूर्ण होणार नाहीत.

महोदय, आम्ही कोणाच्या ताटातील मागत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील नाहीत. आम्ही सुध्दा प्रादेशिक प्रश्न समजू शकतो. परंतु जे लवकर जेवायला बसलेले असतात त्यांच्या ताटात पूर्ण पदार्थ मिळाले पाहिजेत. उशिरा जेवायला बसल्यास त्यांना लाडू मिळणार नाही किंवा इतर पदार्थ मिळू शकणार नाहीत हा सृष्टीचा नियम आहे. गोदावरी धरण स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांच्या भगीरथ प्रयत्नांनी सर्वात अगोदर झाले आहे. महोदय, आमच्या खिशात काहीच नाही. आमच्या खिशात निधी टाकण्याचे काम माननीय जलसंपदा मंत्र्यानी केले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

आज आमच्या भागातील प्रकल्पांची काय अवस्था आहे ? उजनी धरणातून सिना-कोळेगावच्या माध्यमातून कामे सुरु आहेत. तुळजापूर तालुक्यांतर्गत घाटणी बॅरेज आहे, नळदुर्ग बॅरेज आहे, चांदरदरावाडी तलाव आहे, रामदरा तलाव आहे डोंगरी सिनपना तलाव आहे. यासाठी 72 कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ....

परंतु या 25 टीएमसीपैकी 19 टीएमसी एवढा मोठा वाटा उस्मानाबाद जिल्ह्याचा आहे. त्या जिल्ह्यात भूम तालुक्याच्या अंतर्गत जी कामे चालू आहेत त्यामध्ये सोनगिरी साठवण तलावासाठी 7 कोटी रुपये दिलेले आहेत. त्या तलावासाठी तरतूद वाढविण्याची गरज आहे. कारण सोनगिरी साठवण तलावाचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. या तलावामध्ये ऑगस्ट, 2012 मध्ये 8 घनफूट पाणी साठले. आज त्या ठिकाणी पाणी साठलेले आहे. हे या 19 टीएमसीचे फलीत आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हणण्याची दानत असली पाहिजे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी पैसे दिले म्हणून काम सुरु झाले आहे. 19 टीएमसीपैकी काही पाणी आज त्या ठिकाणी साठले आहे, याचा आम्हाला आनंद आहे.

सभापती महोदय, काही झालेच नाही असे मी म्हणत नाही. मी नाहीचा पाढा म्हणत नाही पण पुढचे जे काम आहे त्यासाठी तरतूद झाली पाहिजे. सोनगिरी साठवण तलावाचे काम 90 टक्के पूर्ण् झालेले आहे आणि पुढचे 10 टक्के काम पूर्ण करावयाचे असेल तर त्यासाठी जवळपास 32 कोटी रुपयांची गरज आहे. हे पैसे सुध्दा तातडीने दिले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, आकस्मिकता निधीतून पैसे घेऊन हे पैसे दिले पाहिजेत जेणेकरुन ते काम पूर्ण होईल. जर त्या ठिकाणी पाणी साठले तर त्या भागातील जवळपास 400 एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. म्हणून ते काम तातडीने पूर्ण केले पाहिजे अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये 6 टीएमसी पाणी आणणार आहोत. बीड जिल्ह्यातील सर्वात दुष्काळी तालुका म्हणून ज्या आष्टी तालुक्याकडे पाहिले जाते तो तालुका सुध्दा माझ्या मतदार संघामध्ये येतो. त्या आष्टी तालुक्यामध्ये सुध्दा जी कामे सुरु झाली ती जलद गतीने पूर्ण झाली पाहिजेत. त्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणी आवश्यक त्या निधीची तरतूद केली पाहिजे अशी मागणी मी या ठिकाणी करतो. या सर्व प्रकल्पांना 5 हजार कोटी रुपये लागणर आहेत. 5 हजार कोटी रुपये कोठे आणि 72 कोटी रुपये कोठे अशी परिस्थिती आहे. आतापर्यंत आपण काय दिलेले आहे आणि काय देत आहोत याचा विचार निश्चितपणे केला पाहिजे. आम्हाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/D/KTG

श्री. विक्रम काळे .....

राहून राहून हे पाणी कधी येणार याबद्दल शंका का वाटते ? आज जरी प्रत्यक्षपणे कामाला सुरुवात झालेली असली तरी सुध्दा जे छोटे छोटे प्रकल्प आहेत, ज्या पध्दतीचे बॅरेजेस आहेत, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी केला, बीड जिल्ह्यात जे बॅरेजेस होणार आहेत त्यासाठी सुध्दा तातडीने आर्थिक तरतूद केली पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. तटकरे साहेब असतील किंवा माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार असतील त्यांना माझी विनंती राहील की, जे काम या वर्षामध्ये पूर्ण होणार आहे त्या ठिकाणी तेवढी ठोस आर्थिक तरतूद करावी आणि हे प्रकल्प कधी पूर्णत्वास नेता येतील या बाबतीत सभागृहाला ठोस उत्तर द्यावे अशी विनंती करतो आणि वेळ कमी असल्यामुळे मी माझे भाषण संपवितो.

उप सभापती : या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे आता संपलेली आहेत. या प्रस्तावावर उद्या माननीय मंत्री उत्तर देतील.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, निळवंडे धरणाची कालवा सल्लागार समिती आहे. आमच्या माहितीप्रमाणे निळवंडे धरणाचे कॅनॉल अस्तित्वात नाहीत आणि कालवा समितीच्या निर्णयानुसार अमुकअमुक निर्णय घेतला असे कोठे तरी शासकीय कागदपत्रांमध्ये वाचण्यात आले. त्याचा खुलासा मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावा, अशी मी विनंती करतो.

उप सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या बुधवार, दिनांक 3 एप्रिल, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेले सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 2- महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 3 एप्रिल,2013 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही